# श्री गौरी गणपतीच्या नाचांच


# बोधपर चक्री साम


म. ग्रं. सं. ठाणें

विषय

सं. क्र. 2032

REFBK-0017968

प्रकाशक आणि पुस्तक विक्रे

रवि- कृष्णकान्त रव

वी. गाय ी. गिरगांव,

: लेखक :

# कवि कृष्णकांत खाडे

यांची पुस्तकें म्हणजे

## धमाल, कमाल, विनोद आणि जादू

## या चार गोष्टींची भरपूर करमणूक




प्रकाशक : कवि कृष्णकान्त खाडे, १८० बी, गायवाडी गिरगांव मुंबई ४

कव्हर पाई : प्रगति प्रिन्टींग प्रेस, ३१, मुगभाट लेन, मुंबई ४.

॥ ॐ ॥

मुंबई-महाराष्ट्रांत गाजलेलें आणि प्रचंड लोकप्रिय असलेले



# श्री गौरी गणपतीच्या नाचांचा
# बोधपर चक्री सामना
[संपूर्ण एकत्र १ ते १५ भागांचा संग्रह.]


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


—: गीत रचना :—

## कवि-कृष्णकान्त खाडे


REFBK-0017968

संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना



आवृती ६ वी ✽ १९७० किंमत रु. २=२५ पैसे






प्रकाशक आणि पुस्तक विक्रेते—
कवि-कृष्णकान्त खाडे.
१८० वी, गायवाडी, गिरगाव, मुंबई नंबर-४




हि अल्प माझी सेवा । गोड करूनी घ्यावी देवा ॥



# कवी — कृष्णकान्त खाडे

—: सूचना :—

गौरी—गणपतीच्या नाचांचा बोधपर चक्री सामना, संपूर्ण भाग १ ते १५ ह्या पुस्तकाचे सर्व हक्क, कवि—कृष्णकांत हरीश्चंद्र खाडे यांच्या स्वाधीन आहे.


दिनांक १५-७-७० आषाढी एकादशी — सहावी आवृति

: प्रकाशक :
कवि : कृष्णकांत खाडे
१८० बी, गायवाडी गिरगांव,
मुंबई ४.

: मुद्रक :
ग. वि. सावंत
प्रगति प्रिंटिंग प्रेस,
३१ मुगभाट लेन, मुंबई ४.

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



१८०५८

## श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

### भाग १ ला

गाणें १ लें

## सरस्वती चरणी

आज सरस्वती कृपा झाली । शब्दाची इमारत फळा आली ॥
सरस्वतीने रचिला मुळ पाया। सहज घडली शब्दांची किमया॥
तुझ्या दर्शनी झालो मी पावन । वेडे वाकडे रचिले कवन ॥
अल्प माझी मती फळा आली। आज सरस्वती कृपा झाली ॥
नमो शारदा तूं माझी गुरू । मी अजाण तुझे लेकरूं ॥
तूं ठेवूनी माझ्या मस्तकी हात । दिलीस ज्ञानाची दौलत ॥
माझी ब्रह्मानंदी लागली टाळी । आज सरस्वती कृपा झाली ॥
रूप तुझे साठविता लोचनी । स्फूर्ती गंगा उसळते मनी ॥
म्हणे कृष्णकांत मज सांपडली। तुझ्या कृपेने ज्ञानाची गुरूकिल्ली॥
माझ्या अज्ञानाची समाप्ती झाली। आज सरस्वती कृपा झाली॥

गाणे २ रे

# श्री छत्रपती शिवाजीचा जन्म

महाराष्ट्राच्या पुण्य भूमिवर । छत्रपती शिवाजी होऊनी गेले वीर ।। बाळ जन्मला हो शिवनेरी किल्ल्यावर । तो साक्षांत शिवशंकराचा अवतार ।। महाराष्ट्रात चोहिंकडे दुफळीचा जोर । मराठ्यांचा मर्दपणा झाला कमजोर ।। आमच्या मर्द-मराठ्यांच्या जिवावर । या देशांत परके येऊनी झाले गबर ।। आला बांका प्रसंग आया–बहिणींवर । मराठे होते दुफळीनें लाचार ।। पराक्रमानें असुनी मराठे शूर । झाले परक्यांच्या ताटाखालचे मांजर ।। पुण्याई महाराष्ट्र भूमिची थोर । जागा झाला कैलासीचा शिवशंकर ।। एके दिवशी शिवनेरी शिल्ल्या-वर । जिजा मातेच्या पोटीं बाळ जन्मलें सुंदर ।। नवसाला पावली शिवाई देवी खरोखर । म्हणून शिवाजी नांव ठेवली अमर ।। शिवबाने पाहुनी यवनांचा अत्याचार । केला बसुनी त्याने एकांतीं विचार ।। रचिला बेत मनीं अति सुंदर । जमविले गरीब मराठे मावळे वीर ।। सारे जमुनी मावळे महादेवा समोर । शिवबानें हाती घेतला बेलभंडार ।। ठेवुनीं महादेवाशीं साक्षीदार । देश स्वतंत्र्याचा केला त्यानें पुकार ।। एका मागूनी एक गड केले सर । रायगड प्रतापगड आणि पुरंदर ।। मराठ्यांचा हर हर महादेव हा गजर । ऐकुनी शत्रू कांपती थर थर ।। स्वर्ग पाताळ अन् मृत्यु लोकांवर । शिवबाची कीर्ती झाली अमर ।। म्हणे महाराष्ट्राचा कृष्णकांत शाहिर । देश रक्षणांसाठीं उचलला बेलभंडार ।।

गाणें ३ रें

# पंचरंगी गौळण

(चाल : हिरव्या साडीस पिवळी किनार ग)

बाळकृष्णाला पाहूनी जमल्या । गोकुळीच्या गौळणी सजल्या ॥
पहिली गौळण उमर कवळी । साडी भरजरी नेसून आली ॥
अंगीं शोभेही रेशमी चोळी । खूण सौभाग्य कुंकुम भाळीं ॥
नंदलालाच्या मुरलीस भुलल्या । गोकुळीच्या गौळणी सजल्या ॥
दुसरी गौळण आली क्रिडेला । नेसून साधा पितांबर पिवळा ॥
दोन दिवस झाले लग्नाला । रंग तिचा चाफ्याहुन पिवळा ॥
ब्रिजलालाशीं नाचण्या जमल्या । गोकुळीच्या गौळणी सजल्या ॥
तिसरी गौळण नटुनी आली । लाजरी ती काळी सांवळी ॥
ओठीं तिच्या दांत शोभती । जणूं लाल कोंदणी मोती ॥
जाईजुईच्या कळ्या उमलल्या । गोकुळीच्या गौळणी सजल्या ॥
चौथीचा तो रंग लालीलाल । भासे उभे डाळिंबाचे फूल ॥
मोहवी लाल रेशम चोळी । वाटे उषा समोरून आली ॥
रंग उडवूनी गौळणी दमल्या । गोकुळीच्या गौळणी सजल्या ॥
पांचव्या गौळणाची छंद और । कंठी झळके मोतीयाचा हार ॥
पायीं पैंजण करिती नाद । सासू ऐकून घालिती साद ॥
कृष्ण रूपास गौळणी भुलल्या । गोकुळीच्या गौळणी सजल्या ॥

★

गाणें ४ वें

## प्रश्न

नमन माझें गुरुस्वामीला । प्रश्न पुसतो एक तुजला ॥
जाब तूं देई माझ्या शब्दाला । मग खुशाल गाई तूं सभेला ॥
कोणी केली लंका निर्माण । तयाचें नांव द्या सांगून ॥
प्रथम राजा झाला कोण । त्याचें नांव बोल जल्दिनं ॥
इंद्रजित होता मोठा पराक्रमानं । ओळख द्यावी मूळ नांवानं ॥
तयाचा जन्म कोणापासून । मातापिता कोण द्यावं सांगून ॥
शास्त्र आधारे प्रश्न केला । प्रश्न सोपा रे गुरुच्या मुला ॥
उगाच गर्व नको तुला । कवि कृष्णकांत गाई सभेला ॥

卐

गाणें ५ वें

( गाणें ४ चें उत्तर

गुरुस्वामीला माझें नमन । प्रश्नाचा जाब घेई ऐकून ॥
लंका नगरी ब्रह्मदेवाची जाण । प्रथम राज्य केलं कुबेरानं ॥
मंदोदरी-रावणाणाला मेघनाद झाला।इंद्रजित म्हणती सारे तयाला॥
रामायणी पहा दाखला । कवि कृष्णकन्त सांगे तुम्हाला ॥

*

गाणें ६ वें

## स्वराज्य कथा

स्वराज्य मिळालं भारताला । बाळ गौरीचा नवसाला पावला ॥
पहिला नमन श्री गणरायाला । दुसरे नमन भारत मातेला ॥

तिसरं नमन गांधी बाबांना। चौथं नमन सुभाष बाबूना ॥ पांचवं नमन लोकमान्य टिळकांना। सहावं नमन साने गुरुजींना ॥ विनंती करून गातो सभेला। स्वराज्य कथा सांगतो तुम्हांला ॥ कैक वर्षे ह्या भारत देशांत। चाळीस कोटी प्रजा होती गुलामींत ॥ टिळक गांधीजी सारे देशभक्त। म्हणती इंग्रजास सोडा भारत ॥ इंग्रजांना गांधीजी सांगून थकले। फिर्याद ऐकेना लंडनवाले ॥ गुलामगिरींचें भूत मानेवर बसलें। दडपशाहीचे सैतान मोकाट सुटले ॥ बेचाळीस सालीं ऑगष्ट महिन्याला। "चलेजाव"चा ठराव गांधीजीनें मांडीला ॥ भारतांत क्रांतीचा वणवा पेटला। स्वातंत्र्याचा जयघोष स्वर्गाला भिडला ॥ इंग्रज सारे चवताळून उठले। सारे देशभक्त तुरुंगांत टाकीले ॥ गांधीजी, नेहरू तुरुंगांत गर्जती। करूं किंवा मरूं आम्ही देशासाठीं ॥ त्याच संधीला अजब घटना घडली। ब्रिटिशांच्या पायाखालची भूमी हादरली ॥ ब्रिटिशांचा चुकवून डोळा। सुभाष बाबूंनीं गुंगारा दिला ॥ जर्मन देशांत प्रगट झाला। साऱ्या जगाला हादरा हो बसला ॥ जय हिंद करुनी घोषणा। त्यांनीं स्थापिली आझाद सेना ॥ "छोडो दिल्ली" जय हिंद गर्जत। स्वातंत्र्यासाठीं दिली त्याने लढत ॥ अखेर पेंच पडला इंग्रजांना। सोडुनी दिले गांधी–नेहरूंना ॥ झाले तयार इंग्रज तडजोडीला। गांधी–नेहरूंना निरोप धाडीला ॥ राष्ट्रपिता गांधीजी गेले दिल्लीला। नेहरु अन् पुढारी होते संगतीला ॥ इंग्रज अन् कॉंग्रेसात झाला समझोता। दिली कॉंग्रेसच्या हातीं मानानें सत्ता ॥ सत्तेचाळीस सालीं ऑगष्ट

महिन्याला । भारतावर स्वातंत्र्याचा सूर्य उगवला ।। लाल किल्ल्यावर झेंडा फडकला । जयजयकारांत भारत दुमदुमला ।। घरोघरीं स्वातंत्र्य दिप पेटला । गुलामगिरीचा अंधार पांगला ।। म्हणे कृष्णकांत भारत अमुचा प्यारा । देऊं नका देशद्रोही शत्रुंना थारा ।।

गाणें ७ वे

## कष्टकऱ्यांची हि भारतभूमी !

शेतकरी दादा धरती तुझी माता । कामकरी दादा कष्ट तुझा पिता ।। गोऱ्या भूताचं गेलं आतां राज्य । लोकशाहीचे आलं स्वराज्य ।। नाहीं गुलाम आतां भारत कुणाचा । डौलानं सांगे ध्वज अमुचा ।। घामाचीं फुलें फुलूं द्या आतां । कामकरीदादा कष्ट तुझा पिता ।। धरती आळवी मेघ मल्हार । शेषाच्या मस्तकी पृथ्वी स्थिर ।। धरतीला पाहून उधळी आकाश । कुबेराच्या भांडाऱ्यांतील मोत्याची रास ।। सोन्याचा दिवस दिसेल आतां । कामकरी दादा कष्ट तुझा पिता ।। भारतमातेचे पुत्र उठा हो सगळे । बसूनी खाण्याचे दिवस गेले ।। कष्टकरी पुत्र धरती हवा । देशद्रोही शत्रुनां समुद्रांत बुडवा ।। आम्हां सर्वांची आई भारतमाता । कामकरी दादा कष्ट तुझा पिता ।। कामकरी दादा देशाचा सेवक । भविष्यकाळांत देशाचा मालक ।। ध्यानीं आठवा चरित्र देशभक्तांचें । गर्जूनी सांगती

आत्मे तयाचे ।। लाचारी जिणें सोडा हो आतां । कामकरी दादा कष्ट तुझा पिता ।। उठा बंधुंनो देश बलवान करा । देशद्रोह्यांना देऊं नका थारा ।। गांधी, नेहरू अन् शास्त्री गर्जले । टिकवा भारतात एकिचे मुळ पाहिलें ।। ज्योत तयांची ठेवूं तेवत आतां । कामकरी दादा कष्ट तुझा पिता ।।

卐

गाणें ८ वें

## रासक्रीडा

बारा घरच्या बाराजणीं । आल्या शोधीत शारंगपाणी ।। रात्र चांदण्यांनी सजली । रातराणी वनांत फुलली ।। रात पूर्णिमेची वाया चालली । कुठें लपूनि बसला वनमाळी ।। बारा घरच्या बाराजणी । आल्या शोधीत शारंगपाणी ।। पहिलीच्या डोईवर दुधाची घागर । आली हो सोडून भोळा भ्रतार ।। दुसरीच्या घड्यांत ताकाचं पाणी । आली सांडी शंगोळी वाणी ।। तिसरीच्या हातांत दह्याचें गाडगे । नव्हते तीचे दोन्ही डोळे जागे ।। चौथीनें आणिला लोण्याचा गोळा । चुकवून जावा-सासूचा डोळा ।। बारा घरच्या बारा जणी । आल्या शोधीत शारंग पाणी ।। पांचविच्या हातांत पंचरती । तिची वरात वाऱ्यावरती ।। संहावींच्या हाती फुलांच्या माळा । फुलांचा सुगंध उडोनी गेला ।। सातवीच्या हाती फुलांची परडी । पाठी लागली दीर-भ्रताराची जोडी ।। आठविच्या हो हातांत फळांचें ताट । तान्हे बाळ टाकुनी आली घरांत ।। बारा घरच्या बाराजणी ।

आल्या शोधीत शारंगपाणी ।। नववी वाजवी नवी सतार । वाऱ्यासंगें धरीला सूर ।। दहावी वाजवी मंजूळ वीणा । करी बेचैन सर्वांना ।। अकरावी बैसली गात सभेला । तिचा गळा हो बेसूर झाला ।। बारावी गौळण राधा हो आली । तिनें शोधूनि आणिला वनमाळी ।। बारा घरच्या बाराजणी । आल्या शोधीत शारंगपाणी ।। बारा गौळणींने धरीला फेर । कुंजवनी घुमला मुरलीचा सूर ।। रान वाऱ्यानें शीळ हो घातली । रासक्रीडा मध्यरात्री रंगली ।।

## आरती

(चाल :- येई हो विठ्ठले माझे माऊली ये)

आरतीं ओवाळूं जय जय श्रीगणरायाला ।।
पंचारती घेऊनि तुजला ओवाळू सकला ।। धृ० ।।
भाद्रपदाच्या चौथ्या दिवशी उत्सव मांडला ।।
देवा उत्सव मांडीला ।। १ ।।
आरती ओवाळू जय जय गौरी तनयाला ।।
विघ्न हरता तूंच, जगाच्या मंगलकार्याला ।।
जन्मोजन्मी तुझ्याच चरणीं ठेवी आम्हांला ।।
देवा ठेवी आम्हांला ।। २ ।।
आरती ओवाळूं जय जय श्री गणरायाला ।।

## भाग पहिला समाप्त

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

मराठी ग्रंथ संग्रहा
दा. क्र. १७८६
संदर्भ शाखा



### श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग २ रा

गाण ९ वें

## प्रार्थना

सरस्वती माते आलो मी तुज शरण । लागोनिया पायीं घेतों लोटांगण ॥ देई मज स्फूर्ति गीत रचण्याला । देई मज शक्ति गूण गाण्याला ॥ भाद्रपदीं हो शुद्ध चतुर्थीला । गणरायाचा हो उत्सव मांडीला ॥ नाच मंडळी झाली हो गोळा । सजुनी श्रीमंगलमूर्तिच्या सेवेला ॥ पायीं वाजूं दे घुंगुरवाळा । गौरीमंदिरांत नाचूं या चला ॥ कवि कृष्णकांत गातो गुणगान । सरस्वतीमातेच्या कृपेनं ॥

卐

गाणे १० वें

# मथुरेस श्रीकृष्ण गमन

( चाल- हिरव्या साडीस पिवळी किनार ग )

रथ उभा ग नंदाच्या दारीं । कोण आले ग यशोदेघरीं ॥
साऱ्या गोकुळीच्या गौळणी । आल्या धावत नंदा अंगणीं ॥
का ग यशोदे डोळ्यांत पाणी । सांग कोठें ग चक्रपाणी ॥
नंद सचिंत बसला दारी । कोण आले ग यशोदे घरीं ॥
बोले नंदाची पट्टराणी । माझ्या कृष्णाला समजवा कुणी ॥
अक्रूरासी धाडीला कंसानी । मथुरेसी निघाला चक्रपाणी ॥
झाली दुःखी हो गोकुळ नगरी । कोण आले ग यशोदे घरी ॥
निरोप देऊन यशोदेला । मथुरेस निघाला नंदलाला ॥
विनविती गौळणी कृष्णाला । नका जाऊं देवा मथुरेला ॥
दिसे भयाण यमुना तिरी । कोण आले ग यशोदे घरी ॥
रथ कृष्णाचा हो वेढीला । पडले साकडें कृष्णदेवाला ॥
गोपाबाळांच्या अश्रूनीं भिजली । सारी भूमि हो गोकुळांतली ॥
नाहीं वाजली आज बांसरी । कोण आले ग यशादे घरी ॥
देव बोले हो अक्रुराला । वेग हांक रथ आपुला ॥
घात अक्रूराने हो केला । गोकुळीचा हो सूर्य नेला ॥
झाली उदास गोकुळनगरी । कोण आले ग यशोदे घरीं ॥

卐

गाणें ११ वें

## प्रश्न

जो करी गर्जना अन् वल्गना । तोचि जाणावा उंठावरचा शहाणा ॥ एक नवल पुसतो तुला गड्या । नको मारूं उलट्या सुलट्या उड्या ॥ तिघे महापुरुष चालविती जगाचे गाडें । आकार याला नाहीं म्हणून दिसेना डोळ्यापुढें ॥ पहिला रूपाने पांढरा, दुसरा असें सावळा । तिसऱ्याला रंग नाहीं असे दोघाहुन वेगळा ॥ दोघे गिळती आयुष्य मानवाचें । तिसरा करी रक्षण प्राणीमात्राचे ॥ हा नव्हे गड्या बायकांचा उखणा । नका शोधुं उंठावरचा शहाणा ॥ म्हणे कृष्णकान्त शहाण्याला घातलें कोडें । ज्योतिषानें चोरीले अमुच्या अक्कलेचे धडे ॥

卐

गाणें १२ व

( गाणें ११ चें उत्तर )

शहाण्याचे पाय दिसती पाळण्यांत । चतुर जो बोले तोचि ओळखावा पंडित ॥ ऐकुन घ्या तुमच्या प्रश्नाचें उत्तर । नका फोडुं माथीं फुटकं खापर ॥ तिघा महापुरुषांचीं नांवें ऐका । दिवस अन् रात्र याचा आकार कुणी पाहिला कां ॥ दिवसाचें रूप पांढरे अन् रात्रीचे काळें । वायुचे रूप ते कुणी सांगा पाहिले ॥ दिवस अन् रात्रीच्या मापानें । घ्या मंडळीं

आयुष्य मोजुन ।। वायु जर कां कधीं कोपला । तर समजावा जगाचा कारभार संपला ।। म्हणे कृष्णकान्त घ्या उत्तर रोकडें । गणराया पुढें ठेवा सव्वाशेर पेढे ।

卐

गाणें १३ वें

## प्रश्न

करा नमन गौरीहराला । तोचि देईल स्फूर्ति आम्हांला ।।
ऐक माझ्या गुरुच्या मुला । सवालाचा बाण आम्ही सोडीला ।।
संभाळा गड्या आमुच्या प्रश्नाला । नको पळून जावूं घराला ।।
शनि देवाचे ऐकतां नांव । थरकांपती देव आणि मानव ।।
साडेसाती हो शनिची आली । भल्या भल्यांची कंबक्ती भरली ।।
अशा या प्रतापी शनिदेवाला । कोण वस्ताद त्याला हो भेटला ।।
कोणता उपाय हो त्यांनीं केला । अपुला करार सोडुन कां पळाला ।।
जग ब्रह्मचारी म्हणती त्याला । सांग नांव त्याच सभला ।।
धन्य धन्य त्या ब्रह्मचाऱ्याला । कवि कृष्णकांत हो शरण गेला ।।

卐

गाणें १४ वें

## जग हे सुखाचे सोबती

(चाल : रस्त्यात कारभार झाला)

शितासाठीं सारीं भुतें जमती । जग हे सुखाचे सोबती ।।धृ०।।
दोन दिवसांचा तूं प्रवासी । भिऊ नको तूं महासंकटासी ।।

वैर जगाचें ठेव तुजपाशीं । संकटकाळीं दूर सारे पळती ॥१॥
मित्र—मैत्रिणी भाऊबंध सगळे । गुळाभंवती फिरती हे डोंगळे ॥
हे सारे पैश्याचे खेळ रे सगळे । गाजराची पुंगी सारे वाजविती॥२॥
नको धरूं तूं दारूचें व्यसन । नको उधळुं जुगारांत धन ॥
नको विकूं तूं अपुले ईमान । काळ घाली घिरट्या तुझ्या भंवती॥३॥
सुखदु:खाची ही अमर जोडी। आयुष्याच्या होडीचे हे नावाडी ॥
नशिबाला जागविती हे हर घडी ।
सारे नकली मुखवटे जगाच्यारे पाठी ॥४॥

卐

## गाणें १५ वें

## ( गाणें १३ चें उत्तर )

भित्यापाठीं संकटे हजारों येती। मर्दापुढें संकटें माना झुकविती ॥
करा नमन गौरीमातेला । आशिर्वाद तिचा हो आम्हांला ॥
एकदां हनुमंताच्या राशीला । शनि देवाचा फेरा हो आला ॥
सात वर्षांचा करार ठरला । अंजनीचा पुत्र नाहीं हो डरला ॥
मोठ्या मानानें शनि देवाला । दिलें स्थान शिरीं बसायाला ॥
त्याच वेळीं वायू तनयाला । राम प्रभुनें निरोप धाडिला ॥
लंकेवर सेतू बांधण्याला । आज्ञा झाली रामाची मारुतीला ॥
झाले वानर सारे हो गोळा। त्यांत होता मारुति आघाडीला ॥
घेऊन मस्तकीं प्रचंड शिळा । सेतू बांधण्यांत मारुती रंगला ॥
मारुतीच्या विचित्र करणीला । शनि देव हो हैराण झाला ॥
काकुळतीने बोले हनुमंताला । खरा वस्ताद तूं भेटलास मला ॥

आम्ही जातों आमुच्या मार्गाला । नाहीं येणार तुमच्या राशीला ।।
बोले मारुती शनि देवाला । मागणें एकच द्यावे मजला ।।
माझे भक्त जे असतील त्यांना । नका देऊ घोर यातना ।।
मुकाट्याने शनि कबुल झाला । सात वर्षांचा करार सोडून पळाला।।
शनि प्रसन्न झाला मारुतीला । साऱ्या भक्तांना आनंद झाला ।।
नित्य शनिवारी मारुतीला । भक्त जाता शेंदूर तेल वहाण्याला।।
कृष्णाकांतानें प्रश्न फेडिला । दंडवत माझा श्रीहनुमंताला ।।

१६

## गोकुळची गौळण

(चाल भरजरीचा पितांबर दिला फाडून)

आज कसा सांपडला गोकुळीचा चोर। धरा बाई कुणीं तरी नंदाचा पोर।।धृ।।परवां ग आला आमुच्या घराला घराला । पाहून ग एकटी माझ्या सुनेला । जमवूनि गोपाळ धमकावी तिजला।। नंदाच्या पोराचे एका बाई थेर ।।१।। धरा बाई कुणीतरी नंदाचा पोर । शिंक्याला बांधली सुनेची ग वेणी । फासले ग तोंडाला तिच्या बाई लोणी । पहातांच मला बाई गेला पळूनी ।। पाळत ठेवूनि धरिला ग चोर ।।२।। धरा बाई कुणी तरी नंदाचा पोर । ठकाहूनी ठक महा ठक बाई । बुद्धीचा खोटा कपटी तसा बाई । करूनि बाई करणी दावी चतुराई ।। हैराण केलें यानें गोकुळी नगर ।।३।। धरा बाई कुणी तरी नंदाचा पोर । ह्याच्या ग खोड्या किती सांगु बाई । उपाय हरला आमुचा ग बाई । नंदयशोदेचा लाडका ग बाई ।।

यशोदेनें चढपून ठेवला ग पोर ॥ ४ ॥ धरा बाई कुणी तरी नंदाचा पोर । गवळण रचिली कृष्णकांतानें । नाचूं या सारे बंधुभावानें । गाऊंया सारे एका दिलानें । प्रसन्न होईल गौरीहर ॥ ५ ॥ धरा बाई कुणीतरी नंदाचा पोर ।

卐

गाणें १७ वें

## दशाअवतारी

विश्वचालक अनंत अवतारी । बहुरुपी उभा तो पंढरपुरी ॥ शंखासुरानें चार वेद चोरिले । तेहतीस कोटी देव काळजीत पडेल ॥ मत्स्य अवतार त्यानें धरीला । शंखासुर सहज हो मारीला ॥ चौदा रत्नें पडलीं समुद्रांत । हाःहाकार उडाला स्वर्गात ॥ कुर्म अवतार त्यानें धरीला । मंदराचळ पर्वत पाठीवर घेतला ॥ हिरण्याक्षानें अनर्थ केला । सागरांत बुडविली पृथ्वीला ॥ वराह अवतार त्यानें धरीला । दाढेवर संभाळली पृथ्वीला ॥ हिरण्यकश्यप छळूं लागला । विष्णुभक्त पोटच्या मुलाला ॥ नृसिंह अवतार त्यानें धरींला । महाविष्णुभक्त प्रल्हाद रक्षिला ॥ गर्व झाला हो बळीराजाला । त्रैलोक्य जिंकण्याचा विचार केला ॥ वामन अवतार त्याने धरीला । तीन पाऊलांत पाताळी धाडीला ॥ क्षत्रिय राजे उन्मत्त झाले । पापकर्मे राजरोस करूं लागले ॥ परशुराम अवतार त्याने धरीला । सर्व क्षत्रियांचा संहार केला ॥ रावणाने ठेविले देवाना मुठीत । तेहतीस कोटी देव करती झाडलोट ॥ श्रीराम अवतार त्याने धरीला । रावण कुंभकर्ण तो

मारीला । दुष्ट कंसाचा संहार करण्याला । देवकी मातेला मुक्त करण्याला ।। श्रीकृष्ण अवतार त्यानें धरीला । गोकुळांत दाविली अनंत लिला ।। भक्त पुंडलिकानें भक्तासाठीं । केलें भगवंतास उभे वाळवंटीं ।। बौद्ध अवतार घेऊनीं उभा । संतासगें रंगली चंद्रभागा।।पुढें लोक देवास विसरतील । साधुसंताचे होतील छळ।। पांडुरंग कलंकी अवतार घेईल । कलियुगाचा अवतार संपेल म्हणे कवि कृष्णकांत एकदां तरी। रुप विठोबाचे पाहुनी ये पंढरी ।।

卐

गाणें १८ वें

## प्रश्न

नका मारूं सभेला लटक्का गप्पा। समोर बसले गणपती बाप्पा । भर सभेंत प्रश्न पुसतो तुजशीं । नको काढूं उगाच उठा-बशी।। नाही याला रूप नाही याला आकार । वाऱ्याहून चपळ राजाहून थोर ।। तयाच्या हाती तुमची आमची शेंडी । साता समुद्रा पलीकडे याची असे उडी ।। कृष्णकांत म्हणे द्या ओळख करूनी लौकर । तुजपाशी आहे तयाचें हक्काचें घर ।।

卐

गाणें १९ वें

( गाणें १८ चें उत्तर )

## उत्तर

निंदा आणि स्तुती करी हे एकच मुख । बोलविता धनी पैसा हा जगीं एक ।। वाऱ्याहून चपळ राजाहून । थोर दोन अक्षरांत

पटवुनी घ्या उत्तर ॥ तुझें आहे तुज पाशीं । तूंच काढशी उगाच उठाबशी ॥ मनासारखा नाही कोणी राजा । कोणी ही घेऊं शकेना याचा कबजा ॥ मन हें चपळ मन हे थोर मन हा राजा । वाद कशाला हवा तुझा नी माझा ॥ म्हणे कृष्णकान्त ज्याचा मनावर नाहीं ताबा । त्याच्या जाणाऱ्या उलट्या बोंबा ॥

卐

गाणे २० वें

## प्रश्न

पायीं डसला विंचू अभिमानाचा । उलटा नाचे चेला भल्या गुरुचा ॥ एक नवल पुसतो मी तुला । लक्ष देऊनी ऐक गुरुच्या मुला ॥ तूं जन्मलास त्यावेळी तिही जन्मली । बारशाच्या वेळीं नाहीं तुला ती दिसली ॥ पतिव्रता नार ही नाहीं शोधूनी मिळणार । सती जाण्यास तुझ्या संगें असे ही तयार ॥ म्हणे कृष्णकांत जगीं तुम्ही चार दिवसांचे पाहुणे । घ्या साधून मोक्ष संतसंगतीनें ॥

卐

गाणें २१ वें

( गाणें २० चें उत्तर )

## उत्तर

आम्ही हरीचे दास नाहीं आम्हां अभिमान । संतसंगतीनें झालों आम्ही पावन ॥ देतों आम्हीं प्रश्नाचें उत्तर रोखठोक । पटवुनी घे नीट म्हणूं नको चूक ॥ तुझ्या जन्मावेळीं छाया ही

जन्मली । कोणी म्हाणती छाया कोणी म्हणती सांवली ।। जिथें जाशी तिथें तुझ्या असे मागें । तूं जग सोडुनी जातां तिही जाई तुझ्या संगें ।। ज्याची न पडे छाया तोची देव ओळखावा । म्हणे कृष्णकान्त हा चमत्कार पटवून घ्यावा ।।

卐

गाणें २२ वें

## कृष्ण लीला

( चाल—हिरव्या साडीस पिवळी किनार ग )

गवळीवाड्यांत बोभाट उठला ।।
म्हातारीच्या घरीं चोर घुसला ।। धृ० ।।

गोकुळीची एक म्हातारी । कृष्ण देवाची निंदा करी ।।
तिचा डोळा सदा कृष्णावरी । ठेवी पाळत सुनेवरी ।।

तिची खोडकी जिरवायाला । म्हातारीच्या घरी चोर घुसला ।। एके दिवशीं गेली म्हातारी । मथुरेच्या हो बाजारी ।। पहारे-करी ठेवून शेजारी । ठेवली हो सुनेला घरीं ।। पहारेकऱ्यांचा चुकवून डोळा । म्हातारीच्या घरीं चोर घुसला ।। संधी साधून कृष्णमुरारी । घुसला म्हातारीच्या हो घरी ।। सुनेला हो पाहूनि घरीं । करी तिची हो मस्करी ।। प्रीतीचा डाव खेळायला । म्हातारीच्या घरीं चोर घुसला ।। भर दुपारच्या प्रहरीं । परतुनी आलीं म्हातारीं ।। गेलीं नजर कृष्णावरी । पाहूनि हो सुने शेजारी ।। गेली तळव्याची आग मस्तकाला ।

म्हातारीच्या घरीं चोर घुसला ॥ धरुनी हो कृष्णाच्या कानीं । आणि ओढीत सुनेचा वेणी ॥ दोघांना हो घेऊनी निघाली । भर रस्त्यांत ऐटींत चालली ॥ लोक जमले मौज पाहण्याला । म्हातारीच्या घरीं चोर घुसला ॥ लोक मागें म्हातारी पुढें । आली मंडळी नंदाकडे ॥ सांगे गाऱ्हाणे यशोदेला । माझ्या अब्रुचा बोभाट केला ॥ सारा गांव खदखदून हसला । म्हातारीच्या घरीं चोर घुसला ॥ बोले हंसुनी यशोदा तिजला । नीट पहा गे आपुल्या मुलाला ॥ आणि विचार तुझ्या सुनेला । काय अपराध कृष्णानें केला ॥ तिचा गर्व हरण करण्याला म्हातारीच्या घरीं चोर घुसला ॥ मनीं जाणूनि कृष्ण लीला । झाली म्हातारी खजील मनाला । कृष्ण देवाचा महिमा कळला । गली शरण कृष्ण देवाला ॥ कृष्णकांताला गाणें रचायाला । म्हातारीच्या घरीं चोर घुसला ॥

卐

गाणें २३ वें

## संत एकनाथ

मांग महार आले मिळून । चाले नाथाघरीं भोजन ॥ पाट मांडोनि काढिली रांगोळी । एकनाथानें मांडियल्या पत्रावळी ॥ जेवण्यास बैसली मंडळी । एकनाथ वाढी तूप–पोळी ॥ नाथा घरीं भरी पाणी नारायण । चाले नाथा घरीं भोजन ॥ एकनाथाच्या हो घरी हरी । भक्तासाठीं करी चाकरी ॥ एकनाथ अन् देव मिळोनी । पाजिती गंगेचे निर्मळ पाणी ॥

सुगंधी वीडा देई नारायण । चाले नाथाघरीं भोजन ।। जेवुनिया तृप्त झाली मंडळी । नाथ काढी उष्टी पत्रा वळी ।। देवाचा भक्त लाडका एकनाथ । किर्तनी करती मांग महार साथ ।। हे नवल पाहूनीं रंगला नारायण । चाले नाथाघरीं भोजन ।।

गाणें २४ वें

## सासुबाई शिव्या कांहो देतां ?

( चाल—रूतला पायी कांटा )

सासुबाई आतां । शिव्या कांहो देतां ।। शरीर कांपें लटलटा म्हातारपणी आतां ।। नंदाचा हो पोरटा । रोज करी चेष्टा ।। म्हणोंनी कांहो बोलतां रोज फटाफटा ।। धृ० ।। होतां जेव्हां काळ तुमचा होता तेव्हा मान । आतां करती पदोपदी पोरें अपमान ।। दांत नाही मुखीं तरी मचमचा बोलता ।। १ ।। विनविते तुम्हां आतां अहो सासुबाई । गोकुळाच्या पोरांसंगे नका करूं दांडगाई ।। दिवस राहिले थोडे आयुष्याचे आतां ।। २ ।। अहो सासुबाई आतां पिकलें पान तुमचें ।। जातां जातां तरी करा चिंतन हरीचे ।। आवरा ग बाई आतां तोंडाचा हो पट्टा ।। ३ ।। म्हणे कृष्णकांत झांकली ही मूठ । म्हातारपण करी सारें गांवभर बोभाट ।। फुकटपणी माथी हा अब्रुला हो बट्टा ।। ४ ।।

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



# श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा
# बोधपर चक्री सामना

गाणें २५ वें

## गमन

पवित्र महिना श्रावण सरला । सप्तसुरांत नटुनी भाद्रपद आला ॥
बाल गोपाळ सजुनी आले । गणराया दारीं नाचाया जमले ॥
एका सुरांत गाउंया सगळे । एका ओळीने टाकूया पाऊलें ॥
आनंदे नाचूं भरल्या सभेला । सप्तसुरांत नटुनी भाद्रपद आला ॥
टाळ मृदंग मधुर गर्जती । शरण आलो तुज गणपती ॥
रुमझुम पायी घुंगूर गर्जती । जन्मोजन्मीं तुझी करीन भक्ती ॥
तिन्ही लोकां आज आनंद भरला । सप्तसुरांत नटुनी भाद्रपद आला ॥

卐

गाणें २६ वें

## विंचू डसला पायीं

आई ग ! देवारे ! विंचू डसला पायीं । चावटपणा कृष्णानें
केला ग बाई ॥ धृ० ॥ रोज रोज मागे फुकटांत लोणी ॥ दारीं

बसे ग धरणे धरुनी ॥ गोकुळांत रहाण्याची आतां सोय नाहीं ॥ १ ॥ घड्यांत विंचू कोनाड्यांत विंचू । फडताळांत विंचू घरभर विंचू ॥ पाय उचलेना जागचा ग बाई ॥ २ ॥ सासूच्या धाकानें दिलें नाहीं लोणी ॥ विंचवानी केली ग दे माय धरणीं ॥ सासूबाईना कुणी तरी बोलवा ग बाई ॥ ३ ॥ विंचवांनी घरभर नाचविलें मजला । गाडग्या–मडक्यांनीं ताल हो धरिला ॥ पायींचा पैंजण तुटला ग बाई ॥ ४ ॥ कुणी तरी सांगा हो श्रीरंगाला । तोचि उतरील विंचवाचा चाळा ॥ किती साळसूद हरी हा ग बाई ॥ ५ ॥

卐

गाणें २७ वें

## लंका दहन

रामाचा दास अंजनीचा बाळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ राम आज्ञा घेऊनी मारुती निघाला । जानकीच्या शोधासाठीं वणवण फिरला ॥ अंगद, नळ, निळ अन् जाबुवंत । तेही निघाले सितेच्या शोधांत ॥ रामाचा दास अंजनीचा बाळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ सागर तीरी जमुनी वानर । सिते शोधाचा हो करती विचार ॥ संपातीनें खबर दिली मारुतीला । रावणानें लंकेंत ठेवली सितेला ॥ आनंदला मनीं अंजनीचा बाळ । त्याने लंकेंत केली कमाल ॥ पवन वेगें मारुती उडाला। लंकेंत घरोंघरीं शोधी सितेला ॥ मंदोदरी आणि सुलोचनेच्या मंदिरांत । नीट निरखूनी पाही हनुमंत ॥ क्रोधानें

उठला अंजनीचा बाळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ पुच्छ तडाख्याने राक्षस बडविले । गगनांत फेकली असुरांचीं मुलें ॥ लंकेच्या प्रजेला नंगे करून सोडले । घरदारें सारीं लाथेनें पाडिलीं ॥ आला रावणमंदिरांत अंजनीचा बाळ । त्यानें लंकेत केली धमाल ॥ करीत होता न्हावी दाढी रावणाची । हळुच शेंडी ओढली न्हाव्याची ॥ रावणाची अर्धी मिशी झाली सपाट । रावण बडवी न्हाव्याला फुकट ॥ रावणाची दाढी धरुनी नाचे बाळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ रावण गर्जूनी बोले सेवकाला । धरा हो धरा ह्या मर्कटाला ॥ मारुतीला धराया सेवक धावले । मारुतीनें चेंडूगत साऱ्यानां खेळविले ॥ रावणाच्या तोंडाला फासूनी काजळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ रावणाच्या सभेंतून मारुती उडाला । अशोक वनांत पाहिली सितेला ॥ रामाची हो मुद्रीका देऊनी जानकीला । श्रीराम गायनी नाचूं लागला ॥ सितेला ओळखिला अंजनीचा बाळ । त्यानें लंकेत केली धमाल ॥ बोले हनुमंत जानकी मातेला । उद्यां येतील श्रीराम लंकेंला ॥ मारुनी रावण आणि कुंभकर्ण । नेतील तुम्हां श्रीराम सोडवून ॥ अशोक वनांत घातला गोंधळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ इंद्रजितास नंगा करून सोडला । वज्र देही आटोपेना कुणाला ॥ शेवटीं विनंती करी रावण ब्रह्माला । तुम्ही धरा हो त्या वानराला ॥ ब्रह्मपाशांत ब्रह्मानें धरीला बाळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ रावण पूसे अंजनीच्या बाळाला । तुझें मरण कशांत ते सांग आम्हांला ॥ हनुमंत बोले ऐक मूर्ख रावणा । चिरंजीव मी ठाऊक सर्वांना ॥

रावणास पटेना मारुतीचे बोल । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ तेव्हां मारुतीनें लटकें दिलें सांगून । पुच्छ पेटवा वस्त्रें गुंडाळून ॥ सेवक वस्त्रें गुंडाळती पुच्छाला । लंकेत वस्त्रांचा तुटवडा पडला ॥ जानकीचा वस्त्रांचा केला सांभाळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ स्पर्श करीना अग्नी पुच्छाला । फुंकर माराया रावण उठला ॥ दाढी मिशी रावणाची पेटली । साऱ्या लंकेची केली त्यानें होळी ॥ दशमुखी रावणास चारुनी धूळ । त्यानें लंकेंत केली धमाल ॥ मारुती निघूनी सुवेळीं आला । जानकीची खुशाली सांगे रामाला ॥ लंकेंत सितेचा शोध लागला । राम-लक्ष्मणास आनंद झाला ॥ कृष्णकान्तानें जिंकीली बिकट वाटचाल । ज्योतिषानें सभेंतून काढिला पळ ॥

卐

## गोपाळांची तक्रार

( चाल-हिरव्या साडीला पिवळी किनार ग )

तूं गोकुळीच्या पाटलाचा लेक । नाहीं तुला कुणाचा हो धाक ॥ तूं श्रीमंत पाटलाचा बाळ । आम्हीं भोळे गरीब गोपाळ ॥ तूं जादूगार मुरलीवाला । भवती सदा गावळणींचा मेळा ॥ आईबापाचा लाडका तूं लेक । नाहीं तुलाही कुणाचा धाक ॥ दह्यादुधाची करुनि चोरी । गारुड्यागत देतोस तुरी ॥ चोर सोडूनि संन्याशाला । लोक बडविती फुकां आम्हांला ॥ लोक करिती तुझेंच कौतुक । नाहीं तुला कुणाचा हो धाक ॥

कृष्णा संभाळ तुझ्या रे गाई । तुझी संगत नको रे भाई ।। गोपाळाचें हें लटकें भांडण । कृष्णकान्त लावी हटकून ।। तूं ठकाहूनी महाठक । नाहीं तुला कुणाचा हो धाक ।।

卐

गाणे २९ वें

## सती महानंदा

बोला हरहर शिवशंकर । जय डमरूधर जय गंगाधर ।। महानंदे घरी आला एक सौदागर । तो होता साक्षांत शिवशंकर ।। महानंदा कुशल नर्तकी अतिसुंदर । नंदीग्राम देशांत होती. महशूर ।। बोला हरहर शिवशंकर । जय डमरुधर जय उमाशंकर ।। नित्य पुजी दैवत शिवशंकर । सती म्हणून ओळखे सारे नगर ।। महानंदेची किर्ती गेली कैलासावर ।। सत्त्व पाहण्याला आला डमरुधर ।। बोला हरहर शिवशंकर । जय डमरुधर जय गंगाधर ।। तिचा नियम होता एक खडतर । जो येई रात्रीपुरता तोची परमेश्वर । होती जातीने वेश्या ती नार । बाणा पतीव्रतेचा खरोखर ।। बोला हरहर शिवशंकर । जय डमरुधर जय भोळाशंकर ।। सौदागरच्या भाळली रुपावर । हाती धरोनी बैसविलें मंचकावर ।। महानंदा उभी कर जोडुनि समोर । मनिं रचिला शिवानें बेत मनोहर ।। बोला हरहर शिवशंकर । जय डमरुधर जय गंगाधर ।। झाला सौदा रत्नकंकणावर । आत्मलिंग ठेवूनी तिच्या हातावर ।। बोले महानंदेशी सौदागर । औक्ष

माझें अवलंबून ह्या वस्तूंवर ॥ बोला हरहर शिवशंकर । जय डमरूधर जय-गंगाधर ॥ आत्मलिंग जपून ठेविले फडतळावर । महालांचे दिप विझले मारतां फुंकर ॥ मध्यरात्रींचा हो उलटला प्रहर । आग लागूनी भडकले महानंदेचें घर ॥ बोला हरहर शिवशंकर । जय डमरूधर जय गंगाधर ॥ आत्मलिंग त्यांत जळालें हरहर । मूर्च्छित पडला सौदागर भूवर ॥ सौदागराने महानंदेसमोर । देह ठेविला हो जळत्या चित्तेवर ॥ बोला हरहर शिवशंकर । जय डमरूधर जय गंगाधर ॥ तो दोन घडीचा हो सौदागर । महानंदेनें शोक मांडिला अपार ॥ घेतली उडी महानंदेनें चित्तेवर । मुखी ललकारूनी जयशंकर ॥ बोला हरहर शिवशंकर । जय डमरूधर जय गंगाधर ॥ झाला प्रगट अग्नितून शंकर । महानंदेला झेलली वरच्यावर ॥ दिला महानंदेला शंकराने वर । सती म्हणोनि होईल तुझी किर्ती अमर ॥ बोला हरहर शिवशंकर । जय डमरूधर जय गंगाधर ॥ सर्वस्वी वाहिलें शिवचरणावर । त्रैलोकीं झाला सतीचा जयजयकार ॥ सती महानंदा शब्द होईल साकार । गुणगान तिचें पतितांना आधार ॥ कृष्णकांत म्हणे कृपा असावी आम्हांवर । चरणीं तुझ्या सदैव जुळती कर ॥ बोला हरहर शिवशंकर । जय डमरूधर जय उमाशंकर ॥

卐

गाणें ३० वें

# नामदेव—गुरु प्रकरण

सांपडलं रे गड्या सांपडलं। कच्चं मडकं गड्या सांपडलं॥ गोरोबा काकाने शोधिला। गुरुविणा कच्च्या नामदेवाला॥ एकें दिवशी तेरढोकी गांवाला। गोऱ्या कुंभाराच्या अंगणाला॥ संतमेळा जमला विश्रांतीला। गुरु—चेल्यांचा प्रश्न निघाला॥ ज्ञानदेव सांगे गोऱ्या कुंभाराला। शोधूनि पाहे कच्चा मडक्याला॥ ऐकून आज्ञा गोरोबा उठला। घेऊनि थोंपटणें सारी एकेकाला॥ संतमंडळींत गोरोबा फिरला। शेवटी नामापाशीं तो आला॥ थोपटण्याचा प्रसाद नामाशीं दिला। पाहुनि प्रकार नामा कोपला॥ गोरोबाशीं टाकूनि नामा बोलला। काय हा पोरखेळ तुम्ही मांडिला॥ गोरोबा बोले ज्ञानदेवाला। जन्मा येउनि फुकाच जगला॥ गुरुविण नामा अज्ञान हो राहिला। कच्च्या मडक्याचा शोध लाविला॥ ऐसें वचन गोरोबा बोलला। संत मंडळींत हंशा हो पिकला॥ नामा रागानें उठोनि हो गेला। तडक देवापाशीं तो आला॥ सारा वृत्तांत दिला सांगोनि देवाला। कच्चं मडकं म्हणें कुंभार मला॥ देवानें उपदेश केला नामाला। गोरोबा सत्य जे तुझशी बोलला॥ गुरुमंत्रविणा तुझ्या भक्तिला। अर्थ नाहीं तुझ्या शब्दाला॥ नामदेव पुसे पांडुरंगला। कोण्या गुरुपाशीं धाडितां मला॥ बोलले पांडुरंग नामदेवाला। जावें आंवढ्या नागनाथाला॥ विसोबा खेचर गुरु तो भला। तोचि गुरु तुझ्या दैवी दिधला॥

विसोबा खेचराशीं गुरु हो केला । पूर्ण ज्ञानी नामा तो झाला ।।
कवि कृष्णकांत सांग तुम्हाला । संकट माझा गुरु पहिला ।।

गाणें ३१ वें

## गोकुळीचा हरी चोर ठरला

गणेश चतुर्थीचा चंद्र पाहिला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।।
एके दिवशीं कृष्ण सभेंत । आला अवचीत राजा सत्राजीत ।।
राजा सत्राजीताच्या गळ्यांत । स्यमंतक रत्न होते झळकत ।।
मणीं नारदाच्या मनांत भरलां । गोकुळीचा हरी चोर ठरला ।।
सहज बोलला नारद राजाला । तो मणी भेट द्या श्रीहरीला ।।
मणी देईना तो श्री कृष्णाला । अखेर नारदाचा उपाय हरला ।।
सत्राजीत अपमान करूनी गेला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।। एके दिवशीं सत्राजीताच्या बंधुला । वनीं सिंहानें त्यास मारीला ।। गेला सिंहाच्या पोटांत तो मणी । त्यांची शिकार केली जांबुवंतांनी ।। सत्य नव्हतें मारीत कुणाला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।। भरल्या यादव सभेंत कृष्णाला । फडफडा सत्राजीत तो बोलला ।। मण्यासाठी मारूनी माझ्या बंधुला । लोका दाविशीं नामा निराळा ।। साथीदारही नारदमुणी ठरला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।। भरसभेंत सत्राजीत राजाला । वचन देऊनी श्रीहरी बोलला ।। त्रैलोक्य सारे पालथे घालून । तुझा मणी तुला देइन शोधून ।। बलरामाला हीं संशय आला ।

गोकुळीचा हरी चोर ठरला ।। मण्यासाठीं हरी वणवण फिरले । दोन प्रेतें दृष्टीला पडले ।। सिंह आणि प्रसेनजीतास पाहुनी । बांधीली हरीने कल्पना मनी ।। पावलांच्या खुणा सांगती हरीला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।। दुर उभा राहूनी पाहे चक्रपाणी । एक सुंदर बाळ खेळे अंगणी ।। कंठी झळके सत्राजाताचा मणी । जांबुवंत उभा नजर रोखूनी ।। देव ललकारी त्या जांबुवंताला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।। दोघांची भीडली नजरेला नजर । जांबुवंत तुटुन पडला कृष्णावर ।। मल्ल युद्धांत जिंकुनी जांबुवंताला । सत्राजीत राजाचा मणी मिळविला ।। जांबुवंताने कन्या दिली श्रीहरीला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।। मणी मिळाला सत्राजीत राजाला । दिली कन्या सत्यभामा श्रीहरीला ।। मणी अहेर लग्नांत मिळाला । सत्राजीताचा संशय फिटला ।। अखेर सत्याचा विजय हो झाला । गोकुळीचा हरी चोर ठरला ।।

卐

गाणें ३२ वें

## प्रश्न

मुर्खांची बडाई गाजराची पुंगी । चोरांचा लढाई सन्याशाची लुंगी ।। नमन माझें श्रीगणरायाला । मति द्यावी मज गुण गाण्याला ।। ऐक माझ्या गुरुच्या मुला । जाब देई माझ्या प्रश्नाला ।। वाली सुग्रीवाचा जन्म कोणत्या ठाई झाला । सांगून द्या यावेळीं आम्हांला ।। तयाच्या पुरुषरुपी मातेला । कोण्या कारणें

स्त्री-रूप आला ॥ बाप दोघें वालीसुग्रीवाला । तयाचीं नांवें सांगा सभेला ॥ गाणें रचिलें मुंबई शहराला । कवी कृष्णकांत सांगे तुम्हांला ॥ विचारून यावें आपुल्या गुरूला । नाहींतर पळा आपुल्या मार्गाला ॥

卐

गाणें ३३ वें

## ( गाणें ३२ चें उत्तर )

आलिया भोगासी असावें सादर । असावें शेजारी-मंबाजीचें घर ॥
शुभ प्रसंगीं नमू गणरायाला । त्याच्या कृपेनें गातो सभेला ॥
एके दिवशीं शिव लोकाला । ब्रह्मपुत्र ऋक्ष गेला स्नानाला ॥
पार्वतीचा शाप होता तळ्याला । म्हणून ऋक्षराज स्त्रीरुप झाला ॥
स्त्रीरुप तयाला सुंदर जडलें । देखूनी इंद्र सूर्य कामातूर झाले ॥
भोग दोघांचें अपुरे राहिले । वीर्य तिच्या मस्तकीं पडलें ॥
इंद्रापासूनि वाली जन्मला । सूर्यापासूनी सुग्रीव झाला ॥
कवि कृष्णकांतानें प्रश्न फेडिला । मंबाजी रुसून कोपऱ्यांत बसला ॥

卐

गाणें ३४ वें

# भर्तृहरी आणि पिंगला

एके दिवशीं पिंगलेच्या महालीं । राजा भर्तृहरीची स्वारी गेली ॥ सहज बोलली पिंगला भर्तृहरीला । काया, वाचा, मन वाहिलें तुम्हांला ॥ विधवेपण जर आलें कपाळीं । प्राण-

त्याग करीन मी त्याचवेळीं।। पिंगला राणीचें सत्व पहाण्याला। भर्तृहरी राजानें निश्चय केला ।। दुसरे दिवशी गेला शिकारीला। जिवंत मृग त्यानें मारीला ।। मुगूट वस्त्रें भिजवून रक्तांत। एका सेवकाच्या दिली हातांत ।। झूट वार्ता पढवूनी त्याला। पिंगलेच्या महाली राजानें धाडिला ।। म्हणे स्वामी अमुचे गेले। शिकार करतां सिंहानें मारिलें ।। वार्ता एकतां राणी। मूर्च्छित होऊनी पडली धरणी ।। तिने शब्द खरा केला अखेर। राणी सती गेली खरोखर ।। सती गेली महाराणी पिंगला। वर्तमान कळले भर्तुहरीला ।। स्मशानांत भर्तृहरी धावला। त्यानें पिंगलेसाठी शोक मांडिला ।। बारा वर्षे स्मशानांत बसुनि। ध्यास राणीचा धरीला मनीं ।। हे वर्तमान कळले श्री दत्तगुरूला। त्यानें धाडिला गोरख-नाथाला ।। गोरखानें पाहिला भर्तृहरीचा शोक। मग नाथानें केलें कपट नाटक ।। एक विचित्र मडकें फोडिलें समोर। लटक्या शोकानें बडवी उर ।। विचित्र शोकांस भर्तृहरी हंसले। गोरखनाथास मुर्खांत काढीलें ।। योगी म्हणवितां तुम्हीं स्वतःला। कवडीची अक्कल नाही तुम्हांला ।। उलट पुसे गोरख भर्तृहरीला। तुमचा खटाटोप हा कुणासाठीं सगळा ।। वृत्तांत सांगे भर्तृहरी गोरखनाथाला। माझ्यासाठीं पिंगलेनें देह ठेविला ।। किती गुण ते सांगावे तुम्हांला। अप्सरेसमान होती राणी पिंगला ।। तात्काळ गोरख राजास बोलला। या मडक्याची सर नाहीं तुझ्या राणीला ।। लक्षावधी पिंगला

देईन तुम्हांला । काय हरता सांगा यावेळीं मला ॥ योगीचा चमत्कार म्हण्याला । भर्तृहरीनें राज्य लाविलें पणाला ॥ नाथानें कामिनी अस्त्राचा जप केला । प्रगट झाल्या लक्षावधी पिंगला ॥ भर्तृहरी राजा चकित झाला । शरण गेला गोरखनाथाला ॥ बाराशें स्त्रियांचा धिःकार केला । राज्य सोडुनी वैरागी बनला । म्हणे कृष्णकांत जो संसारी गुंतला । त्यानें सांगू नये बढाई आम्हांला ॥ ज्याने केला संसार बिन बोभाट । तोचि खरा बहुरूपी चतूर नट ॥

**भाग ३ रा समाप्त**


विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी !

लेखक :—कवि कृष्णकान्त खाडे

यांच्या लेखणीतून सकार झालेली संत मालिका

**पुंडलिक वरदे हरि विठ्ठल**

पंढरीचे संत आणि महाराष्ट्राचें पूज्य दैवत श्री विठ्ठल यांचे आकर्षक रसाळ चरीत्र

किंमत ३० पैसे

चंद्रभागेचे पवित्र मुखपृष्ठ

प्र का श क :—

कवि कृष्णकान्त खाडे

१८० बी, गायवाडी, गिरगांव, मुंबई—४.

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग ४ था

गाणें २५ वें

## जय गौरी माता उदो !

आई अंबाबाई उदो । जय गौरी माता उदो ॥
आज गौरी आल्या घरीं । नाचती भक्तमंडळीं दारीं ॥
आई तुळजा माता उदो । जय कोंकण देवी उदो ॥
जागवूंया गौरी आज रात्रीं । गणरायाच्या मंदिरीं ॥
आई महालक्ष्मी देवी उदो । जय सप्तशृंगी उदो ॥
तुमच्या भक्तीचा घालाया गोंधळ । आले धांवत बालगोपाळ ॥
आई सरस्वती देवी उदो । जय रुक्मिणी माता उदो ॥
म्हणे कृष्णकांत चरणीं लागून । तुम्हांवांचुनी तारील कोण ॥
आई शितळा देवी उदो । जय मुंबादेवी उदो ॥

गाणें ३६ वें

## सलामीचा–सामना

काय राव बघतां पानसुपारीची चंची उघडा ।
सभेंत रंगू द्या प्रश्न उत्तरांचा पंचरंगी विडा ।।
पान चुना सुपारी कात आणि तंबाकूं ।
खेळीमेळीनें तुम्ही आम्ही भक्तिचा धडा शिकूं ।।
काम, क्रोध, मोह हे दुर्गुण समुद्रांत फेकूं ।
शिवाशिवी आणि भेदभावाचे भूत गाडून टाकूं ।।
म्हणे कृष्णकान्त बुद्धी आणि ज्ञानाचें दार उघडा ।
सभेंत रंगू द्या प्रश्न उत्तरांचा पंचरंगी विडा ।।

卐

गाणें ३७ वें

## महाबळ ज्योतिषाची फजिती

( चाल- हिरव्या साडीला पिवळी किनार ग )

नंदा घरीं हो ज्योतिषी आला। तोचि महाबळ दैत्य हो पाहिला ।। आला ज्योतिषी गोकुळांत । सांगे लोका ज्योतिष फुकटांत ।। बायका पुरुष नादी हो लागले । भले भले भालजी हो भुलले ।। असा ज्योतिषी गोकुळांत शिरला ।। तोचि महाबळ दैत्य हो पाहिला ।। आला ज्योतिषी नंदा घरीं । लोक जमले नंदाच्या दारीं ।। यशोदेने हो हातीं दिली । बाळकृष्णाची कुंडली ।। बोटें मोजूनि सांगे यशोदेला । तोचि महाबळ

दैत्य हो पाहिला ॥ ऐक यशोदे तुझा ग बाळ । चोर कपटी होईल शिंदळ ॥ कुळ–घातकी हा ग पोरटा । आईबापाशीं लावील बट्टा ॥ बुडवा यमुनेंत सांगे यशोदेला । तोचि महाबळ दैत्य हों पहिला ॥ घडलें नवल त्याच वेळीं । आलें लाटणें बसलें कपाळीं ॥ करी प्रहार मुसळ–उखळी । पळतां भुई थोडी झाली ॥ नागवा पळत रस्त्यांतून सुटला ॥ तोचि महाबळ दैत्य हो पहिला ॥ गाडग्या मडक्यानीं हो झोडपून । ज्योतिषाची केली दाणादाण ॥ बाळकृष्णाशीं शरण गेला । जीवदान दिलें ज्योतिषाला ॥ कंस मामानें माराया धाडीला । तोचि महाबळ दैत्य हो पहिला ॥

卐

गाणे ३८ वें

# संत जनाबाई

(चाल :– भरजरीचा पितांबर दिला फाडून )

भल्या पहाटें कुणकुण उठली पंढरीला ॥ विठ्ठलाचा नवरत्नी हार कुणीं चोरीला ॥धृ०॥ नित्य रात्रीं देव दळी जनीच्या घरीं ॥ भक्ताचिया प्रेमासाठीं करी देव चाकरी ॥ एके रात्रीं राहिला तो हार जनीच्या घरीं ॥ भल्या पहांटे देव उठोनि गेले पंढरीला ॥१॥ विठ्ठलाचा नवरत्नी हार कुणी चोरीला ॥ प्रा:तकाळीं बडव्यानां खबर लागली ॥ विठ्ठलाच्या अंगावर जनीची हो कांबळी ॥ समईच्या वातीवर धरली हो काजळी ॥ रक्षक सारें धांवले चोर शोधायला ॥२॥ विठ्ठलाचा नवरत्नी

हार कुणीं चोरीला ।। सांपडला हार तो जनाबाईच्या घरीं ।। उभी केली तिजला पंचाच्या दरबारीं ।। सभेला हो पंढरीचे होते मानकरी ।। पंचाने न्याय दिला द्या सुळीं जनीला ।।३।। विठ्ठलाचा नवरत्नीं हार कुणीं चोरीला ।। चंद्रभागातीरी सूळ उभा केला ।। अपार जमला संतांचा हो मेळा ।। जनीनें विठ्ठलाचा धांवा हो मांडीला ।। येग येग विठाबाई सोडवी मला ।।४।। विठ्ठलाचा नवरत्नी हार कुणीं चोरीला ।। जनीच्या हांकेला पांडुरंग धांवले ।। लोखंडी सूळ चंद्रभागेने गिळले ।। संतांनी नवल ते डोळ्यांनीं पाहिले ।। जनाची हो भक्ती कळली पंढरीला ।।५।। विठ्ठलाचा नवरत्नी हार कुणी चोरीला ।।

गाणें ३९ वें

# संत चोखामेळा

पांडुरंग महारा घरीं जेवला । सोवळेवाले म्हणती देव बाटला ।। चोखा जाई रोज पंढरीला । घडेना पांडुरंगाचें दर्शन त्याला ।। सोवळेवाले चोखोबास हांकलती। अश्रू ढाळीं पांडुरंग विटेवरती।। संताची काळजी सारी पांडुरंगाला । सोवळेंवाले म्हणती देव बाटला ।। गांवाबाहेरच्या झोपडींत चोखोबा । विनवी दर्शन दे एकदां विठोबा ।। भक्त चोखामेळ्याच्या भेटीला । पांडुरंग हो धांवून गेला ।। दिलें दर्शन चोखा महाराला । सोवळेवाले म्हणती देव बाटला ।। देव चोखामेळ्याच्या अंगणांत । बसले जेवाया वडाच्या सांवळींत ।। सांगे चोखा

आपल्या बायकोला। दहींभात वाढ पांडुरंगाला ॥ चोखा भरवी घांस विठोबाला। सोवळेवाले म्हणती देव बाटला ॥ दूर उभा होता एक देवाचा पुजारी। त्यानें नवल पाहिलें तें महारा घरीं ॥ वडांवरच्या कावळ्यास चोखा बोले। दूर जा बा देव जेवायास बैसले ॥ कावळा डहाळीवरून उडाला। सोवळेवाले म्हणती देव बाटला ॥ चोखा बोलला सहज कावळ्याला। पण तो शब्द पुजाऱ्यास लागला ॥ चोखा मेळ्याच्या मारली तोंडांत। देव उठले गाल चोळीत ॥ देवाचा पितांबर दह्याने माखला। सोवळेवाले म्हणती देव बाटला ॥ चमत्कार झाला इकडे राउळीं। विटेवरी रमाकांत अश्रू ढाळीं ॥ सुज दिसे डाव्या गालावरती। अपराधाची कबुली पुजारी देती ॥ झाला चोखोबास दरवाजा मोकळा। सोवळेवाले म्हणती देव बाटला ॥ म्हणे कृष्णकांत सर्वांचा हो पांडुरंग। कां करितां सोवळ्याचें ढोंग। तुझा नि माझा देह नाहीं वेगळा। एकाच मातीतून देह हा घडला ॥ जातीमुळें जगी माजला घोटाळा। सोवळेवाले म्हणती देव बाटला ॥

卐

गाणें ४० वें

## प्रश्न

सज्जनांच्या बैठकी सुखदुःखाच्या गोष्टी। मुर्खाच्या हो बैठकी चोरांची बोंब उलटी ॥ एक माझ्या कवीच्या मुला। एक

सवाल पुसतो तुजला ॥ स्वर्ग आणि मृत्युलोकांत। तिची वस्ती तिन्ही जगांत ॥ तिचा मान हो सूर्ख लोकांत। सज्जन लोक न करती साथ। ही रंगेल बया आली कधीं घरांत। घरची लक्ष्मी करी हो आकांत ॥ हिच्यासाठीं कित्येक लोक। माणुसकीला झाले हो पारखे ॥ हिच्या सापळ्यांत गडी कधीं फसला। भरला संसार त्याचा बुडाला। होई पुरता कर्जबाजारी। कुणी पाहिना ढुंकून शेजारी ॥ ही कोण बया हो सांगा सभेला। सांग रंग तिचा लाल का पिवळा ॥ हा गूढ प्रश्न आहे थोडा खरा। करूं नको तूं सभेंतून पोबारा ॥ कवि कृष्णकांत सांगे तुम्हांला। आजकालच्या पुराणांत पाही रे दाखला ॥

卐

गाणे ४१ वें

## उत्तर

[ गाणें ४० चें उत्तर ]

व्यसनाच्या नादा संसार बुडाला। समाजांत पत गमावून बसला ॥ ही बया नव्हे वेश्या नव्हे पैसा। नको घालूं रे गावाला वळसा ॥ देव आणि दानवांनीं मिळुन। क्षीरसागरी केले हो मंथन ॥ चौदा रत्नें काढिली घुसळून। देवदानवांत हो लागले भांडण ॥ एक पंडिता जबाब फक्कडसा। नको घालूं रे गांवाला वळसा ॥ हालाहल पचविले शंकरांनीं। अमृत पळविलें स्वर्गात देवांनीं ॥ कपट केलें देवानीं मिळूनीं।

दानवांना दिली हो मदिरा मोहिनी ।। कशाला हातच्या कंकणाला आरसा । नको घालूं रे गांवाला वळसा ।। हिच्या जाळ्यांत फसला मानव । नाहीं सुटले ऋषी अन् देव ।। हिनें घेतले कित्येकांचे जीव । लागले भिकेला अनेक मानव ।। हिचा रंग लाल वास उकीरडा जसा । नको घालूं रे गांवाला वळसा ।। लोक दारूच्या नादीं लागले । सट्टा जुगार खेळाया शिकले ।। व्यसनापायीं कर्ज करून बसलें । घरदार सावकारानी लुटलें ।। कृष्णकान्त करी प्रश्नाचा खुलासा । नको घालूं रे गांवाला वळसा ।।

★

गाणें ४२ वें

# नारदाचें गर्वहरण

सुस्वर गाणारा मीच भला । गर्व झाला हो नारदाला ।। जांबूवंतीच्या लग्नावेळीं । सांग नारदास वनमाळी ।। अस्वल मंडळीं जमली सभेला । तुमचे गायन ऐकण्याला अस्वल मंडळीस पाहुनी हंसला । गर्व झाला हो नारदाला ।। बोले नारद भरल्या सभेंत । काय गाऊं मी अस्वल मंडळींत ।। जसें बहिऱ्या पुढें गायन । तसें या मंडळींत माझें गायन ।। आमचा मान हो गंधर्व सभेला । गर्व झाला हो नारदाला ।। नारदाची ही गर्विष्ठ वाणी । ऐकून घेतली कृष्णदेवानी ।। नेत्रसंकेत कृष्णाने केला । एक अस्वल बसले गाण्याला ।।

नारदाचा हो तंबोरा घेतला । गर्व झाला हो नारदाला ॥
त्या रीतीनें लाविले सप्तसुर । झाले तल्लीन गंधर्व अन् किन्नर ॥
एका रीसानें वाजवूनि मृदुंग । केली सर्वांची मती गुंग ॥
नारद सर्पांगत डोलूं लागला । गर्व झाला हो नारदाला ॥
एकाएकी चमत्कार झाला । नारदाचा वीणा भूमींत रुतला ॥
कृष्ण विचारी नारदाला । गायन रुचले कां हो तुम्हांला ॥
अस्वल मंडळींत दिसली कला । गर्व झाला हो नारदाला ॥
कृष्ण सांगे नारदास गाण्याला । वीणा उचलाया नारद गेला ॥
वीणा पुरता रुतून बसला । वीणा निघेना हो नारदाला ॥
दे देवा तंबोरा माझा मला । गर्व झाला हो नारदाला ॥
दुसरा रीस बसला गाण्याला । त्यानी वीणा हो काढून दिला ॥
नारदाचा हो तोरा जिरला । गेला शरण कृष्णदेवाला ॥
कृष्णकांत हात जोडी गर्वाला । गर्व झाला हो नारदाला ॥

卐

गाणे ४३ वें

## गोकुळचा चोर

(चाल :-नाचरें मोरा आंब्याच्या वनांत)

चोर बाई चोर नंदाचा पोर, करी शिरजोर ॥ धृ० ॥
मी यमुनेला गेले पाणी भराया ।
घरांत चोर घुसला लोणी चोराया ॥
जणूं घरचा धनी । खाई जसा लोणी ।
किती बाई हा धाडशी चोर ॥ १ ॥

काय हो तुम्ही चक्रपाणी ।
कुणा घरचे खाता हो लोणीं ? ॥
काय तुझ्या बापाचा । झाला ग तोटा ।
मलाच धमकावी हा उलटा चोर ॥ २ ॥
जितकीं घरें हो आकाशा खालीं ।
माझीच सारीं म्हणे ग वनमाळीं ॥
शरीर देखीलें तुझें नाहीं । खुशाल सांगे बाई ।
उपाय माझा हरला खरोखर ॥ ३ ॥

卐

गाणें ४४ वें

## प्रश्न

मिया मूठभर बोंब गांवभर । बायकोच्या जिवावर ज्योतिषी सुभेदार ॥ सांभाळा आमुचा प्रश्नाचा बाण । उत्तर देऊनी सभेचे करा समाधान । शंकराच्या नंदीची सांगा जन्मकथा । किती देवानें दिला त्यास शक्तिचा वाटा ॥ नंदीच्या जन्माचे कारण सांगा । पुराण वाचून पुन्हा एकदां बघा ॥ म्हणे कृष्णकान्त ज्यानें माझें भविष्य वर्तविलें । त्याच्या अक्कलेचें दिवाळें चौघांत वाजलें ॥

卐

गाणें ४५ वें

## उत्तर

( गाणें ४४ चें उत्तर )

बुवा मूठभर दाढी हातभर। चेले टोपलीभर बोंबलती गांवभर ॥ ऐका शिखी ऋषिचा इंद्रानें अपमान केला। इंद्राची खोड मोडण्याला शिखीने तप मांडिला ॥ ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन केली इच्छा पूर्ण। नंदीचा जन्म झाला शिखी ऋषिच्या शेंडींतून ॥ वरुण अग्नी आणि वायु यांनी तर। आपुल्या शक्तिचा वाटा देऊन केलें अमर ॥ या नंदीने इंद्र आणि विष्णुस युद्धांत हरविलें। नंदीचा पराक्रम पाहुनी शंकरानें जवळ केलें ॥ म्हणें कृष्णकान्त पाहुनी बुवाबाजीची सोंगे। आडाणी भोळें लोक लागती मागें ॥

卐

गाणें ४६ वें

## प्रश्न

पंढरीस गेला पण देव नाहीं भेटला। भक्तिचें गाठोडें घरीं विसरून आला ॥ विष्णु अन् लक्ष्मीचा वास। कोणत्या वृक्षांत आहे सांगा आम्हांस ॥ ज्या वृक्षावर असे विष्णुचे स्थान। ते कोणत्या वारीं द्या सांगून ॥ प्रश्नाची हंडी बांधीली भरसभेंत। फोडा नाचवाले बुवा चारचौघांत ॥ म्हणे कृष्णकान्त गुरु माझा साईबाबा। ऐकूं नका भोंदू गुरुच्या उलट्या बोंबा ॥

卐

गाणें ४७ वें

# उत्तर

( गाणें ४६ चें उत्तर )

गळ्यांत माळा पोटांत काळा। सांगा देव कसा पावेल त्याला॥ ज्याचें चित्त बायको पोरांवरी । त्याच्या नशिबी नाहीं पंढरी ॥ ऐका लक्ष्मीचा वास लिंबवृक्षांत । विष्णुचा पिंपळाच्या वृक्षांत ॥ नित्य शनिवारी असे तिथें हमखास । म्हणून भजती भाविक शनिवारी पिंपळास ॥ म्हणे कृष्णकान्त फोडीली प्रश्नांचीं हंडी । गणराया दारीं नांचे गोविंदाची दिंडी ॥

卐

गाणे ४८ वें

# प्रश्न

नवरा ज्योतिषी आणि बायको आळशी । संसारांत तयांच्या सदा उपडी कळशी । याचा अनुभव घ्या तुम्ही रोकडा । आणि माझ्या प्रश्नाचा तुम्ही फोडा घडा ॥ जालंदर दैत्याची सांगा आम्हां उत्पती । जालंदर, विष्णु आणि लक्ष्मी यांची काय नातीं ॥ म्हणे कृष्णकांत धुंडा पुराण पोथी । सांगा भरत्या सभेला पुढें काढून छाती ॥

卐

गाणें ४९ वें

## उत्तर

(गाणें ४८ वें उत्तर)

आळशी बायकोला नवसानं मिळाला। ज्योतिषी नवरा गमतीला गमतीला ॥ ऐका प्रश्नाचे उत्तर कान देऊनी सगळे॥ एके दिवशीं इंद्रावर शिवशंकर कोपले ॥ तृतीय नेत्रातून क्रोधाग्नी भडकला। तत्काळ इंद्र शंकरास शरण गेला ॥ तो क्रोधाग्नी आवरेना शिवशंकराला। अखेर क्रोधाग्नी समुद्रांत टाकीला ॥ समुद्राच्या उदरी जन्मला तो जालंदर। विष्णुचा मेव्हणा लक्ष्मीचा बंधु हेच उत्तर ॥ म्हणे कृष्णकांत पहा ग्रथांत शोधून। खरेखोटें पहा नीट पडताळून ॥

卐

गाणें ५० वें

## आज राज्य आमुचें आलें

(चाल : सारी सारी रात) फिल्म अजि बस शुक्रीया

उठा मराठ्यांनो आज राज्य आमुचें आलें। एक रूप होऊनिया नाचुंया रे सगळे ॥ धृ० ॥ छत्रपती शिवबाचें प्रताप तुम्हीं आठवा। नवमहाष्ट्रांत बंधुभाव जागवा। दुफळीनें कुणाचें झालें कां भलें ॥१॥ शेतकरी आणि कामकरी दादा। महाराष्ट्राच्या सेवेसाठीं कंबर तुम्हीं बांधा। जनशक्तिचे भाग्य आज उदया आले ॥२॥ सर्वगुणसंपन्न महाराष्ट्र आमुचा थोर। तुका-ज्ञानेश्वर जन्मले याच भूमीवर ॥ कृष्णकान्त गर्जे भविष्य तुमच्या हातीं आलें ॥३॥

भाग ४ था समाप्त

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

### भाग ५ वा

गाणें ५१ वें

### नमन

बालगोपाळ जमले खेळायला । यावें गौरीहरा तुम्ही जागरणाला ॥ सण चतुर्थीचा आज नाचत आला । यावें विनायका तुम्ही जागरणाला ॥ तुझ्या नाचांचा छंद आम्हां लागला । यावें विघ्नहरा तुम्ही जागरणाला ॥ तूंच मार्ग दावी आम्हांला । यावें मंगलमूर्ति तुम्ही जागरणाला ॥ आशिर्वाद देण्या गौरी नाचाला । यावे गणराया तुम्ही जागरणाला ॥ तुझ्या मंदिरीं खेळ मांडला । यावें शिवतनया तुम्ही जागरणाला ॥ रंग भराया भरल्या सभेला । यावें भालचंद्रा तुम्ही जागरणाला ॥ तुम्हांविण आम्हां लावील कोण मार्गाला । यावें लंबोदरा तुम्ही जागरणाला ॥ कृष्णकान्त विनवी लागुनी चरणाला । यावें सरस्वतीनाथा तुम्ही जागरणाला ॥

गाणें ५२ वे

## प्रश्न

कर्ता एक देव त्याने केलें सर्व । तुम्हां आम्हांला हवा कशाला गर्व ।। आज आम्हांला कळलें तुमचें नांव । आतां द्यावे सांगून तुमचा गांव ।। भरल्या सभेंत उचला प्रश्नाचा विडा । सांगा कुणी दिला शिवाजीस भगवा झेंडा ।। सांगा सैन्यास कोणी केलें मार्गदर्शन । तयाचें नांव सांगा विचार करून ।। ज्याचें देवाशी वांकडे त्यांच्या पदरांत धोंडे । घ्या अनुभव म्हणें कृष्णकांत खाडे ।।

卐

गाणें ५३ वे

## उत्तर

गाणें ५२ चें उत्तर

जगी सर्व सुखी असा कोण आहे । विचारें मना तूंची शोधोनी पाहें ।। हा मानचा श्लोक ज्यांनीं केला । तोची गुरु शिवाजीस लाभला ।। रामदासास न ओळखे जो गुरुचा चेला । तो महाराष्ट्रांत जन्मूनी फुकट गेला ।। म्हणे कृष्णकांत जसें रक्षिलें शिवाजीनें राज्य । तसेंच रक्षायां व्हा तयार भारताचें स्वराज्य ।।

गाणें ५४ वें

## प्रश्न

पंढरपूर हें भूलोकीचा स्वर्ग। तिथें नांदतो देव साक्षांत पांडुरंग।। ऐका धर्मराजानें कलीस केलें मोकळे। धर्म, तप, दया आणि सत्य लयाला गेलें।। सांग कुणी कलीस शरण आणिलें। कोणती स्थानें त्यास नेमूनी दिलीं।। नीट विचार करून सांगा। नका करूं भरल्या सभेंत दंगा।। म्हणे कृष्णकांत खेळ खेळा नीट। करा हरी भजन बोलुं नका चावट।।

卐

गाणें ५५ वें

## उत्तर

### ( गाणें ५४ चें उत्तर )

आयुष्यांत येउनी पहावा पांडुरंग। पंढरींत जाऊनी लुटावा किर्तनाचा रंग।। ऐका धमराजाने कलीस केला मोकळा। पृथ्वीवर अधर्म आणि कलह माजला।। मग परीक्षीत राजाने कलीस धरलें। तात्काळ कलीने परीक्षिताचे पाय धरिले।। परीक्षितानें दिली पांच स्थानें नेमून। द्यूत, मदिरा, स्त्रीसंग, हिंसा आणि सुवर्ण।। या कलीयुगी अनुभव घ्या रोकडा।। म्हणे कृष्णकान्त गाऊ किती याचा पाढा।।

★

गाणे ५६ वे

## प्रश्न

बाजारांत मिळती गुरु पैशाला तेरा । द्रव्यलोभी गुरु वाजविती चेल्यांचे बारा ।। न घेता शिकवी तोच गुरू खरा । त्या गुरुचे पाय आधीं धरा ।। ऐका तीन प्राण्यांचे विचित्र चमत्कार । पहिला प्राणी त्याला नाहीं शीर ।। दुसरा प्राणी त्याला जीभ नाहीं । तिसऱ्या प्राण्याला कान आणि पाय नाहीं ।। अशा तीन प्राण्यांचें नांवें सांगा । नाहींतर आल्या मार्गीं चालू लागा ।। म्हणे कृष्णकान्त धरा एक भक्तिमार्ग । लूटा भक्तिचें सुख धरूनी संतसंग ।।

★

गाणे ५७ वे

## उत्तर

( गाणें ५६ चें उत्तर )

ऐका देवाची विचित्र करणी । येथें नाहीं कामा सोनाराची फुंकणी ।। ऐका शीर नाहीं खेकड्याला । नीट पहा जीभ नाही बेडुकाला ।। कान आणि पाय नाही सर्पाला । घे रोखठोक प्रश्नाचा दाखला ।। म्हणे कृष्णकान्त ज्याला अभिमान झाला । तयाच्या माथीं फजितीचा भोपळा फुटला ।।

★

गाणे ५८ वे

## प्रश्न

वडाची साल पिंपळाला कांहीं लागेना। ज्योतिषाचा मुळ स्वभाव कांहीं जाईना ।। घरोघरीं झाले बहुत थोर पंडित। तरी मायेचा लागला नाहीं कुणा अंत ।। तिन्ही दैवत फसले मूग गिळून बैसले। तिथें तुमची आमुची काय कथा सांगा हो सगळे ।। युगें, धाम, अन् पुरुषार्थ सांगा किती। कथा-पुराणें हीं महाराष्ट्राची खरी संपत्ती ।। साधुसंताने रचिले शब्दांचे भांडार। म्हणे कृष्णकान्त हेच खरे तयांचे उपकार ।।

★

गाणे ५९ वे

## उत्तर

(गाणें ५८ चें उत्तर)

निंदकाची निंदा रिकामा हा धंदा। नको लागु नादा उगीच बैस दादा ।। डाव मांडिला गौरीहरा समोर। ऐका तुमच्या प्रश्नाचें उत्तर ।। सत्य, त्रेता, द्वापार आणि कली। अशीं हीं युगें चार ऐका मंडळीं ।। जगन्नाथ, रामेश्वर, द्वारका आणि बद्रीनाथ। पहा शोधुनी चार धामें पुराणांत ।। धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे तर। पुरुषार्थ जाणा नक्की तुम्ही चार ।। शास्त्र पुराणाचे हे अवघड कोडें। म्हणे कृष्णकांत साधुसंताने केले उघडे ।।

★

१६८६५

गाणे ६० वे

## प्रश्न

सद्‌गुरुवांचूनी सांपडेना सोय। तुका म्हणे धरा वा एकाचे पाय ॥ अवस्था, कर्म आणि काळ सांगा किती। मग खुशाल नाचा पुढें काढूनी छाती ॥ काम, क्रोध अन् मोह ज्यानें जिंकला। म्हणे कृष्णकान्त तोची गुरू ओळखावा भला ॥

★

गाणें ६१ वें

## उत्तर

(गाणें ६० चें उत्तर)

शिंके तुटलें बोक्याचें साधलें। बरे झाले देवा आज तुम्ही भेटले ॥ ऐका राव तुमच्या प्रश्नाचें उत्तर। सत्य सांगतो शास्त्राचा घेऊनी आधार ॥ बाल तरुण आणि वृद्ध ही अवस्था तीन। काया, वाचा आणि मन हे कर्म तीन। भूत, वर्तमान आणि भविष्य हे काळ तीन। सारी कमाल तीन आकड्यांची छान ॥ म्हणे कृष्णकांत आम्हीं जन्मलो निंदकाच्या गांवीं। म्हणुनी माझी लेखनी करी या चोरांची उठाठेवी ॥

卐

गाणें ६२ वें

## प्रश्न

बोलाचीच कढी बोलाचाच भात। ही वल्गना नको तुमची भरल्या सभेंत। प्रश्न रोकडा घे नीट ऐकून। ब्रह्मदेवाचा

ज्येष्ठ पुत्र सांग कोण ।। किती भुवनें ब्रह्मदेवाच्या उदरी । दे सांगूनी रोखठोक भरल्या दरबारीं ।। कृष्णकान्त जोडुनी हात तुम्हां सांगे । भक्तीमार्ग सोडुनी जाऊं नका आडमार्गे ।।

★

गाणे ६३ वे

## उत्तर

( गाणें ६२ चें उत्तर )

काणा कैपती आणि आंधळा हिकमती । आहे ठाऊक आम्हां तुमची किर्ती ।। ब्रह्मदेवाचा ज्येष्ट पुत्र निसर्ग हा जाण । ब्रह्माच्या उदरीं चौदा भुवनें सांगे पुराण ।। तुमच्या सवालास घ्या उत्तर रोकडे । संत चरणाची धूळ कृष्णकांत खाडे ।।

卐

गाणे ६४ वे

## प्रश्न

ऐका मंडळी बसा सभेला । सवाल आमुचा पाहुणे मंडळीला ।। रामानें कुंभकर्ण–रावण मारिला । सांगे रामायण तुम्हां आम्हांला ।। कोणत्या तिर्थास कोणत्या महिन्याला । प्रभू रामचंद्राला जय तो मिळाला ।। दशरथाच्या राम आणि सीतेला । झाला राज्याभिषेक शुभ मुहुर्ताला ।। राज्याभिषेकाच्या वेळीं राम आंणि सीतेला । कोणत्या वयांत राजयोग घडला ।।

जमलं सांगा नक्की आम्हांला । नाहींतर लागा अपुल्या मार्गाला ॥ म्हणे कृष्णकान्त आम्हां पाहुनी सुखी । शिंपी अन् ज्योतिषाची चाळवली पोटदुःखी ॥

卐

गाणे ६५ वे

## उत्तर

( गाणें ६४ चें उत्तर )

ज्याचे नाहीं कोणी तोचि दिसे सुखी । आंधळ्याच्या गाई देव राखी ॥ गौरीहर कृपेनें गातों सभेला । एक जबाब कवीच्या मुला ॥ चैत्र मासी कृष्ण चतुर्दशीला । रामानें युद्धाचा शेवट केला ॥ बेचाळीसाव्या वर्षी श्री रामचंद्राला । तेहतीसाव्या वर्षी सीतामाईला ॥ राज्याभिषेकाचा योग घडला । अयोध्यानगरीत आनंद भरला ॥ कवि कृष्णकान्त सांगे तुम्हांला । रामायणांत पहा रे दाखला ॥

★

गाणे ६६ वे

## चोर सोडून सन्यासी धरीला

चार गवळ्यांचा बेत हो फसला । चोर सोडुनि संन्याशी धरीला ॥ जमुनी गवळी अवघे चार । म्हणती मातला नंदाचा पोर ॥ लाठ्याकाठ्या घेऊनी तयार । टपून बसले धरावया हा

चोर ।। एके दिवशी मध्य रात्रीला । चोर सोडुनि संन्याशी धरीला ।। गोकुळीच्या हो कृष्णदेवाला । चौघांचा तो गुप्त बेत कळला ।। जमवूनि रे सारे गोपाळ । एका घरांत मांडीला धुमाकूळ ।। चार गवळ्यानीं बोभाटा केला । चोर सोडूनि संन्यासीं धरीला ।। साऱ्या गोकुळची जमली मंडळी । चारी बाजूनी वाट रोखली ।। चार गवळ्यांनीं कुलूप तोडले । सारे गोपाळकृष्ण गुप्त झाले ।। घर फोडूनि मूंगूस हाती लागला । चोर सोडूनि संन्याशीं धरीला ।। चार गवळ्यांचा तोरा हो जिरला । त्यांनी घरचा हो मार्ग धरीला ।। न जावें कृष्णाच्या वाटेला । कानाला खडा लावुन घेतला ।। कृष्णलिला कळली गोकुळाला । चोर सोडूनि संल्याशी धरिला ।।

卐

गाणें ६७ वें

## प्रश्न

सर्व सुख माझे विठ्ठलाच्या पायी । आईबाप होऊनीया त्यानें केलें सर्व कांहीं ।। करा नमन पार्वतीच्या बाळाला । तोचि मति देईल आम्हां गाण्याला ।। पाहुणे मंडळी ऐका आमुचा सवाल । फडफडे वाऱ्यांवरी हातीचा रुमाल ।। पायाने धरीला हो ठेक्याचा ताल । ऐकून घ्या नींट अमुचा सवाल ।। पांडवांची ती सुंदर मयसभा । कोण्या शिल्पकारानें बांधीली सांगा ।। किती महिन्यांनीं पूर्ण केली सांगा । शिल्पकार सासरा कोणाचा तो सांगा ।। पांडवांच्या वेळी किती होत्या

मयसभा । ही मयसभा कितवी झडकरी सांगा ।। जमलं तर नक्की यावेळीं सांगा । नाहीं तर आल्या मार्गानें चालू लागा ।।

卐

गाणे ६८ वे

## उत्तर

(गाणें ६७ वें उत्तर)

मेळा जमला गौरीनाचांचा । सांगाया जबाब तुमच्या प्रश्नांचा ।। रावणाचा सासरा जाण मयासूर । त्यानें बांधिली मयसभा सुंदर ।। चौदा महिन्यांनीं केली हो पूर्ण । सहावी मयसभा पांडवांची जाण ।। पांच सभेचे ऐका वर्णन । घ्याहो मंडळ नीट ऐकून ।। पहिली इंद्राची इंद्रसभा । दुसरी कुबेराची कुबेर सभा ।। तिसरी ब्रह्मदेवाची ब्रह्मसभा । चौथी वरुणाची वरुणसभा ।। पांचवी यमधर्माची मयसभा । आणि सहावी धर्माची मयसभा ।। कवि कृष्णकांत सांगे तुम्हांला । महाभारतांत पहा रे दाखला ।।

★

गाणें ६९ वें

## म्हातारा नवरा गंमतीला

(चाल : नाचरे मोरा आंब्याच्या वनांत)

वय माझे सोळा-मी म्हातारा नवरा केला-फजिता झाला ।। धृ ।।

गोकुळीच्या हरीला लागला चाळा । म्हाताऱ्याची बाईल चिडवी

मला ॥ जातां येतां यमुनेला । सतवी मला म्हातारा नवरा गमतीला ॥१॥ निजले होते मी माजघरीं । अवचित आला हरीं माझ्या घरीं ॥ माझ्या ग वेणीची । नवऱ्याच्या दाढींशीं गुंतावळ ग केला ॥ २ ॥ कृष्णदेवानें कौतुक केलें । नवरा बायकोत भांडण लाविलें ॥ चार जमले गवळी । त्यांत होता वनमाळीं ॥ नाहीं तोडहो फजितिला ॥ ३ ॥ काहीं केल्या हि गांठ सुटेना । विचारी हरी आम्हां दोघांना ॥ देवांना छळलें कां ? साधुंना छळलें कां ? करा नवस गौरीहराला ॥४॥ हरी कृपेने सुटली गांठ । नवल घडलें हें गोकुळांत ॥ रचली गौळण कवी कृष्णकान्तानं ॥ राग नसावा म्हाताऱ्या नवऱ्याला ॥५॥

卐

गाणें ७० वे

## चक्री गाणें

काळाच्या उदरांत उद्यांचें भविष्य कुणी पाहिलें कां ?
ब्रह्मलिखित भाळींचे सांगा कुणी चुकविले कां ?
विश्वचालक प्रभूने अर्जुनाचें घोडे धुतले कां ?
पांडवाघरीं ऋषींब्राह्मणांची उष्टीं काढलीं कां ?
भिष्म, द्रोण ज्ञानी असतां कौरवपक्ष त्यानें धरिला कां ?
मातापिता जिवंत असतां कर्ण तो पोरका झाला कां ?
तेहतीस कोटी देव रावणाचे चाकर झाले कां ?
प्रतापी शनि, मंगळ, नवग्रह मूग गिळून बसले कां ?

द्युताचे अनर्थ माहित असतां धर्मराजा द्युत खेळले कां ?
अहिल्या पतिव्रता असतां शिळा होऊनी पडली कां ?
मंदोदरी रुपाने सितेपरी असतां रावणाने
नाद सितेचा धरिला कां ?
राज्य सुखाचे वैभव असतां चणे वेंचुनी खाल्ले कां ?
धूर्त यमराजा सावित्रीच्या शब्दांत तो फसला कां ?
महापातकी अजामीळ विष्णू लोकी गेला कां ?
पुण्यशिल द्रौपदी असतां पांच भ्रतार लाभले कां ?
देवकीचा बाळ यशोदेघरी सांगा तो रमला कां ?
म्हणे कृष्णकान्त ही उत्तरें ज्योतिषी सांगून देईल कां ?

卐

गाने ७१ वें

# गणपतीचा चंद्राला शाप

भाद्रपदमासीं शुद्ध चतुर्थीला। कैलासावर जमला देवांचा मेळा ।। सुगंधी फुलांनीं कैलास सजला । लाख चांदण्या आल्या सभेला ।। नंदीवरी बैसूनि शंकर आला । शिवगणांनी जयजयकार केला ।। अर्धांगी पार्वती डाव्या बाजूला । गणेश बाळ मध्यें बैसला ।। गणरायाच्या वाढदिवसाला। चंद्र सूर्यहि आले सभेला ।। पार्वतीच्या हो लाडक्या बाळाला । आज्ञा करी हो शंकर भोळा ।। बाळ गणेशा नाचरे सभेला । देव आले रे नृत्य पहाण्याला ।। पुष्पवृष्टी हो झाली सभेला । गणेश

नाचाया उभा राहिला ।। शिवगणांनी शंख फुंकिला । नारदानी हो वीणा छेडिला ।। मृदुंगाने हो ताल धरीला । शंकराचा हो डमरू वाजला ।। सातसुरांचा नाद घुमला । गणरायाचा नाच रंगला ।। त्याचवेळीं चंद्रदेवाला । थट्टेची लहर आली तयाला ।। भर सभेत चंद्र तो हंसला । "गणपति बाप्पा मोरया" गर्जला ।। पार्वतीच्या हो गणरायाला । चंद्रकृतीचा कोप तो आला ।। भरल्या सभेंत चंद्रदेवाला । शिवतनयानी शाप हो दिला ।। तुझें मुख जो पाहील त्याला । चोरीचा आळ लागेल कर्माला ।। मनिं चंद्र तो खजील झाला । गेला शरण गौरीहराला ।। साऱ्या देवांनी हो गौरीहराला । स्तुति गाऊनी शांत हो केला ।। देवांच्या विनंतीनें चंद्रदेवाला । गणरायानें उःशाप दिला ।। भाद्रपदमासीं गणेशचतुर्थीला । न पहाती जन तुजला ।। थट्टेचा बट्टा हो लागला चंद्राला । येथें गाण्यांचा शेवट झाला ।। म्हणे कृष्णकान्त कानाला लाविला खडा । याचा अनुबव आम्ही घेतला रोकडा ।।

*

गाणें ७२ वें

## श्रीसत्यनारायणाचें गीत

सत्यनारायणाच्या पूजेला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ।।
सत्यनारायणाची हो लीला । आम्ही गातो भरल्या सभेला ।।
मानवाचा उद्धार करण्याला । नारदमुनीनें मार्ग हो दाविला ।।
बाळगोपाळ जमले पूजेला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ।।

काशीच्या हो शतानंदाला । दारिद्र्यानं पुरता हो पीडिला ॥
त्याने केला सत्यनारायण । आली घरीं लक्ष्मी चालून ॥
सत्यनारायण प्रसन्न झाला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥
दुसरा काशीचा हो भिल्ल । त्याच्या अंगी नव्हेत बळ ॥
देवापुढे ठेवूनी नारळ । नारायणास वाहिले फूल ॥ देव भिल्लाला तो पावला ॥ गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥
रत्नपूरच्या साधूवाण्याला । नव्हतें पोटीं संतान त्याला ॥
सत्यनारायण त्यानें केला । झालें कन्यारत्न लिलावतीला ॥
झाला आनंद साधूवाण्याला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥
कांहीं दिवसानी हो साधूवाण्याला । देवपूजचा विसर पडला ॥
चोर म्हणून राजाने धरिला । आली नशिबीं त्याच्या बंदिशाळा ॥
झाला पश्चात्ताप साधूवाण्याला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥
साधूवाण्याच्या लिलावतीन । चार गांव हो भिक्षा मागून ॥
माय लेकींनी हो मिळून । केला थाटांत सत्यनारायण ॥
साधूवाणी त्रिदोष सुटला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥
साधूवाणी निघाला नगरीला । कळली वार्ता हो कलावतीला ॥
प्रसाद न घेतां आली तीराला । सत्यनारायण हो कोपला ॥
नौकेनें हो तळ गांठीला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥
कलावतीनें सत्यनारायणांला । भक्तीभावानें नमस्कार केला ॥
प्रसाद घेऊनी आली तीराला । चमत्कार तिनें देखिला डोळा ॥
नौका डुलत लागली किनाऱ्याला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥ अरण्यांत कांहीं गुराख्यांनीं । केला सत्यनारायण मिळोनि ॥ प्रसादाच्या हो शुभवेळीं । राजा अंगध्वज आला

त्या स्थळीं ॥ गुराखी देती प्रसाद राजाला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥ प्रसाद राजानें फेकुनी दिला । राजवाड्यांत पुत्रानें प्राण सोडला ॥ आठहि प्रधान मरून पडले । धन दौलतीचे कोळशे झाले ॥ देवाचा कोप राजाला नडला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥ राजा धांवत गुराख्यापाशीं आला । प्रसाद मागूनी त्यानें घेतला ॥ गुराख्यांना आनंद झाला । वैभव मिळालें पुन्हां राजाला ॥ गुराख्यांचा सत्यनारायण पावला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥ जयदेवा सत्यनारायणा । सुखी ठेवी बाळगोपाळांना ॥ कवि कृष्णकांत तुला शरण । वेडे वाकडे गाईले गुणगायन ॥ बालगोपळ शरण तुजला । गौरीनाचांचा मेळा हो जमला ॥

गाणें ७२ वें

# प्रश्न

गाजराची पुंगी सारे वाजविती । जग हे सुखाचे सोबती ॥ काय राव बघतां इकडे तिकडे । जरा लक्ष द्या आमुच्या प्रश्नाकडे ॥ जगी साडेतिन शहाणे झाले कोण । भरल्या सभेंत द्या रोखठोक सांगून ॥ हा साडेतिन शहाण्यांचा प्रश्न । हि थाप नव्हें नक्की जाण ॥ ह्या साडेतीन शहाण्यांचा इतिहास । महशुर आहे साऱ्या महाराष्ट्रास ॥ म्हणे कृष्णकान्त दोन दिवसांचा तूं प्रवासी । वैर जगाचें ठेव तुजपाशीं ॥

卐

गाणें ७४ वें

# उत्तर

(गाणे ७३ चें उत्तर)

मित्र मैत्रिणी भाऊबंद सगळे । गुळाभंवती फिरती हे डोंगळे ।। विठ्ठल सुंदर, हा शहाणा पहिला । दुसरा देवोजीपंत चोरघडे ठरला ।। तिसरा शहाणा म्हणती सखाराम बापुस । अर्धा शहाणा जाणा नाना फडणीस ।। म्हणें कृष्णकांत करूं नको उठाठेव भलती । काळ घाली घिरट्या तुज भंवती ।।

卐

गाणें ७५ वें

# या भूताला कुणी तरी आवरा

नारळ कोंबडा ठेवा उतारा । या भूताला कुणी तरी आवरा ।। काम क्रोध: मोहरूपी हें भूत जबर । या भूतानें झपाटले मानवास खरोखर ।। अगडबंब ज्योतिषाची शेंडी धरा । या भूताला कुणी तरी आवरा ।। ज्यासी हें भूत लागे दादा । तयासी अभिमानाची होते बाधा ।। हे भूत बसले रावणाच्या दारा । या भूताला कुणी तरी आवरा ।। हे भूत दुर्योधनाच्या मानेवर बसलें । कौरवाचें कुलक्षय करून गेलें ।। भल्या भल्यासी दाविला दरारा ।। या भूताला कुणी तरी आवरा ।। भूत लागले ब्रह्मपुत्र नारदाला । संसाराच्या जंजाळांत फसला ।।

साठ पोरांचा केला पसारा । या भूताला कुणी तरी आवरा ।। येथें ज्योतिषी अन् मांत्रिकाचें नाहीं काम । या भूताला एकच उपाय, घ्या हरी नाम ।। संता घरीं नाहीं या भूताला थारा । या भूताला कुणी तरी आवरा ।। काम क्रोध मोहरूपी या भूतावर उपाय । म्हणे कृष्णकांत धरा सद्‌गुरूचे पाय ।। भूत बसलें निंदकाच्या दारा । या भूताला कुणी तरी आवरा ।।

## भाग ५ वा समाप्त


मुंबई महाराष्ट्रांत प्रचंड लोकप्रिय ठरलेली

कवि कृष्णकान्त खाडे यांची

# गौरी नाचांची गुरूकिल्ली

बहुरंगी सवाल आणि जबाब यांचा संग्रह

किंमत ३० पैसे

प्रकाशक :—

कवि कृष्णकान्त खाडे

१८० बी, गायवाडी, गिरगांव, मुंबई—४.

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग ६ वा

गाणें ७६ वें

## वाळवंटी नाचे पांडुरंग

नामा किर्तन गाई अभंग । वाळवंटी नाचे पांडुरंग ॥
टाळ चिपळ्या करती भजन । सारे संत झाले तल्लीन ॥
हरीनामाचा ऐकाया गजर । चंद्रभागाहि झाली स्थीर ॥
बोले विठ्ठल विठ्ठल मृदुंग । वाळवंटी नाचे पांडुरंग ॥
नामाची वीणा लागली सुरांत । विसरला देवपण पंढरीनाथ ॥
देव जिंकियेला नामदेवांनीं । आली कौतुक पहाण्या रुक्मिणी ॥
सारे संत झाले हो दंग । वाळवंटी नाचे पांडुरंग ॥
देव नामाच्या किर्तनी रंगला । जरतारी पितांबर सुटला ॥
हे नवल सारे पहाण्याला । मावळतीला सूर्यहि थांबला ॥
संत सभेला भरला रंग । वाळवंटी नाचे पांडुरंग ॥

卐

गाणें ७७ वें

# श्रीकृष्ण जन्म

(चाल : भरजरीचा पितांबर दिला फाडून)

अष्टमीला मध्यरात्रीं होती सामसुम । श्रावणमासी रोहिणीचा पाऊस पडे झिमझिम ।। मथुरेच्या बंदीशाळेत देवकीच्या पोटीं । वद्य अष्टमीच्या दिवशीं प्रगटले जगजेठी ।। तेहतीस कोटी देवांनीं केली पुष्पवृष्टी । देवकीचा आठवा तो कृष्ण कौसल्येचा राम ।। श्रावणमासीं रोहिणीचा पाऊस पडे झिमझिम ।। वसुदेवाच्या बेडीचें पाणी पाणी झालें । बंदीशाळेचें कुलूप गळुन पडलें ।। कंसाचे रक्षकहि सारे झोपी गेले । मथुरेच्या अवती भवती होती सामसुम ।। श्रावणमासीं रोहिणीचा पाऊस पडे झिमझिम ।। वसुदेव बाळासी घेऊन निघाला । शेष नाग धांवला हो देवाच्या सेवेला ।। श्रीहरींचें दर्शन घडले यमुनेला । नंदाघरी आला तो देवकीचा शाम । श्रावणमासीं रोहिणीचा पाऊस पडे झिमझिम ।। यशोदेच्या मांडीवरी वैकुंठीचा राणा । नंद वाटी साखर गोपगोपीकांना ।। म्हणे नंद सर्वांना कृष्ण हो म्हणा । बारा दिवस नंदाघरी रंगली धामधूम । श्रावणमासीं रोहिणीचा पाऊस पडे झिमझिम ।।

卐

गाणें ७८ वें

# प्रश्न

तूझा नी माझा देह एकाच मातीचा । उच्च नीच भेद हा तुम्ही गाडा कायमचा।। ऐका पांच पांडवांत श्रीकृष्णाहून थोर कोण।

आणि कृष्णाच्या बरोबरीचा कोण द्या सांगून ॥ हा प्रश्न खेळीमेळीनें भरल्या सभेंत सोडवा । पोकळ बकवा उगाच करू नका बुवा ॥ म्हणे कृष्णकांत श्रीगणपती हे जागृत दैवत । म्हणून चतुर्थीला उत्सव होतो महाराष्ट्रांत ॥

卐

गाणे ७९ वे

## उत्तर

( गाणें ७८ चें उत्तर )

अति गरीब अति श्रीमंत हे पत्करले । मधले श्रीमंत सारे मळ्यावरचे कावळे ॥ ऐका धर्म आणि भीम कृष्णाहून थोर । कृष्ण आणि अर्जुन वयाने होते बरोबर ॥ म्हणे कवि कृष्णकांत गरीब आणि श्रीमंत । शेवटी जाणार सार एकाच मातींत ॥

卐

गाणें ८० व

## प्रश्न

अति शहाणा तो जाणावा भोट मामा । त्याच्या बुद्धीचा सदा घडा रिकामा ॥ आम्ही नवल एक पुसतो तुला । रोख ठोक सांगून द्या भरल्या सभेला ॥ मूळ जन्म त्याचा पुरुष म्हणून । एक बालक जन्मा घातलें स्त्रीरूप होऊन ॥ गर्भ उदरांत जन्म पावला अंगठ्यांतून । त्रैलोक्यांत नांव पावला दानशूर म्हणून ॥ शेवटी फसविलें त्यासी मातेनं । रावसाहेब या बालकाचे नांव

द्या सांगून ।। रावसाहेब साठ पोरांचा नाहीं हा मामाला । नारदाची कथा सांगूं नका आम्हांला ।। म्हणे कृष्णकान्त मतलबी हें जग । आहे चोरांची रात्र सावधपणें जाग ।।

卐

गाणें ८१ वे

## उत्तर

(गाणें ८० चें उत्तर)

अति शहाण्याचा बैल रिकामा । जगी शोधून पाहे तूं सावळ्या-रामा ।। तुमच्या प्रश्नाचा घ्या हो जबाब । ओळखदेख ठेवा रावसाहेब ।। एके दिवशी शंकर बोलले विष्णूस । तुमचे मोहिनीरुप दाखवा आम्हांस ।। शंकरासाठीं देव मोहिनी रुपांत नटले । विरोचन राजाशीं लग्न त्याचें लागलें ।। विरोचनापासून गर्भ मोहिनीस राहिला । नारदाच्या थट्टेमुळें देवानें चमत्कार केला ।। डाव्या पायाच्या आगठ्यांतून बळीराजा जन्मला । मातेने फसवुनी अखेर पाताळीं घातला ।। म्हणे कृष्णकान्त जो खरा शहाणा । तो न करी उगाच गांवभर ठणाणा ।।

卐

गाणें ८२ वें

# ब्रह्मचाऱ्याचा संसार

लोकां हंसता बसला फटका । नारदमुनिची कथा हो ऐका ॥
कृष्णाच्या संसाराचा सुखसोहळा । पाहुनी नारदमुनि रे भुलला॥
कृष्णदेवाच्या लागला पाठी । द्यावी मला बायको गोरीगोमटी ॥
लग्नाचा धरीला त्याने हेका । नारदमुनिची कथा हो ऐका ॥
कृष्ण देवास पक्कें उमजलें । ब्रह्मचारी हे नक्की चळलें ॥
देव उपदेश करून थकलें । नारदास नाहीं तें पटलें ॥
म्हणे कृष्णास लबाड पक्का । नारदमुनिची कथा हो ऐका ॥
कृष्ण सांगे नारदाच्या कानांत । मी नसेन ज्या मंदिरांत ॥
धरा तिचा खुशाल हात । घ्यावी तुम्ही तिला पदरांत ॥
घ्यानींमनी नव्हती त्याच्या शंका ॥ नारदमुनिची कथा हो ऐका ॥
घरोंघरी हो नारद फिरले । जिथें तिथे मांजर आडवें गेलें ॥
साऱ्या मंदिरीं कृष्णदेव दिसले । कृष्णदेवाचे नाटक कळलें ॥
झाला अंगाचा त्याच्या भडका । नारदमुनिची कथा हो ऐका ॥
रागाने मारिली गंगेत बुडी ॥ झाला नारदाचा नारदी ॥
संसाराची अडकली बेडी ॥ साठ पोरे ओढिती शेंडी ॥
आला प्रसंग मोठा बांका । नारदमुनिची कथा हो ऐका ॥
साठ पोरांच्या जंजाळांतून वांचवा । त्याने मांडीला श्रीहरीचा
धांवा ॥ पुरे झालें हे संसारसुख । होते पूर्वीचें तेच ठीक ॥
कृष्णदेवाने केली हो सुटका । नारदमुनिची कथा हो ऐका ॥
मूळरूप आले नारदाला ॥ श्रीकृष्ण देवाची कळली लिला ॥
ब्रह्मवीणा घालूनी गळां । साठ पोरें टाकुनी पळाला ॥ म्हणे
कृष्णकान्त संसार नीट ओळखा । नारदमुनिची कथा हो ऐका ॥

गाणें ८३ वें

# नामदेवाचा हट्ट

ऐका नामदेवाचा हट्ट नवा । म्हणे विठ्ठलास नैवेद्य जेवा ॥ वरणभात भाजी मुळ्याची । खीरवाटी कोथिंबीर लोणची ॥ पिता माझा गेला दूरदेशी । मातेनें धाडीले तुजपाशीं ॥ घ्यावी गोड करूनी माझी सेवा । म्हणे विठ्ठलास नैवेद्य जेवा॥ देव कांहीं केल्या जेवीना । नामदेव हट्टही सोडीना ॥ विठ्ठलापायीं बैसूनी नामा रडे । आज मी काय केलें तुमचें वांकडे ॥ शिक्षा करील पिता मजशी देवा । म्हणे विठ्ठलास नैवेद्य जेवा । शेवटीं ताकीद दिली नामदेवानें । देवा जेवा आतां मुकाट्यानं ॥ प्राण देईन तुमच्या चरणीं । साऱ्या संतास कळेल तुझी करणी ॥ बट्टा लागेल तुमच्या नांवा । म्हणे विठ्ठलास नैवेद्य जेवा ॥ नामदेवाची पाहुनी भक्ति ॥ देव गहिंवरले विटेवरती । प्रगट होऊनी पोटाशीं धरीलें । नामासंगे देव देवले ॥ झाला हर्ष नामदेवाच्या जिवा । म्हणे विठ्ठलास नैवेद्य जेवा ॥ नामदेवासंगे देव जेवले । संता कानीं वर्तमान गेले ॥ सारे संत जमले राऊळी । गोष्ट नवलाची डोळ्यानें पाहिली ॥ म्हणे कृष्णकान्त रूप तुमचें दाखवा । म्हणे विठ्ठलास नैवेद्य जेवा ॥

卐

गाणें ८४ वे

# संत गोरा कुंभार

पांडुरंगाच्या भजनी रमला । गोरा कुंभार नाचांत रंगला ।। वीणा चिपळ्या घेउनी हातीं । मडक्यासाठीं मळीत होता माती ।। बाळ सुकुमार अंगणांत ठेवून । गेली पाण्याला गोरोबाची घरधणीन ।। बाळ रांगत रांगत मातींत गेला । गोरा कुंभार नाचांत रंगला ।। हरीं भजनाच्या गजरांत । बाळ तुडविलें त्यानें मातींत ।। बाळ गुणी तें एकुलतें एक । आईबापाचें अवघेंचि सुख । तुडविला चुकून पोटचा गोळा । गोरा कुंभार नाचांत रंगला ।। घरधणीन आली नदीवरूनी । बाळ दिसेना कोठें अंगणीं ।। गोरोबाच्या पायीं रक्त पाहुनी । तिच्या काळजाचं झालं पाणी ।। बाळासाठीं आईनें टाहो फोडीला । गोरा कुंभार नाचांत रंगला ।। घरधणीन बोले गोरोबाला । काय सांगू तुमच्या विठोबाला ।। पोटचा गोळा तुम्हीं तुडविला। माझ्या वंशाचा दिवा रे विझला ।। शिव्या देऊं लागली पांडुरंगाला । गोरा कुंभार नाचांत रंगला ।। गोरा कुंभार म्हणे बायकोला । माझ्या हातून हा अपराध घडला ।। कां दुषण देतेस पांडुरंगाला । ज्यांनीं बाळ दिला त्यांनीच नेला ।। बाळ विठ्ठलाच्या चरणीं गेला । गोरा कुंभार नाचांत रंगला ।। एके दिवशीं दोघे गेला पंढरींत । बसले नामदेवाच्या किर्तनांत ।।

रामकृष्ण गोविंद् रामकृष्ण गोविंद् । गोरोबा घाली विठ्ठलास साद् ।। आली रुक्मिणी घेऊनी बाळाला । कवि कृष्णकान्त नाचांत रंगला ।।

卐

गाणे ८५ वें

# कौसल्येचा राम

श्रीराम आले अयोध्येला । आनंद् झाला कौसल्येला ।। आज येणार श्रीराम म्हणुनि । केला उत्सव नगरीच्या लोकांनीं ।। सजुनी उभ्या अयोध्येच्या नरनारी । गुढ्या तोरणानें सजली नगरी ।। चौदा वर्षांनी आले अयोध्येला । आनंद् झाला कौसल्येला ।। आनंदलें अयोध्या नगर । वाजती हो वाद्यें सुस्वर ।। नरनारी उधळिती गुलाल । झाली भुमीही रंगलाल ।। समोर गेला भरत आणायाला । आनंद् झाला कौसल्येला ।। राम लक्ष्मण चालले पुढें । शोभे वानर सेना हो मागें ।। प्रजाजन उभी स्वागताला । झाडा फुलांनाहि आनंद् झाला ।। ओवाळींती नारी श्रीरामाला । आनंद् झाला कौसल्येला ।। रघुपती राघव राजाराम । गादीवरी बसला सितापती राम ।। रघुपती राघव गजरीं । दुमदुमली अयोध्या नगरीं ।। दास रामाचा कृष्णकांत झाला । आनंद् झाला कौसल्येला ।।

卐

गाणें ८६ वें

# बोला ज्ञानेश्वरी माऊली

सूचना : हे गाणे पहांटे कार्यक्रम संपतां संपतां ४च्या नंतर म्हणावे

रात सरली प्रभात झाली । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। वाजूं दे घुघरूं पायांतली । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। दोन हाताची वाजूं दे टाळी । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। पूर्वेलाहि उषा प्रकटली । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। पक्षी गाती गाणी वनांतली । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। तळ्यांतलीं कमळें फुलली । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। हिरवळींत अक्षरें उठलीं । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। दवांक्षरें ती गार हिरवळीं । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। पंढरींत उभीं मूर्ति सांवळी । बोला ज्ञानेश्वर माऊली ।। म्हणे कृष्णकान्त माझी सावली । बोला ज्ञानेश्वर माऊली ।।

भाग ४ था समाप्त

मुंबई महाराष्ट्रांत गाजलेला लोकप्रिय

संतांचा भजनी संग्रह

**संताचीं नमुनेदार भजनें**

किंमत २५ पैसे

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

### भाग ७ वा

### गाणें ८७ वें

## मी दास हरीचा बंदा

कुणी निंदा कुणी वंदा । मीं दास हरीचा बंदा ॥ येथें जागा पाहुनी निर्मळ । आम्हीं मांडीला भक्तीचा खेळ ॥ आम्ही धरीला भक्तीमार्ग । अवघा एक अमुचा पांडुरंग ॥ आम्ही मांडीला भक्तीचा धंदा । कुणी निंदा कुणी वंदा ॥ हरीनामाची ही पाऊल वाट । आम्हां संताने दाविली बिनबोभाट ॥ माझ्या भजनी नाचे गोविंदा । कुणी निंदा कुणी वंदा ॥ गुरु माझी माउली सरस्वती । मायबापाची सावली गणपती ॥ नको आम्हां धनसंपत्ती । माझ्या जिवा आवडे भक्ती ॥ म्हणे कृष्णकांत हे कविचे सोंग । बिनबोभाट सांभाळी पांडुरंग ॥ हरीनामाचा केला मी धंदा । कुणी निंदा कुणी वंदा ॥

卐

गाणे ८८ वें

## प्रश्न

उगा जमुनी करता कां रे बडबड । देवाच्या द्वारीं होउंद्या सवाल रोकड ।। प्रश्न उत्तराचा चक्री सामना अरे खेळावा हुषार हो कृष्णा ।। गांवांत तुझा फार बोलबाला । म्हणुन आम्ही प्रश्न घालतो तुला ।। कैकयीचा ज्या घारीनें पिंड पळविला । त्याचे कारण काय सांगा आम्हांला ।। त्या घारीची मूळकथा सांगा सभेला । तरच खरा तूं गुरुचा चेला ।। कवि कृष्णकांत सांगे तुम्हांला । शोधा पुराण अन् सांगा मला ।।

★

गाणें ८९ वें

## उत्तर

( गाणें ८८ चें उत्तर )

करूं नकोरे उगाच वल्गना । होऊं खुशाल चक्री सामना ।। घारीची मूळकथा सांगतो तुला । एकदां ब्रह्मदेवाच्या सभेला ।। नृत्य करण्या चुकली अप्सरा सुवर्चला । ब्रह्मदेवाने तात्काळ घार होशील शाप दिला ।। सुवर्चलानें धरिले ब्रह्माचे चरण । दिला वर तिजला प्रसन्न होऊन ।। कैकेयीचा पींड टाक अंजनी पर्वतावर । त्याक्षणीं मुक्त होशील खरोखर ।। गुरुच्या मुला घे सवालास उत्तर । म्हणे कृष्णकांत खाडे शाहीर ।।

गाणे ९० वे

## प्रश्न

केलें तुका आणि झालें माका । असं कांहीं रावसाहेब येथें करूं नका ।। नमन करुनि गौरीहराला । प्रश्न पुसतो आम्ही तुम्हांला ।। उभी जानकी स्वयंवराला । दुर्घट पण जनकानी लाविला ।। शिव–धनुष्य ना उचले कुणाला । पाहूनि रावण उठला ।। त्याच वेळीं सीतेनें नवस केला । कोणता तो सांगा आम्हांला ।। तेचि धनुष्य कुणी दिलें जनकाला । सांगा गुरुच्या मुला सभेला ।। कवि कृष्णकांत गाई सभेला । गौरीहर देई आशिर्वाद त्याला ।।

卐

गाणे ९१ वे

## उत्तर

(गाणें ९० चें उत्तर)

नाचता येईना भरल्या सभे पुढें । म्हणुन म्हणती अंगण वांकडे ।। जानकी घेऊनि हातीं वरमाला । नेत्र शोधिती रघुनाथाला ।। परशुरामाचें धनुष्य उचलेना कोणाला । त्याचवेळीं गर्वानें रावण बोलला ।। ज्या रावणानें हलविला कैलास पर्वत । हें जुनाट धनु मोडीन मी एका क्षणांत ।। रावण धनुष्य उचलूं लागला । चिंता पडली जनकाच्या सीतेला ।। रामासाठीं केला नवस सीतेनें । ऐका नाचवाले चित्त देऊन ।। हे देवानो सहाय्य करा मजसाठीं रामास । चौदा वर्षें भोगीन वनवास ।। सीतेच्या नवसाला देव पावले । पण जिंकून रामानें सीतेस वरीले ।। म्हणे कृष्णकान्त बोला रामराम । रघुपति राघव राजाराम ।।

गाणें ९२ वें

## प्रश्न

जगाला बुडवुन संसार करूं नका। नास्तिकासंगे तिर्थयात्रा करूं नका ।। नाचवाले बुवा पुसतो तुला। राधा गौळणीची मूळकथा सांग मला ।। किती वर्षें तप करूनि जन्म पावली। राधा रुपानें कोण गोकुळी ।। राधा–कृष्णाचें प्रेम जडण्याला। काय कारण घडलें सांगा आम्हांला ।। नको दावू तोरा भरल्या सभेला। धुंड ग्रंथ अन् सांग मला ।। म्हणे कृष्णकांत येथें खेळ खेळा नीट। भरल्या सभेंत बोलूं नका चावट ।।

★

गाणे ९३ वे

## उत्तर

(गाणें ९२ चें उत्तर)

संसार संसार जन्माची हमाली। आठवे मना हें सारें अंतकाळीं ।। ऐक गुरुच्या लाडक्या बाळा। प्रश्नाचें उत्तर सांगतो तुम्हांला ।। एकदां इंद्राची पत्नी शची राणी। सहज गली वैकुंठ भुवनीं ।। विष्णूलक्ष्मीस एकान्ती पाहिले। शचीचें मन हरिचरणीं जडलें ।। शचीचें मन जाणून बोलले हरि। मनोरथ पूर्ण करीन कृष्ण अवतारी ।। साठ सहस्र वर्षें तप केलें शचीनें। गोकुळांत अवतरली राधारूपानें ।। रतिसुख कृष्णासंगे अनुभवलें। हरि विजय ग्रंथ राधाकृष्णाच्या प्रेमाने रंगले ।। हरिविजय ग्रंथांत पहा दाखला। कवि कृष्णकान्त सांगें तूम्हाला ।।

गाणे ९४ वे

## प्रश्न

अहो संसारांत जे शेंडीसकट बुडाले । ते जगाचें काय करतील भलें ।। ऐका तुम्ही हो नाच मंडळी । गोष्ट पुसतो तुम्हां जगावेगळी ।। एका आईच्या उदरीं जन्मलें । बहिण भाऊ सुंदर बाळें ।। बहिणीशीं भावानें लग्न लाविलें । सख्या बहिणीस बारा पुत्र झालें ।। हा उखाणा नव्हे सांगतो तुला । शोध पुराण अन् सांग मला ।। कवि कृष्णकान्तानें टाकिला सवाल । नका काढूं सभेतून पळ ।।

卐

गाणे ९५ वे

## उत्तर

( गणें ९४ चें उत्तर )

सदा सर्वकाळ अंतरी समाधानी । तयाहुन थोर श्रीमंत नाहीं जगीं कोणी ।। गौरीहर कृपेनें गातो सभेला ।। प्रश्नाचें ऊत्तर सांगतो तुम्हाला ।। मनुची कन्या अकुतीच्या उदरी । कोण जन्म पावले सांगतो खरोखरी ।। एका आईच्या उदरी जन्मले । यज्ञ अन् दाक्षिणा सुंदर बाळें ।। साक्षांत लक्ष्मी । नारायणाचे अवतार । म्हणून दोघांचे लग्न लागले खरोखर ।। दाक्षिण बाहिण सख्खी यज्ञाची । परंतु मूळ पत्नी लक्ष्मी विष्णूची ।। लक्ष्मीच्या उदरीं बारा पुत्र जन्मले । तुमच्या प्रश्नांत नवल हो कसलें ।। ही गोष्ट जगावेगळी पहा पुराणांत । जोडूनि कर तुम्हां सांगे कृष्णकान्त ।।

गाने ९६ वें

## प्रश्न

जो ज्योतिषाच्या नादी लागला । तोचि जाणावा खुंटावरचा कावळा ।। धडाधडा वाजे चौघडा, वाजे चौघडा । संभाळ मर्दा गोफणी भरुन खडा ।। ऐका, देवाची करणी नारळांत पाणी । कसें सांठलें सांगा ग्रंथ पाहुनी ।। तीन नेत्र कां त्या नारळाला । कुणाच्या वराचा परिणाम घडला ।। काय कारण घडले सांगा सभेला । नको फुकाचा तोरा दावूं आम्हाला ।। कवि कृष्णकांत सांगे तुम्हाला । याचें उत्तर विचारुनि यावे आपुल्या गुरुला ।।

卐

गाणें ९७ वें

## उत्तर

( गणें ९६ चें उत्तर )

अहो ज्योतिषाच्या नादानें झालें कोण सुखी । आंधळ्याच्या गाई देवा राखी ।। तुमच्या प्रश्नाचा गोफण खडा हुकला । डाव तुमच्या अंगाशींरे आला ।। नीट ऐकरे कवीच्या मुला । आम्ही नवल सांगतो तुला ।। एकदा भोळ्या शंकराच्या राशीला । शनि देवाचा फेरा हो आला ।। साडेसाती शनिची टाळण्याला । नारळांत लपला शंकर भोळा ।। शिवजठेच्या गंगेचें पाणी । नारळात अभंग राहिलें भरूनी ।। साडेसाती उमाने टाळली । नारळांत अमृत गंगा ती ठेविल ।। जातांना नारळास वर दिला । । माझ्यावाणी त्रिनेत्र जडतील तुजला ।।

देवाची करणी नारळांत पाणी । त्रिनेत्र पहा तुम्ही शाधोनि ॥ उत्तराचा सुटला गोफणखडा । कृष्णकान्तांत फोडीला प्रश्नचा घडा ॥

गाणे ९८ वे

## प्रश्न

रामराम पाव्हणं यावं सभेला । तुमच्यासाठीं आम्ही खेळ मांडिला ॥ प्रश्नोंत्तराचा खेळ खेळूंया चला । लटके बोलूं नका भरल्या सभेला ॥ दूर्वा प्रिय कां ? श्रीगणरायाला । इथेंच द्यावें उत्तर मला ॥ पार्वतीच्या लाडंक्या बाळाला । सिद्धी अंनं बुद्धी कोणी दिल्या त्याला ॥ उत्तर द्या पाव्हणं पळूं नका । कवि कृष्णाकान्त सांगे लटकें गाऊं नका ॥

★

गाणे ९९ वे

## उत्तर

( गाणें ९८ चें उत्तर )

रामराम आमुचा भरल्या सभेला । ऐका पाहुणं सांगतो तुम्हांला ॥ अनलासूर पृथ्वी जाळूं लागला । वर्तमान सांगती देव गौरीहरला ॥ गणरायानें गांठले अनलासुराला । पोटांत रचिवून टाकले असूराला ॥ अग्नीरुपी असूर पोटांत गेला ।

अंगाचा दाह होऊं लागला ।। उपाय करूनि देव सारे थकले । त्याचवेळी ब्रह्मदेव धांवले । सिद्धी अन् बुद्धी केल्या अर्पण । गौरीहराला त्याचवेंळीं ब्रह्मदेवानें ।। तरी देहाची आग शान्त होईना । कळलें वर्तमान अठ्यांऐशी सहस्त्र मुनीनां ।। धांवत आले गौरीहर मंदिरीं । सर्वांनीं वाहिल्या एकवीस दुर्वा शिरीं । त्या दूर्वांनें शांती लाभली गणरायाला । म्हणून दुर्वा श्रेष्ठ ठरली पुजेला ।। कृष्णकांतानें प्रश्न उत्तरानें फेडिला । पाव्हण्यांचा मान आम्हीं ठेविला ।।

卐

गाणें १०० वें

## प्रश्न

मनांत मांडे पदरांत धोंडे । नका फिरवूं पाठ हरीनामाकडे ।।
प्रश्न अमुचा ऐका मंडळी । ओसाड गांवांत एरंड बळी ।।
ग्रंथ वाचून अक्कल वाढली । धंदा मिळाला बिन-भांडवली ।।
वासरांत लंगडी गाय शहाणी । दिसे तिला सारं जग अडाणी ।।
उथळ पाण्याला खळखळाट भारी । गर्वाची बाधा जडली पुरी ।।
प्रश्न नाहीं हो जागावेगळा । अर्थ सांगा भरल्या सभेला ।।
कवि कृष्णकांत पुसे तुम्हांला । कुठें मिळेल या गोष्टींचा दाखला ।।

卐

गाणें १८१ वें

## उत्तर

(गाणें १०० चें उत्तर)

सर्व रोगांवर बाजारी मिळे सर्व कांहीं। पण मानवी स्वभावाला औषध नाहीं ।। चार भस्माचे लावूनि टिळे। ओसाड गांवांत शास्त्रीबुवा आले ।। चार हात कमरेला सोवळें। चार जमविले आडाणी चेले ।। आम्ही जगांत पंडित भले। स्वतःला शहाणें म्हणूं लागले ।। उसांत एरंड जरी वाढला। तरी ऊसाची सर कशी येईल एरंडाला ।। कुठें शालू कुठें वाकळ। शालू शेजारी कशी शोभेल वाकळ ।। मुलखाचा अति तो शिवराळ। संतांत ढोंगी संत कसा शोभेल ।। म्हणे कृष्णकांत ऐका बाबा। चोराच्या त्या उलट्या बोंबा ।।

**भाग ७ वा समाप्त**

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

### भाग ८ वा

### गाणें १०२ वें

रिमझिम बरसत श्रावण गेला। रुणूझुणू नाचत भाद्रपद आला ।। चतुर्थीला आम्ही गौरीहर पूजिला। बाळगोपाळ जमले नाचायाला ।। नमन करुनि मातापित्याला। गातो चरणी पार्वतीच्या बाळा ।। भक्तजन आले तुझ्या भेटीला। तुम्ही संभाळा आमुचा मेळा ।। जोडूनिया कर म्हणे कृष्णकांत। तुझा विसर न पडो मज दिनरात ।।

卐

गाणें १०३ वें

## प्रश्न

एका कविची ऐकुनी लोकप्रिय किर्ती। शेजारचे ज्योतिषी अन् शिंपी जळफळती ॥ निंदक, भांडखोर जुगारी आप्पा। याची संगत नकोरे बाप्पा ॥ ऐक चतुर गुरुच्या बाळा। चंद्र अन् सूर्य दिसती जगाला ॥ त्या दोघांत शीघ्रगती कोणाला। सांगा, चंद्राला कीं सूर्याला ॥ चंद्र, सूर्य फिरती बारा राशींत। कोण फिरे जलद बारा राशींत ॥ नक्षत्रें किती सांगा आकाशांत। मग खुशाल गाई भरल्या सभेंत ॥ कृष्णकांत गाई प्रश्नांचे चुटके। शास्त्राला न लावता धक्के ॥

卐

गाणें १०४ वें

## उत्तर

(गाणें १०३ चें उत्तर)

सोंग घ्यावे पण ढोंग करूं नये। दान करावें पण बढाई मारूं नये ॥ अरे ज्योतिषीबुवा सांगतो तुला। तुझा बोलविता धनी वेगळा ॥ बारा राशींत फिरण्यास सूर्य देवाला। बारा महिनें लागती त्याला ॥ सूर्याहून शिघ्र गति-चंद्र चालतो। बारा राशी एका महिन्यांत फिरतो ॥ सत्तावीस नक्षत्रें जाण आकाशांत। पहा शोधोनी दाखला ग्रंथांत। म्हणे कृष्णकांत घे सवालास उत्तर। सव्वा रुपया ठेव माझ्या हातावर ॥

★

गाणें १०५ वे

## प्रश्न

हरीभजनांत जो खुशाल झोपा काढी। त्याच्यामागें जाणावी अवद्सा खडी ।। नमन करा गौरीतनयाला। आणि गिरजा मातेच्या चरणाला ।। सिंदूरवद्न कां म्हणती गणरायाला। सांग मला तूं कविच्या मुला ।। गणेशानें गुरु कोणासि हो केला। तयाचें नांव सांगा सभेला ।। चार मंडळी जमली सभेला। लटके बोलूं नको गुरुच्या मुला ।। ऐका, कवि कृष्णकान्ताचा चुटका। गर्वाचा नाच कधीं खेळूं नका ।।

卐

गाणे १०६ वें

## उत्तर

(गाणें १०५ चें उत्तर)

मनां जडो छंद हरीकिर्तनाचा। जिवा लागो नाद हरी जागरणांचा ।। प्रश्नाचें उत्तर ऐक कविच्या मुला। सिंद्रासूर बहू उन्मत्त झाला ।। तिन्हीं लोकांत प्रलय मांडिला। देव गेले शरण पार्वतीला ।। पार्वतीच्या उदरीं गणेश जन्मला। देवादि-कांना आनंद झाला ।। चंद्रकोरगत बाळ वाढला। पराशर ऋषींशी गुरु त्यानें केला ।। सिंदुरासुराच्या अंगाला गणेश झोंबला। अंगाला अंग घांसूनी यमसद्नी धाडिला ।। शेंद्री रंग लागला गणेशाच्या देहाला। म्हणून सिंदूरवद्न नांव पडलें त्याला ।। कवि कृष्णकांतानें प्रश्न फेडिला। नाचा आनंदें भरल्या सभेला ।।

### गाणें १०७ वें

## प्रश्न

संताच्या संगती सुख वाटे जिवा ।स्वर्गीचे ते देव करती हेवा ।। हरीभजनांत नित्य असे जो दंग । त्याच्या घरी नांदे एक पांडुरंग ।। करा नमन धरतीमातेला । बाळ शरण आले चरणाला ।। नीट ऐक, गुरुच्या मुला । रावणाची लंका ठाऊक जगाला ।। किती गांव होती लंका लांबीला । सांगा तुम्ही हो भरल्या सभेला ।। किती शिवमंदिरे होती लंकेला । ग्रंथात शोधुनी सांग मला ।। गौरीबाळाच्या धरुनीं चरणाला । प्रश्न कवि कृष्णकान्तानें केला ।।

*

### गाणें १०८ वें

### ( गाणें १०७ वें उत्तर )

गेल्या जन्मीचे पुण्य ज्याच्या गांठीं । त्याच्याच नशिबीं घडे संत भेटी ।। करा नमन गौरीमातेला । नमू सारे शिव चरणाला ।। नीट ऐक गुरूच्या मुला । मारुती सांगे हो रामचंद्राला ।। लंका तीनशें गांव लांबीला । कोट्यावधीं घरें आजूबाजूला ।। नऊ कोटी शिवालयें लंकेला । दया क्षमा शांति नाहीं त्या नगराला ।। कवि कृष्णकांत सांगे तुम्हांला । रामायणांत शोधोनि पहा दाखला ।।

卐

गाणें १०९ वें

## प्रश्न

अठरा पुराणें अठरा ऋषींची । मती गुंग करी भल्या-भल्यांची ।। गणराचे आम्ही भक्त लाडके । उडवूं प्रश्नांचे आम्ही फटाके ।। ऐक चतुर गुरुच्या मुला । विटाळ कैसा आला इंद्राला ।। त्या विटाळाचा भाग कुणाकुणा दिला । किती भाग त्याचे केले सांग सभेला ।। त्या विटाळाचा भाग कुणी घेतला । धुंड ग्रंथ आणि सांग मला ।। कृष्णकांत गाई भरल्या सभेला । नाचू आनंदे नित्य गौरीसणाला ।।

卐

गाणे ११० वे

## उत्तर

(गाणें १०९ चें उत्तर)

शास्त्रपुराणें हें एक जगाचें अजब कोडें । भले भले पंडित हरले या पुराणापुढें ।। गणरायाचे भक्त तुम्ही लाडके । आम्हीं सरस्वतीचे भक्त लाडके ।। नीट ऐक सवालास उत्तर । सांगतो घेऊनि ग्रंथाचा आधार ।। इंद्रानें मारिले विश्वरुपाला । ब्रह्महत्येचें पातक लागलें त्याला ।। त्या पातकाचा विटाळ आला नशिबाला । चार भागाचा ऐक सांगतो दाखला ।। पहिला भाग दिला भूमीला । क्षार मृत्तिकेंमध्यें उकिरडा ठरला ।। दुसरा भाग वृक्षांना दिला । डिंकाच्या रुपानें पाहतो आम्ही डोळा ।। तिसरा भाग स्त्रियांच्या वांट्याला । रजोरुपान

प्रगट होतो महिन्याला ।। चवथा भाग उदकानें तो घेतला । फेंस अन् बुडबुड्यांचा पहा दाखला ।। म्हणे मुंबईचा कृष्णकांत शाहीर । शेखठोक मांडितो आम्ही चव्हाठ्यावर ।।

गाणें १११ वे

## प्रश्न

ज्याचे त्याला गाढव ओझ्याला । प्रश्नाचा बाण संभाळ गुरुच्या मुला ।। ऐका ! नका घालूं उगाच गोंधळ । तुम्हां पुसतो आम्ही एक नवल ।। शिंपल्यांत सांठले नशिबाचे तीळ प्रथम शेंडा नंतर आलें मूळ ।। देवाच्या करणीनें घडलें नवल त्यांत उगवलें डाळींब रंगी फूल ।। चार मंडळीत केला सवाल । चारचौघांत द्या आम्हांला निकाल ।। कृष्णाकान्त म्हणें येथें खेळा खेळ । धंरू नका रे अभिमानाचें खूळ ।।

गाणे ११२ वे

## उत्तर

(गाणें १११ चें उत्तर)

देवाची करणी नारळात पाणी । ऐका तशीच या नरदेहाची कहाणी ।। शिंपल्यांत सांठलें नशिबाचे तीळ । ऐका तुमच्या प्रश्नाचा चौघांत निकाल ।। देवाच्या करणीचा ऐक चमत्कार । शिंपल्यांत घडलें रक्तमांसांचे शरीर ।। प्रथम शेंडा उगवला मस्तकाचा । शेवटून उगवलें मूळ पायाचें ।। नरदेह तीळ-मांसाचा गोळा । नशिबानें देहास घडविला ।। जन्मतांच देहास रक्ताचा मळ । तेच भासे डाळींबी रंगाचें फूल ।। चौघात उत्तर घ्या तुमच्या प्रश्नांचा । होऊं द्या चक्री सामना गौरी नाचाचा ।। निंदकांस म्हणे कृष्णकांत शाहीर । सुधारा पहिलें तुमचें घर ।।

गाणे ११३ वे

## प्रश्न

नको धरूं मना पापवासना । राहुं नको रिकामा हरीविना ।। नर जन्म हा यमाचा पाहुणा । हरी मुखे म्हणा हरि मुखें म्हणा ।। ऐक नवल पुसतो तुला । नीट ऐक कवीच्या बाळा ।। नळ वानरे मिळुनी सेतू बांधीला । पहिल्याच दिवशीं चौदा गांवें रचिला ।। एकाएकी त्या रात्री सेतू गडप झाला । काय कारण घडलें सांगा सभेला ।। घे देवाचं नांव अन् सांग सभेला । कवि कृष्णकांत सांगे तुम्हांला

गाणें ११४ वें

## उत्तर

(गाणें ११३ चें उत्तर)

जे करती नित्य भगवंताची पूजा । तयापुढें चालेना यम-राजाच्या गमजा ।। ऐक माझ्या गुरुच्या मुला । प्रश्नाचें उत्तर देतो तुम्हांला ।। चौदा गांवें सेतु समुद्रावर रचिला । त्याच दिवशीं नळाला गर्व हो झाला ।। तिमिंगल मत्स्याच्या बाळानें गिळीला । चौदा गांव सेतु त्या रात्रीला ।। नवल सांगती वानरे श्रीरामाला । आज्ञा केली श्रीरामानें तिमिंगल मत्स्याला ।। तिमिंगल आज्ञा करी आपुल्या बाळाला । ओकून सेतु पूर्व जागीं ठेविला ।। पाहिला मताप तिमिंगल बाळाचा । झाला गर्व नष्ट त्या क्षणीं नळाचा ।। कृष्णाकान्त म्हणे ठाऊक नसे खरोंखर । किती सांपडतील शेरास सव्वाशेर ।।

गाणे ११५ वे

# रामचा हट्ट

कौसल्यैच्या रामानें हट्ट धरीला । आकाशीचा चंद्र मागें खेळण्याल ॥ मांडीवर घेतां मिटेना पापणी । रडे सारखा गगनीं नजर रोखोनी ॥ झोपेना हो बाळ सोन्याच्या पाळणी । थकली कौसल्या अंगाई गीत गाऊनी ॥ अयोध्येच्या रामानें हट्ट धरिला । आकाशीचा चंद्र मागें खेळण्याला ॥ नानापरि समजविता उगा राहिना । खेळविती दासी तरी मुळी हंसेना ॥ कौसल्येच्या सदनीं सुमंत आले । प्रतिबिंब चंद्राचें आरशांत दाविलें ॥ आरश्यात चंद्र पाहूनी राम हंसला । गगनींचा चंद्र मागें खेळण्याला ॥ रामाचा तो हट्ट सुमंतानें पुरविला । कौसल्या राणीला आनंद झाला ॥ कौसल्या साखर वाटी अयोध्याला । प्रजा देती धन्यवाद सुमंताला ॥ रामाला हो गगनींचा चंद्र मिळाला । नाचा आनंदे भरल्या सभेला ॥

भाग ८ वा समाप्त

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग ९ वा

गाणें ११६ वें

## गोकुळीच्या गौळणीचे गाऱ्हाणें

ऐक यशोदे तुझा ग कान्हा । भर रस्त्यांत घाली धिंगाणा ॥
नाही बाळ तुझा ग साधा । याने गोकुळ लाविलें नादा ॥
जमवुनी पोरें अडवितो वाट । गोरस लुटूनी फोडितो माठ ॥
आवरेना ग बाई हा कुणा । भर रस्त्यांत घाली धिंगाणा ॥
परवां ग आला माझ्या सदनी । पोट पाही माझें चांचपोनी ॥
मला पुसे तुझा चक्रपाणी । तूं राहिलीस कशी गर्भिणी ॥
भारी उर्मट ग झाला कान्हा । भर रस्त्यांत घाली धिंगाणा ॥
वरपांगी दिसे हा श्रीरंग भोळा । याच्या अंगी भरल्या नानाकळा ॥
हा तुझा ग लाडका बाळ । ब्रह्मांड खांकेत सहज लपवील ॥
कामधंदा याच्या नादा सुचेना । भर रस्त्यांत घाली धिंगाण ॥

गाणे ११७ वे

## प्रश्न

हरीनामाचें गाठोडें ठेवुनी घरी । रिकाम्या डोक्यानें जाऊं नका पंढरी ।। नमन करूनि गातो गौरीहराला । प्रश्न पुसतो तुला कविच्या बाळा ।। यादवांचा कुलगुरु सांगा हो आम्हांला । नंद यशोदा कुणाचे अवतार बोला ।। कुणाच्या वराने जन्मले गोकुळीं । सांग आतां तुझी रे पाळी । कृष्णकांत लागुनी चरणाला । गाई हरी गुण नित्य भाद्रपदाला ।

गाणे ११८ वे

## उत्तर

( गाणें ११७ चें उत्तर )

कवीच्या बाळा नीट घे ऐकूनी । यादवांचा कुलगुरु गर्गमुनी ।। द्रोणवसू जन्मला नंदनांवानीं । धरा झाली यशोदा त्याची पत्नी ।। ब्रह्माच्या वरानें जन्म पावले गोकुळीं । देव खेळले नंदाघरी इच्छा तृप्त झाली ।। सवालास उत्तर दिलें सांगूनी । कृष्णकान्त गाई गणराया चरणीं ।।

गाने ११९ वें

## प्रश्न

नाचवाले बुवा आपण सारे । एका धरतीमातेची लेंकरें ।। भारतमातेच्या लाडक्या बाळा । राष्ट्रीय सवाल पुसतों तुला ।। ‘ चलेजाव ’ चा ठराव कुणी हो केला । कोणत्या साली कोणत्या महिन्याला ?।। कोणती तारीख सांगून द्या सभेला । तरच तूं खरा देशभक्त गुरुचा चेला ।। म्हणे कृष्णकांत राष्ट्रवीरा नाचरे । सभा सोडून घरीं पळूं नको रे ।।

## गाणे १२० वें

### ( गाणें ११९ चें उत्तर )

बेचाळीस साल सुरू जाहले । ब्रिटीशांचे ग्रहमान फिरलें ।। ऑगष्टची आठ तारीख उजाडली । मुंबापुरींत कॉंग्रेसची सभा भरली ।। 'चलेजाव' गांधीजी इंग्रजांस बोलले । दोनच शब्दानें साहेब भडकले ।। मध्यरात्री पुढारी अचानक पकडले । झंझावाती बंड देशांत सुरू जाहले ।। तळहाती घेऊनि शीर हुतात्मे लढले । भारताच्या इतिहासांत किर्तीरुपी अमर जाहले ।। म्हणे कृष्णकांत मुंबईचा शाहीर । भारताचा इतिहास हुतात्म्यांनें केला अमर ।।

## गाणें १२१ वें

### प्रश्न

धरा रामकृष्ण ध्यानी रामकृष्ण मनी । सर्व सुखे येती लोटांगणी ।। सभा मंडपांत यावे गौरीहरा । भरल्या सभेंत तुम्ही रंग भरा ।। ऐका हो ऐका, तुम्ही नाच मंडळी । संभाळा आमुची सवाल बिजली ।। श्रीकृष्णानें कौतुक दाविले गोकुळीं । ब्रह्म इंद्राची गुर्मी जिरली ।। गोवर्धन पर्वत उचलूनि धरीला । काय कारण घडलें सांगा सभेला ।। पर्वत किती कोस होता लांबीला । किती दिवस हरीनें करंगळीवर धरिला ।। जबाब द्याया येई पुढें चतुरा । करू नको तूं सभेतून पोबारा ।। म्हणे कृष्णकांत चोराला दिसें जग चोर । म्हणूनी यांच्या उलट्या बोंबा गांवभर ।।

गाणे १२२ वे

# उत्तर

(गाणें १२१ चें उत्तर)

रामकृष्ण नाम सुखाचें साधन । ऐसे ग्वाहि देती संत वचन ।। ऐका मंडळीं करूं नका गलबला । सवालास उत्तर देतो तुम्हांला ।। इंद्रयागाचा निषेध हरिने केला । हें वर्तमान कळले स्वर्गीं इंद्राला ।। इंद्रदेव भडकले ह्या गोष्टीला । प्रलयमेघ सोडिलें बुडविण्या गोकुळाला ।। गोकुळ आले शरण श्रीहरिला। गोवर्धन डाव्या किरंगळी उचलूनी धरीला । चार कोस लांबी गोवर्धन पर्वताची । धुंडा पानें तुम्हीं हरिविजय ग्रंथाची ।। सात दिवस गोकुळ होतें पाण्यांत । गोपगोपीका होते गोवर्धनाखालीं आनंदांत ।। इंद्रानें पाहिली श्रीहरीची लिला । गर्व हरण त्याच क्षणीं झाला ।। घे सवालास उत्तर शेखठोक । म्हणे कृष्णकान्त नका उडवू नाक ।।

गाणें १२३ वें

# प्रश्न

ज्योतिषाला एक वस्ताद कवि भेटला । त्याचा सुंठी वाचुन खोकला गेला ।। ऐक, गुरुच्या बाळा प्रश्न माझा । कशाला फुका लाविशी गमजा ।। ब्रह्मांडाचा विस्तार पुसतो तुला । किती योजनें सांगा तो लांबीला ।। विष्णूने मत्स्य अवतार भूतळीं घेतला । प्रलय काळीं रक्षीलें मनूला ।। किती योजनें होता लांबीला । मत्स्य अवतार सांगा आम्हांला ।। ऐवढें द्यावें सांगून आम्हांला । कवि कृष्णकांत विनवी तुम्हांला ।।

गाणे १२४ वे

## उत्तर

(गाणें १२३ चें उत्तर)

शेंडी सकट ज्योतिषी संसारात बुडाला। फुकाचा बडेजाव कारण फजितीला ॥ पंचांग वाचतां फुकट जन्म गेला। ऐक गुरुच्या मुला सांगतो तुला। सांगतो तुला ब्रह्मांडाचा विस्तार। पुराण ग्रंथाचा घेऊनि आधार ॥ पन्नास कोटी योजनें आहे रे। शास्त्र पुराणीं दाखला पहा रे ॥ मत्स्यावताराची लांबी पुराणें सांगती। दहा लक्ष योजनें हो होती ॥ मद्‌भागवतांत पहा शोधून। सत्य नि असत्य येईल कळुन ॥ कर जोडून म्हणे कृष्णकांत। लटके म्हणून नका पुराणग्रंथ ॥

卐

गाणे १२५ वे

## प्रश्न

नारदास संसाराचा चटका बसला। साठ पोरांचा संसार टाकुनी पळाला। सुखासाठी सारी भुते जमती। जग हे सारें सुखाचे सोबती।।ऐका मंडळीं करू नका गलबला। प्रश्न पुसतो आम्ही तुम्हांला ॥ इंद्राची संपति समुद्रात पडण्याला। काय कारण घडलें सांगा सभेला ॥ किती दंत इंद्राच्या ऐरावताला। द्या उत्तर आमुच्या प्रश्नाला ॥ किती योजने होता उंचीला। मंदराचळ पर्वत तो बोला ? ॥ कवि कृष्णकांत सांगे तुम्हांला। पुराण शोधून सांग आम्हांला ॥

गाणें १२६ वें

## उत्तर

( गाणें १२५ चें उत्तर )

चार धाम फिरूनी बुवा बनले। शेवटीं वोके संन्याशीच राहिले॥ चला करूं नमन गौरीहराला। तयाच्या कृपेनें गाऊं सभेला॥ ऐक तुझ्या प्रश्नाचें उत्तर बाळा। चित्त दे रे नीट शब्दाला॥ इंद्राची संपत्ती समुद्रांत पडण्याला। दुर्वास मुनीचा शाप कारण झाला॥ चार दांत इंद्राच्या ऐरावताला। पुराणांत शोधून पहा दाखला॥ मंदराचल पर्वत होता उंचीला। बारा हजार योजनें सांगतो तुला॥ कृष्णकान्तानें पुराण शोधून। केलें तुमच्या प्रश्नाचें खंडण॥

卐

गाणें १२७ वें

## प्रश्न

संताच्या संगती हरी मुखें म्हणा। हरी प्राप्तीचे उपाय संतापाशीं जाणा॥ ऐक गुरुच्या मुला तूं नीट। आमुच्या प्रश्नाचा फोडा तुम्हीं माट॥ नका करूं उगाच लटपट। (सवालास) जबाब देण्या व्हा धीट॥ विदूर कुणाच्या उदरीं जन्मला। अवतार कुणाचा सांगा सभेला॥ कुणाच्या शापानें दरिद्री पावला। पिता कोण तयांचा सांगा आम्हांला॥ कृष्णकांत म्हणे जोडूनि हात। नीट खेळ, खेळा भरल्या सभेंत॥

卐

गाणें १२८ वें

## उत्तर

(गाणें १२७ चें उत्तर)

कोणाचा हा देह, कोणाचें हें घर। जो माझें माझे करी तो मूर्ख खरोखर ।। संत म्हणती झोपूं नका रे कीर्तनांत। पुढच्या जन्मीं जाल सर्पाच्या योनींत। प्रश्नाचें उत्तर घे नीट ऐकून ।। विदूर हा यमाचा अवतार जाण ।। मांडव्य मुनीचा शाप होता यमाला। दासीच्या उदरीं यम विदूर म्हणून जन्मला ।। व्यास मुनि तो पिता त्याचा। झाला विदूर प्रिय भक्त श्रीकृष्णाचा ।। म्हणे कृष्णकान्त जोडूनि कर। निंदकानें केलें मज शाहीर ।।

★

गाणें १२९ वे

## प्रश्न

ब्रह्मानंदी ज्याचि लागे टाळी। तीच आत्मसुखाची खरी गुरुकिल्ली ।। सभामंडपी मांडीला खेळ। भजनवाले बुवा ऐका माझा सवाल ।। मूळ जन्म पावलें किती जाति। कोणीं केली हो त्यांची उत्पत्ती ।। करूं नका शास्त्रांची कुटाळकी। सांगा सभेला भरल्या बैठकी ।। आली नाचांची दारीं हो दिंडी। म्हणे कृष्णकान्त फोडा ही हंडी ।।

卐

गाणे १३० वे

## उत्तर

(गाणें १२९ चें उत्तर)

आम्ही सारे खेळु गोविंदा । कुणी निंदा कुणी वंदा ।। नीट ऐक गुरुच्या बाळा । विराटरुपी नारायण अवतरला ।। नारायण मुखांतून ब्राह्मण जन्मले। बाहूपासूनी क्षत्रिय जन्मले ।। मांड्यापासून वैश्य झाले । शेवटीं शूद्र पायापासून जन्मले ।। मद् भागवतात पहा रे दाखला । मैत्रेय विदुरास तो बोलला ।। कृष्णकांतने प्रश्न फेडिला । गौरीहरापुढें करूं दहिकाल ।।

गाणें १३१ वें

## नाच रे मुकुंदा

(चाल : नाचरे मोरा आंब्याच्या वनांत)

नाच रे मुकुंदा गौरीहरापुढे, नाच रे मुकुंदा नाच ।। धृ ।।
चतुर्थीचा सण आला रे, नाचाची मंडळी जमली रे
आपण सारे भाऊ एक सुरात गाऊ, एकापायावर नाच ।। १ ।।
भक्तिचें वारें अंगात खेळे, सभाजन सारे गुंग झाले
वाजती घुगरं तालांत फेर धरूं, सजला अमुचा नाच ।। २ ।।
डिम् डिम् डिम् वाजे डमरु, कैलासी नाचे जगद्‌गुरु
कृष्णकांत कविनें रचिलें हें गाणें, गणरायापुढें नाच ।। ३ ।।

**भाग ९ वा समाप्त**

-॥ श्री गजानन प्रसन्न ॥



# श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

## भाग १० वा

### गाणें १३२ वें

### संत ज्ञानदेव

निवृत्ती ज्ञानदेव सोपान प्रकटले । ब्रह्म विष्णू शिव ते नटले ॥ महाराष्ट्रांचे थोर संत । संन्याशाच्या उदरी जन्मले तीन दैवत ॥ तीन भावंडांत आदिमाया नटली । बहिण मुक्ताबाई त्यांची सावली ॥ म्हणती कुटाळ संन्याशाची मुलें । ब्रह्म विष्णू शिव ते नटले ॥ चार भावंडें टाकिली वाळींत । शुद्धी पत्र कुणी देईना पंडित ॥ चित्तीं धरूनि ते चौघेजण । विठ्ठल चरणी गेले शरण ॥ रेड्यामुखीं वेद वदविले । ब्रह्म विष्णू शिव ते नटले ॥ ज्ञानदेव म्हणे संत जना । एक तत्त्व नाम दृढ धरीं मना ॥ रामकृष्ण गोविंद मुखी म्हणा । हरीशी येईल तुझी रे करुणा ॥ आळंदीत सद्‌गुरु अवतरले । ब्रह्म विष्णू शिव ते नटले ॥

गाणें १३३ वें

## प्रश्न

राइचा पर्वत आणि रंकाचा राव। जगी चाले रोज हिच उठाठेव।। एक सवाल करतो तुम्हाला। सवालाचें उत्तर द्याहो आम्हाला ।। रसवंती राणीच्या राज्यांत । बत्तीस नोकर उभें पावसांत ।। बारा माहिने पाऊस तिच्या देशांत । तुम्हीं शेतकरी तिच्या राज्यांत ।। खादाड पक्की रसवंती । बत्तीस चाकर तिजला भरविती ।। सांगा मला कविच्या बाळा । नवल हे कुठल्या देशाला ? ।। द्या उत्तर भरल्या बैठकीला । कवि कृष्णकांत सांगे तुम्हाला ।।

गाणे १३४ वे

## उत्तर

(गाणे १३३ चें उत्तर)

येथें वेड्याला शहाणें म्हणतीं। शहाण्याला लोक वेडे करती ।। जर्नी बोकाळलीं अजब पंडितांची वस्ती । म्हणुनी दुनिया चालली आज उलटी ।। तुझं आहे गड्या तुझपाशीं । नाहीं तुझ्यारे ओठावरती मिशीं ।। एक रसवंतीं राणीची कहाणी । जीभ तुझी तीच रसवंती राणी ।। बत्तीस दांत तेच तिचे नोकर । करिती सेवा तिची अपार ।। लाळ बारा महिने सदा मुखांत । तेच पावसाचे पाणी तिच्या राज्यांत ।। लटक्या बाता मारु नको सभेला । कृष्णकान्त विनवितो तुम्हांला ।।

गाणें १३५ वें

## प्रश्न

सभेंत मारूं नको बढाई गुरुच्या मुला । गणराया दारीं हो नीट खेळा ।। चारचौघांत प्रश्न पुसतो तुला । नीट सांग तूं कविच्या मुला ।। गजासूर मुळचा कोण सांग सभेंला । कुणाच्या वराने गजानन झाला ।। कोण्या क्षेत्रीं गजासूर वधिला । त्या क्षेत्राचें नांव सांगा सभेंला ।। तुमचा वाजतो गांवांत डंका । भरल्या सभेंतून आतां पळूं नका ।। कृष्णकांत गाई प्रश्नाचा चुटका । शास्त्राला न लावितां धक्का ।।

गाणें १३६ वें

## उत्तर

(गाणें १३५ चें उत्तर)

एक बाळा करुं नको गलबला । चित्त दे माझ्या शब्दाला चतुर बाळा ।। एकदा महेश राजच्या नगरीला । बृहस्पति गुरु गेले भेटीला ।। पुजा करुनि संतोषविलें बृहस्पतिला । देव गुरु प्रसन्न झाला महेश राजाला ।। आर्शिवाद बृहस्पतीनें दिला राजाला । देव सारे वंदन करितील तुजला ।। पुढच्या जन्मी गजयोनी प्राप्त होईल । कैलासपति शंकर तुजला तारतील ।। तोच महेश गजकुळात जन्म पावला । एकदां चुकून शिवानें गजासूर मारिला ।। त्याच वेळीं गिरीजा पोटीं बाळ जन्मला । नव्हतें शीर त्या बाळाच्या धडाला ।। गजासुराचें शीर तोडूनी लाविलें धडाला । बृहस्पति गुरुचा शब्द खरा केला ।। गजासूर वधिला पर्यली काननांत । तेच सध्याचे 'परळी वैजनाथ' ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

'परळी वैजनाथ' नगर जिल्हांत। भरल्या सभेला सांगे कृष्णकांत ॥

## गाणें १३७ वें

## प्रश्न

टेकुनी खाणारे झोपूनी बोलणारे। हेच देशाचे शत्रू खरे ॥ कधीं नाहीं केलें भले कुणाचें। हे पुढारी कसले जनतेचे ॥ तुझी पोपटपंची कळली सभेला। आम्ही चार पावसाळे काढिले गुरुच्या मुला ॥ वराह अवतार कैसा तो झाला। सांगून दे तूं भरल्या सभेला ॥ आधार सांग कुणाचा पृथ्वीला। पळूं नकोरे लाडक्या बाळा ॥ धूंड ग्रंथ अन् सांग मला। कवि कृष्णकांत सांगे तुम्हांला ॥

## गाणें १३८ वें

## उत्तर

(गाणें १३७ चें उत्तर)

लोकशाहि आली आमुच्या देशांत। सच्चा इमानी देश-सेवकाला द्यावें मत ॥ स्वार्थासाठीं जे दिशाभुल लोकांची करतीं। देऊं नका सत्ता अशा चोरांच्या हातीं ॥ अरे तुमच्या पुराणांतला सवाल। गुढग्या एवढं पोर सोडविलं ॥ ब्रह्मदेवाच्या नाकपुडींतुन जन्मला। वराहाचें पिलु सांगतो तुला। अंगठ्यागत प्रथम जन्मला। वाढतां वाढता पर्वता समान वाढला ॥ पृथ्वीला आधार समुद्राचा जाणा। उदकांत पृथ्वीची केली स्थापना ॥ घ्या सवालास रोखठोक उत्तर। म्हणे मुंबईचा कृष्णकांत शाहीर ॥

१७८९६

गाणें १३९ वें

## प्रश्न

जगी पैसा जोडी पैसाहि तोडी। एकच हरीनाम श्रेष्ठ सर्व सुखें जोडी ॥ भरल्या सभेंत पुसतो तुला। ऐक लाडक्या गुरुच्या मुला ॥ लंकेच्या रावणाची पत्नी मंदोदरी। कुणी केली निर्माण सांग झडकरी ॥ कुणासारखें होतें रुप तिचें। सांग उत्तर माझ्या प्रश्नाचें ॥ दास आम्हीं गौरीहराचे। कवि कृष्णकान्त राहाणार मुंबईचे ॥

गाणे १४० वें

## उत्तर

(गाणें १३९ चें उत्तर)

ऐक तुझ्या प्रश्नाचें उत्तर। ठेवूनी साक्षीदार गौरीहर ॥ शंकराला केले रावणाने प्रसन्न। आत्मलिंग आणि पार्वती चालला घेऊन ॥ पार्वतीनें केलें विष्णुचें ध्यान। श्रीहरी तात्काळ आले धावून ॥ अंगावरले काढिलें शितल चंदन। मंदोदरी केली त्यापासून निर्माण ॥ तिच मंदोदरी मयाला दिली श्रीहरींनें। रुप सितेसारखें तिचे सांगे रामायण। विष्णुने रावणास दिलें लटकें सांगून। अरे रावणा फसविलें तुला शंकराने ॥ कुरुप हडळ दिली शंकराने। मयाच्या घरीं ठेविली पार्वती लपवून ॥ शोधीत पाताळीं गेला रावण। मंदोदरीला पहातां गेला भुलुन ॥ मंदोदरी विष्णु अंश होती म्हणून। दिसे पार्वती अन् सिते परी जाण ॥ प्रश्न फेडीला कवि कृष्णकांतानें। पहा दाखला रामायणांत शोधून ॥

गाणे १४१ वे

## प्रश्न

तुमचें बुजगावणें कळलें आम्हाला। गुरु माझा तुमच्या बारश्याला जेवला ॥ ऐका आमच्या सवालाचा चुटका। उत्तर न देतां पळूं नका ॥ जनक राजा कैसा तो झाला। जनक कां म्हणती जनकाला ? ॥ आईविणा जनक कैसा जन्मला। हे नवल सांगा भरल्या सभेला ॥ नाहीं प्रश्न आमुचा लटका। उगाच सभेंतून पळूं नका ॥ कवि कृश्णकान्त गाई चुटका। पुराणास न लावितां धक्का ॥

गाणें १४२ वें

## उत्तर

(गाणें १४१ चें उत्तर)

नाचवाले बुवा नीट घे ऐकून। मद्भागवतात पहा शोधून ॥ निमि राजाच्या शरीराचे केलें मंथन। जनक जन्मला पितृ-शरीरापासून ॥ जनक राजा जन्मला आईविना। म्हणून जनक नांव पडलें जाणा ॥ घे सवालास उत्तर निट ऐकून। खरंखोटं पहा पुराणांत शोधून ॥

गाणें १४३ वे

## प्रश्न

लटका प्रश्न तुम्हीं घालूं नका। गर्वात देवादारीं नाचूं नका ॥ नाचवाले बुवा आम्ही पुसतों तुला। सासऱ्यानें मारीलें हो जांवयाला ॥ विधवा केलें आपुल्या कन्येला। हें नातें केव्हा कळलें सासऱ्याला ॥ विचार करून सांगा सभेला। कवि कृष्णकान्त सांगे तुम्हांला ॥

गाणें १४४ वें

# उत्तर

( गाणें १४३ चें उत्तर )

तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें। काम नाहीं रे येऱ्या गबाळ्याचें ॥ ऐका लक्ष्मणानें मारिलें इंद्रजिताला। जांवई आपुला नव्हते ठाऊक त्याला ॥ सुलोचनेच्या शब्दाला शिर हंसले। मारुती व लक्ष्मणास नवल ते वाटलें ॥ श्रीरामचंद्र बोललें हनुमंताला। शेष अवतार लक्ष्मण ठाऊक इंद्रजिताला ॥ तुझ्याच पित्यानें मारिलें मला। तुझ्या शब्दानें कसा येईल मदतीला ॥ म्हणून सुलोचनाच्या शब्दाला। इंद्रजित खद-खदुनी हसला ॥ श्रीरामाच्या मुखाने कळली सत्य घटना। लक्ष्मणाची शेषकन्या सुलोचना ॥ म्हणे तुम्हां कृष्णकांत शाहिर। घे सवालास रोखठोक उत्तर ॥

गाणें १४५ वें

# गौळण

मी रे गोरी तूं सांवळा। हरी तुझी संगत नको रे मला ॥ मी नाजुक सुंदर चाफेकळी। तुझी कांती रे काळी सांवळी ॥ मी सरळ मनाची राधा। तूं उर्मट भारी गोविंदा ॥ किती बाई तूं काळा काळा। हरी तुझी संगत नको रे मला ॥ मी सासुरवासीण नार। तूं लबाड पक्का चोर ॥ मी गौळण राधा भोळी। तुझ्या संगतीनें होईन काळी ॥ सासू जोड्यानें बडवील मजला। हरी तुझी संगत नको रे मला ॥

भाग १० वा समाप्त

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग ११ वा

गाणें १४६ वें

## नाचे ज्ञानेश्वर माऊली

संत आले मिळोनि राउळी । नाचे ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर माऊली ॥
पंढरीची आनंदली स्वर्गधरती । विठ्ठल गजरीं हरिजन नाचती ॥
ज्ञानदेव म्हणे सावळ्या विठ्ठला । भेटी आला हरिजन मेळा ॥
चोखा भजन करी राऊळी । नाचे ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर माऊली ॥
कृष्णरुपी नटला राऊळी विठ्ठल। गोकुळीचे घेऊनी संगे गोपाळ ॥
हरिजना संगे केला दहिंकाला। ज्ञानदेव म्हणे धन्य तुझी लीला ॥
गोकुळ लिला संताने पाहिली । नाचे ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर माऊली ॥

गाणें १४७ व

## प्रश्न

लेकीस बोलें सुनेस कां लागे। लपुं नको तूं गड्या गुरूच्या-मागें॥ नमन करूनि मुंबादेवीला। प्रश्न पुसतो आम्ही तुम्हांला॥ किती डोळे सांगा कावळ्याला। पक्षांत कनिष्ठ कां तो ठरला॥ विष्ठा भक्षण करी कां कावळा। काय कारण सांगा सभेला॥ प्रेत पिंड कां ठेविती कावळ्याला। कुणाचा वर सांगा तयाला॥ आम्ही प्रश्नांचा बाण सोडीला। पुराण शोधुनी सांगा मला॥ कवि कृष्णकांताची ऐकुनी निर्भीड गाणीं। कुटाळ लोकांच्या तोंडचें पळालें पाणी॥

卐

गाणे १४८ वे

## उत्तर

(गाणें १४७ चें उत्तर)

संताचे संगतीनें ज्ञानमार्ग सांपडे। मूर्खांच्या संगतीनें बसती हो जोडे॥ ऐक गुरूच्या मुला सांगतो तुला। एकदां सुंदर्शन गंधर्वानें पाहिलें सितेला॥ जानकीच्या सौंदर्याला तो भुलला। होऊनीया कावळा सितेला छळूं लागला॥ रामानें पाहिला कावळ्याचा चाळा। दर्भ मंत्रूनी त्या कावळ्यावर सोडीला॥ रामाचा दर्भ कावळ्यापाठीं लागला। गंधर्व कावळा तिन्ही लोकीं तो फिरला॥ आश्रय देईना कोणी त्याला।

शेवटीं नारदास शरण गेला ।। नारदांनी दिला कावळ्यास सल्ला । जाई शरण जानकीच्या पतीला ।। गेला शरण कावळा रामाला । दर्भानें फोडिला एकच डोळा ।। अन् शाप दिला रामानें त्याला । विष्टा खात फिरशील रस्तोरस्त्याला ।। एकच वर दिला रामानें कावळ्याला । मानाचा प्रेतपिंड लोक देतील तुजला ।। प्रेतपिंड तूं भक्षण करतां । मृत आत्म्याची होईल मुक्तता ।। म्हणे कृष्णकान्त घ्या सवालास उत्तर । नाचे आमुच्या नाचांत गौरीहर ।।

गाणे १४९ वे

## नामदेवांस पुत्र झाला

लाडक्या नामास पुत्र झाला । राउळी विठ्ठलासी आनंद झाला ।। देव बोले हो रुक्मिणीला चल प्रियें जाऊं बारश्याला ।। आंगडे टोपरे घेऊं बाळाला । साडी चोळी देऊं राजाईला ।। लाडक्या नामास पुत्र झाला । राउळी विठ्ठलासी आनंद झाला ।। देव नामा घरी हो आले । जनीनें देवाचें चरण धुतले ।। पुत्र नामाचा पाळण्यांत खेळे । रुक्मिणी देई पाळण्यास झोले ।। लाडक्या नामास पुत्र झाला । राउळी विठ्ठलासी आनंद झाला ।। जनी म्हणे बा विठ्ठला । देवा नांव काय ठेवूं बोला ।। देव आणि रुक्मिणी कौतुकानं हसले ! नारायण त्याचें नांव ठेविलें ।। लाडक्या नामास पुत्र झाला । राउळी विठ्ठलासी आनंद झाला ।।

गाणें १५० वें

## प्रश्न

देह जन्मला गोळा विटाळाचा । सोवळ्याचे ढोंग हा बडेजाव फुकाचा ॥ अरे संभाळ कविच्या मुला । माझ्या गुरूचा भिमटोला ॥ वामन अवतार कैसा तो झाला । सांगा तुम्ही हो भरल्या सभेला ॥ सांग मला गुरूच्या मुला । कोण्या तीर्थी अन् महिन्यात प्रगटला ॥ तयाचे माता पिता कोण सांग मला । नका दावूं आरसा हाताच्या कंकणाला ॥ घे देवाचे नांव अन् दे प्रश्नाचे उत्तर । नका फोडू माथीं फुटकें खापर ॥ कवि कृष्णकांत मुंबईचा शाहीर । कवन रचिते पाहूनि शास्त्राचा आधार ॥

卐

गाणे १५१ वे

## उत्तर

(गाणें १५० चें उत्तर)

श्राद्धकर्म करण्यासाठीं जे पंढरीत धांवती । आधी हवें पुण्या गांठीला तेव्हांच मिळे पितरांना मुक्ती ॥ ऐका लांब कान करूनी । नाही आमुच्या मस्तकी कांद्याच्या गोणी ॥ वामन अवतार भाद्रपदांत जाहला । शुक्ल द्वादशीच्या शुभ वेळेला ॥ अदिती माता कश्यप पिता तयाचा । आधार घेऊन सांगतो रे ग्रंथाचा ॥ प्रश्न फेडीला आम्ही तुमचा । सोडा अभिमान तुम्ही गर्वाचा ॥ कृष्णकांत लागूनी गुरूदेव चरणी । गाई गौरी नाचाची गाणीं ॥

गाणे १५२ वे

## प्रश्न

संताच्या सभेंत करूं नका गोंधळ । करूं नका येथें शिवीगाळ ।। श्रीगणरायाचें अंगण निर्मळ । येथें खेळा नीट खेळ ।। आम्ही पुसतो तुज एक सवाल । एक ध्यान देऊनि गोपाळ ।। किती द्वारे होती अयोध्या नगरीला । अन् किती द्वारे तुझ्या देहाला ।। सांग मला तूं कविच्या मुला । तुझें ज्ञान कळुं दे सभेला ।। म्हणें कृष्णकांत गुरु माझा प्रेमळ । मातापिता तोचि माझा विठ्ठल ।।

गाणें १५३ वें

## उत्तर

(गाणें १५२ चें उत्तर)

तुमची पोकळ बडबड कळली सभेला । तुझा गुरु नाहीं कधीं किर्तनांत बसला ।। जो हरी किर्तनाचा आळशी । त्यानें करूं नये उपदेश लोकांशीं ।। एक प्रश्नाचें उत्तर सांगतो तुला । नऊ द्वारें होती अयोध्या नगरीला ।। नऊ द्वारें तुझ्या नाशीवंत देहाला ।। पहा शोधून दाखला रामायणांत । नित्य भाद्रपदीं नाचतो कृष्णकांत ।।

गाणें १५४ वें

## अभिमन्यु गीत

बारावे दिवशीं हो रणभूमीला । कौरव पांडव उभे युद्धाला ।। द्रोणानें रचिला चक्रव्यूह सांपळा । धर्म द्रोणाचा संग्राम जुंपला ।।

अभिमन्यु बाळ धांवला मदतीला। चक्रव्यूह सांपळ्यांत एकटा तो शिरला ।।कर्ण द्रोणाने मिळुन घेरीला। अभिमन्यूचा रथ दोघांनीं मोडीला ।। तरी अभिमन्यु मागें नाहीं हटला। शतवीर लोळवीत पुढें चालला ।। दुर्योधन पुत्र लक्ष्मण मारीला। आठ कौरव पुत्रांचा संहार केला ।। आवरेना अभिमन्यु तो कुणाला। दौःशासन गदा घेऊनी धांवला ।। मिळुनी कौरवांनीं केला हो हल्ला। चक्रव्यूह सांपळ्यांत एकटा तो गांवला ।। दौःशासनानीं हो दावा साधला। अपघाती मस्तकी गदेचा प्रहार केला ।। जयद्रथाने पुरुषार्थ हो गाजवींला। लाथ मारली निचेष्ट अभिमन्यूला ।। कृष्ण चिंतनी अभिमन्यु रणी पडला। पांडव सैन्यांत हाहाकार उडाला ।। हे वर्तमान कळले तिकडे अर्जुनाला। अभिमन्युपाशीं तात्काळ धांवला।। शिर मांडीवर घेऊन शोक मांडीला। पुसे अर्जुन आपुल्या बाळाला ।। कोणी अपघाती मारलें सांग मला। त्या शत्रुला लोळविन ह्या क्षणाला।। जयद्रथाची करणी सांगे पित्याला। ऐकतांच अर्जुन त्यावेळीं गर्जला।। घोर प्रतिज्ञा ऐक तुं बाळा। उद्यां सूर्यास्तापूर्वी मारीन जयद्रथाला ।। ऐकतांच प्रतिज्ञा अभिमन्यु संतोषाला। कृष्ण चिंतनी बाळाने प्राण सोडिला।।ऐसा पुत्र पोटीं यावा जन्माला। म्हणे कृष्णकांत तोच रक्षील देशाला ।।

★

गाणें १५५ वें

# विठ्ठल गजरी देऊळ फिरले

नामाच्या किर्तनी नवल घडलें । विठ्ठल गजरीं देऊळ फिरलें ।। महाशिवरात्रीच्या दिवशीं । आवढ्या नागनाथापाशीं ।। नामदेव करी हरि–किर्तन । श्रोते मंडळी गेली रंगून ।। शंकर भक्तांचे मस्तक उठलें । विठ्ठल गजरी देऊळ फिरलें ।। शंकर भक्त म्हणती नामाला । हें पंढरपूर नव्हें सांगतो तुला ।। आम्हां शंकर भक्तांचें हे देऊळ । इथें नको दावू विठ्ठलाचें खुळ ।। उमापति शंकर मनांत हंसलें । विठ्ठल गजरी देऊळ फिरलें ।। नामा म्हणे त्या ब्राह्मणास । विठ्ठल शंकर सारखे आम्हांस ।। सांगूनि गेले वसिष्ट महामुनी । नका धरुं भेद हरि ठिकाणीं ।। पुजारी शंकराचे हो चिडले । विठ्ठल गजरीं देऊळ फिरलें ।। पुजाऱ्यानें उठविलें नामदेवाला । नामा देवळामागें गेला ।। दुःखी मनाने धांवा मांडीला । रंगल्या किर्तनांत खंड पडला ।। डोळे नाम्याचें पाण्यानें भरले । विठ्ठल गजरीं देऊळ फिरलें ।। आली करुणा महादेवाला । शंकर भक्तांना चमत्कार दाविला ।। नामाच्या किर्तनीं फिरलें देऊळ । साऱ्या भक्तांनीं पाहिलें नवल ।। गिरजापतीनें कौतुक केलें । विठ्ठल गजरीं देऊळ फिरलें ।।

**भाग ११ वा समाप्त**

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग १२ वा

गांणें १५६ वें

## नाचे दारी नाचांची दिंडी

घेउनिया हातीं संताची गुढी । नाचे दारीं नाचांची हो दिंडी ॥
मना लागो माझ्या भजनाची गोडी । संताचे हो गुण गाईन
आवडी ॥ जेथें चाले हरीकीर्तन । जेथें उभा रामकृष्ण ॥
घेउनीया हातीं संताची गुढी । नाचे दारीं नाचांची हो दिंडी ॥
बोलती टाळ संताचे अभंग । बोले वीणा अवघा एक पांडुरंग ॥
विठ्ठल रुक्माई गर्जे मृदंग । सात सुर अवघे करती दंग ॥
घेउनीया हाती संताची गुढी । नाचे दारीं नाचांची हो दिंडी ॥

गाणें १५७ वें

# तुंबडी भर दे

तुंबडी भर दे माझी तुंबडी भर दे । तुमच्या अमुच्या मैत्रीची तुंबडी भर दे ॥ भरल्या सभेंत करू नका भांडण । तुम्ही आम्ही पाहुणें ठेवा मानपान ॥ सवाल जवाबाचा रंग उडुं दे । तुंबडी भर दे माझी तुंबडीभर दे ॥ आजवरी होतो ऐकुन तुमचे नांव । झटपट रावसाहेब सांगा तुमचे गांव ॥ गणरायापुढें आतां गर्व सोडून दे । तुंबडीभर दे माझी तुंबडीभर दे ॥ भले भले पंडीत, शास्त्रपुराणापुढें हरले । तेहतीस कोटी देवहि मुग गिळुन बसले ॥ सत्य तें घे झुट सारे फेकून दे । तुंबडीभर दे माझी तुंबडी भर दे ॥ अठरा ऋषींची अठरा मतें । म्हणे कृष्णकांत कुणी पाहिलें खरेखोटें ॥ पटलं तर होय म्हण नाहींतर सोडून दे । तुंबडीभर दे माझी तुबडीभर दे ॥

गाणें १५८ वें

# नाचे कैलासपती शिवभोळा

शिवहर गजरी कैलास दुमदुमला । नाचे कैलासपती शिव भोळा ॥ झण झण झण झण घुंगरु वाजती । डमरु वाजवी बाळ गणपती ॥ शिवगण सारे शंख वाजवीतीं । नारद तुंबर सुस्वर गाती ॥ देव जमले पहाण्या सोहळा । नाचे कैलासपती शिवभोळा ॥ रुद्रमाळा गळा शोभती । शिवचरणी फुलें उधळी पार्वती ॥ अर्धांगी पार्वती बाळ गणपती । कर जोडूनी शिव गुण गाती ॥ ब्रह्मांड सारा निश्चल झाला । नाचे कैलासपती शिवभोळा ॥

गाणे १५९ वें

# संत सखू

विठ्ठल भजरीं संत आले कराड नगरीला । संतासंगे सखू निघाली पंढरीला ॥ कृष्णाच्या तीरीं ठेवूनि घागर । विठ्ठल नादा विसरली घरदार ॥ सासुशी सांगती मिळूनि शेजारीणी । सखू गेली वारकऱ्यांसंगे पळूनी ॥ आले शेजारी तमाशा पाहाण्याला । संतासंगे सखू निघाली पंढरीला ॥ मुसळ घेऊनि चंडिका धावली । बडवीत सखूला घरी आणिली ॥ अंधारी खोलींत कोंडूनी ठेविलीं । पांडुरंगे भजनी सखू रंगली ॥ वर्तमान कळलें राऊळी विठ्ठलाला । संतासंगे सखू निघाली विठोबाला । सखूच्या घरीं देव प्रगटले । सखूस मुक्त करूनी पंढरीस धाडिलें ॥ चंडीका सासूचे प्रेम जिंकुनी । दळण कांडण करी चक्रपाणी ॥ विठ्ठल रूप पाहातां सखू गेलीं वैकुंठाला । संतासंगें सखू निघाली पंढरीला ॥ प्रेत सखूचें संतानी तें जाळीलें । संत म्हणती सखूला देव पावले ॥ संत आले परतुनी सखूच्या घरीं । सांगती सखूनें देह ठेविला पंढरपूरी ॥ होऊनी घावरी चंडीका शोधी सखूला । संतासंगे सखू निघाली पंढरीला ॥ सखू जाऊनि आली पंढरीला । सखू रुपी विठ्ठल गुप्त झाला ॥ वारकरी पाहती डोळां चमत्कार । सखू दळीते घरीं जात्यावर ॥ पांडुरंग भक्ताचा हो भुकेला । संतासंगें सखू निघाली पंढरीला ॥

गाणें १६० वें

## लंगडा ग बाई लंगडा

लंगडा ग बाई लंगडा रंगानें सांवळा । जातां येतां हरीचा माझ्यावर डोळा ।। दिसे शामसुंदर नयनमनोहर । लाघवी ग बाई त्याची नजर ।। यमुनेला जाण्याची मला बाई चोरी । मुरली वाजवूनी करी बावरी ।। लंगडा ग बाई लंगडा नंदाचा सांवळा । जातां येतां हरीचा माझ्यावर डोळा ।। गोकुळांत घातला बाई यानें धुमाकुळ । ऐकेना ग बाई कुणा नंदाचा बाळ ।। कुंजवनीच्या आडवाटा त्याला ठाऊक । या भोळ्या राधेवर त्याचा ग रोख ।। लंगडा ग बाई लंगडा रंगाने सांवळा । जातां येतां हरीचा माझ्यावर डोळा ।।

★

गाणें १६१ वें

## द्रौपदी स्वयंवर

उभी द्रौपदी स्वयंवराला । हातीं घेऊनीया वरमाला ।। राजे-ऋषि अन ब्राह्मण आले । द्रुपद राजाने स्वागत केलें ।। कर्ण कौरव नटुनी आले । पांडवास शोधी द्रौपदीचे डोळे ।। हाती घेऊनीया वरमाला । उभी द्रौपदी स्वयंवराला ।। पण सांगे बंधु द्रौपदीचा । मत्यभेद हा पांच बाणांचा ।। उदकांत पाहूनी

जो फोडील डोळा । त्यांस द्रौपदी घालील वरमाला ।। कोणी उठेना पण जिंकायाला । उभी द्रौपदी स्वयंवराला ।। पण जिंकाया कर्ण तो उठला । सुतपुत्र म्हणून अपमान पावला ।। भिक्षुप रुपी अर्जुन उठला । पहिल्याच बाणाने फोडीला डोळा ।। अचुक मत्स्यभेद पार्थाने केला । उभी द्रौपदी स्वयंवराला ।। कर्ण कौरवांनी कलह माजविला । स्वयंवर मंडपी संग्राम पेटला ।। जिंकुनी पांडव आले घराला । सांगती वृत्तांत कुंतीमातेला ।। द्रुपद राजाने ओळखलें अर्जुनाला । उभी द्रौपदी स्वयंवराला ।।

★

गाणें १६२ वें

## गोपी पहाता श्रीरंग डोले

रूण झुण पायी वाजती वाळे । गोपी पहाता श्रीरंग डोले ।। गोकुळीची राधा भुलली हरीला । सावळ्या हरीचा लळा लागला ।। चमचम कांनीं कुंडल हाले । गोपी पहातां श्रीरंग डोले ।। नादी लाविल्या गौळणी गोकुळीच्या । आड वाटे अडवी कुंजवणीच्या ।। एका पायाने लंगडा ग चाले । गोपी पहातां श्रीरंग डोले ।। वाजवी बांसरी यमुना तिरी । नाचती गौळणी रानभरी ।। रूप गोजिरे नयन निळे । गोपी पहातां श्रीरंग डोले ।। जमवून गोपाळ खेळ खेळती । रोज गौळणीचे घडे फोडती ।। कृष्ण दर्शनी विश्व रंगले । गोपी पहातां श्रीरंग डोले ।।

गाणे १६३ वे

# नको मारू श्रीरंगा खडा

नको मारूं श्रीरंगा खडा। तुझ्या संगे करीन मी झगडा ॥
मी सुंदर कवळ्या मनाची। भोळी राधा मी गोकुळची ॥
नको येऊं माझ्या वाटेला। मी सांगेन यशोदे माईला ॥
माझा फुटेल नवा घडा। नको मारू श्रीरंगा खडा ॥
तुज लाज नाहीं गोविंदा। गोकुळीचे लोक करती निंदा ॥
किती सांगू तुज गोपाळा। नको करूस श्रीरंगा भलताच चाळा ॥
पती मारील मजला जोडा। नको मारूं श्रीरंगा खडा ॥
तुझा कपटी कावा कळला ॥ नको ओढूं माझ्या पदराला ॥
मीं सासुरवाशीण गोप बाला। सोड वाट जाऊं दे मला ॥
माझा पिचेल हिरवा चुडा। नको मारूं श्रीरंगा खडा ॥
नको करूं तूं थट्टा भलत्या वेळीं। लोक करतील गोकुळांत चुगली ॥
वचन देते वनमाळी तुजला। पौर्णिमेच्या रात्रौ येईन क्रिडेला ॥
नको करूं नयन वांकडा। नको मारूं श्रीरंगा खडा ॥

भाग १२ वा समाप्त

आमच्याकडे कोणत्याहि पुस्तकांची मागणी करतांना ५०% टक्के रक्कम आगाऊ पाठविण्याची कृपा करावी.

|| श्री गजानन प्रसन्न ||



## श्री गौरी–गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग १३ वा

गाणें १६४ वें

## आले भाद्रपदी नाचत गणपती

रुणझुण घागऱ्या पायीं वाजती । आले भाद्रपदीं नाचत गणपती ।। माझा नवस गणराय चरणी । नित्य भाद्रपदीं नाचेन गुणगायनी ।। रणझुण घागऱ्या पायीं वाजतीं । आले भाद्रपदी नाचत गणपती ।। तुम्हीच गणपती तुम्हीच विठ्ठल । तुम्ही मायबाप अमुचे प्रेमळ ।। रणझुण घागऱ्या पायीं वाजती । आले भाद्रपदी नाचत गणपती ।। ह्या कलीयुगी हो जागृत दैवत । विठ्ठल आणि गणपती साक्षांत ।। रणझुण घागऱ्या पायीं वाजती । आले भाद्रपदी नाचत गणपती ।।

गाने १६५ वें

## प्रश्न

ज्योतिषाला डसला पश्चात्तापाचा विंचु । ज्योतिषीबुवा करीना हुं कि चूं ।। ऐका ज्योतिषीबुवा आमुचा सवाल । मारूं नका बाता बोलूं नका बेताल ।। मंगळ ग्रहाची उत्पत्ती सांगा आम्हांला । शनिचे आईबाप कोण झडकरी बोला ।। अहो ज्योतिषीबुवा पंचांग गुंडाळुन ठेवा । शेंडी धरून हातीं अक्कल तुम्ही चालवा ।। म्हणे कृष्णकांत बापाचा हा बाप । सव्वा रूपयांत ऐका याची पोकळ थाप ।।

卐

गाणे १६६ वे

## उत्तर

( गाणें १६५ चें उत्तर )

अगडबंब अगडबंब आम्ही ज्योतिषी । आमुच्या घरीं पाणी भरती बारा राशी ।। अहो कवि साहेब तुमच्या संगे । हम बचेंगे तो औरभी लढेंगे ।। ऐका रावसाहेब नीट लक्ष देऊन । मंगळाचा जन्म पृथ्वीच्या गर्भांतून ।। ऐका शनिचे माता-पिता लक्ष देऊन । बाप सूर्य अन् आई छाया सांगे पुराण ।। म्हणे कृष्णकान्त मुद्लात खोट । पटवुनी द्या उत्तर बिनभोबोभाट ।।

गाणें १६७ वे

# चांगदेवाचा गर्व हरण

कैवल्याचा पुतळा ज्ञानदेव देखिला । लोटांगणीं शरण चांगदेव आला । चौदाशें वर्षे काळास चकविलें । म्हणून चांगदेव गर्वाने फुगले ।। गुरूविना चांगदेव कोरे राहिले । कोरे पत्र ज्ञानदेवास धाडीले ।। कैवल्याचा पुतळा ज्ञानदेव देखिला । लोटांगणीं शरण चांगदेव आला ।। ज्ञानदेवाने चांगाशी उत्तर लिहिलें । चौदाशें वर्षे तुम्ही कोरे राहिले ।। लटका अभिमान तुम्ही धरीला । गुरुविना जन्म फुकट हो गेला ।। कैवल्याचा पुतळा ज्ञानदेव देखिला । लोटांगणी शरण चांगदेव आला ।। ज्ञानदेव दर्शना मन आतुरलें । वाघावर बसुनी चांगदेव निघाले ।। ज्ञानदेव ते अंतरी जाणिलें ।। निर्जिव भिंतीस हो चालविलें ।। कैवल्याचा पुतळा ज्ञानदेव देखिला । लोटांगणी शरण चांगदेव आला ।। भिंतीवर बैसोनी चार भांवडे । चांगदेवा भेटी निघाले पुढें ।। नवल पाहुनी चांगदेव दिपले । ज्ञानदेवास लोटांगणी शरण गेले ।। कैवल्याचा पुतळा ज्ञानदेव देखिला । लोटांगणी शरण चांगदेव आला ।। ज्ञानदेवा दर्शनी गेला अभिमान । गुरु केला ज्ञानदेवास चांगदेवानं ।। म्हणे कृष्णकान्त माझी सावली । आळंदीची ज्ञानेश्वर गुरु माऊली ।। कैवल्याचा पुतळा ज्ञानदेव देखिला । लोटांगणी शरण चांगदेव आला ।।

गाणें १६८ वें

# ऐक सखे ग चंद्रकले

ऐक सखे ग चंद्रकले। मन माझें हरीनें ग चोरीलें ।। मी भोळी राधा गोकुळीची। कशी संगत जडली नकळे हरीची ।। वाट दिसेना ग यमुनेची। मूर्ती सांवळी मोहवी श्रीरंगाची ।। जमवुनी गोपाळ माझ्या दारीं खेळे। मन माझें हरीनें ग चोरीलें ।। तहान हरलीं भूकहि हरली। वेड लावी मजला हरीची मुरली ।। साऱ्या गोकुळी कुणकुण उठली। राधेसंगे खेळे वनमाळी ।। माझ्या संसारीं पाणी ओतीलें। मन माझें हरीनें ग चोरीलें ।। श्रीरंगाची संगत नडली मला। गोकुळाने माझ्याशी दावा धरीला ।। सासू छळीत रोज मला। तरी हि हरी चरणी जिव गुंतला ।। दहींभात मी हरीला भरविलें। मन हरीनें ग चोरीलें ।।

गाणें १६९ वें

# गवळ्या घरची तक्रार

गवळीवाड्यांत बोभाट झाला। कृष्णा गवळ्या घरीं रात्रीं जागला ।।धृ०।। म्हणती गौळणीचे पतीराज। या कृष्णाने सोडीली लाज ।। सासु सुनांत कलह माजला ।।१।। सारे जमुनी करती खल। कसा घ्यावा कृष्णावरी आळ ।। घरचे भेदी सामील या चोराला ।।२।। नंदाच्या कानावरी घालावी कशी गोष्ट। आपलेच दांत आपलेच ओंठ ।। चोरासंगती सावहि चोर बनला ।।३।। भल्या पाटलाचा हा लाडका लेक। म्हणुन करती सारे डोळेझांक ।। कुणी बांधावी घाट मांजराच्या गळा ।।४।।

गाणें १७० वें

## रुसला कां ग हरी

बाई हा मजवरी रूसला कां ग हरी। याच्या खोड्या आजवरी सहन केल्या किती तरी ॥धृ०॥ काल लाडीगोडीने मजसंगे बोलला। माझ्या मांडीवरी बैसुनी दहीं भात जेवला ॥ जाताना ग केली याने दुधाची चोरी ॥१॥ याच्या खोड्या आजवरी सहन केल्या कितीतरी ॥ परवां ग या हरीनें पुरविली पाठ। जमवुनी गोपाळ आडविली वाट ॥ नव्या साडीचा फाडीला पदर जरतारी ॥२॥ याच्या खोड्या आजवरी सहन केल्या कितीतरी ॥ आज पहाटे माझ्या सासुजवळी। खोट्या नाट्या ग याने लाविल्या कळी ॥ याचें तोंड पाहिलें सकाळच्या राममहरी ॥३॥ याच्या खोड्या आजवरी सहन केल्या कितीतरी ॥ या नंदाच्या पोराने चोरीलें ग माझें चित्त। म्हणुनी ग याचे अपराध घेतले पदरांत ॥ म्हणे कृष्णकांत सोडा राग आतां तरी ॥४॥ याच्या खोड्या आजवरी सहन केल्या कितीतरी ॥

गाणे १७१ वें

## भक्त कबीर

श्रीराम गजरी नाचत नाचत आले संत। मध्यरात्रीं कबीराच्या झोपडींत ॥ कमाल-कबीराम आनंद झाला। भोजन करण्या सांग कबीर कांतला ॥ कबीर कांता सांगे पतीला। धान्याचा

कण घरांत नाहीं शिलकीला ।। श्रीराम गजरी नाचत आले संत । मध्यरात्रीं कबीराच्या झोपडींत ।। बापबेटे निघाले भर वादळांत । शस्त्र घेऊनी चालले शहरांत ।। एका वाण्याचें फोडून दुकान । कमाल आंत गेला तो जपून ।। श्रीराम गजरी नाचत आले संत । मध्यरात्रीं कबीराच्या झोपडींत ।। धान्य देतां कबीराच्या हातीं । वाण्यानें घातली कमाल चरणी मिठी ।। कमाल बोले आपुल्या पित्याला । शिर माझें तोडूनी न्यावें घराला ।। श्रीराम गजरी नाचत आले संत । मध्यरात्रीं कबीराच्या झोपडींत ।। पुत्राचें शिर तोडतां कबीर हळहळला । सत्य गोष्ट सारी कांतेस बोलला ।। कबीर कांतेनें गिळलें दुःख । भोजन वाढूनी संतास दिले सुख ।। श्रीराम गजरी नाचत आले संत । मध्यरात्रीं कबीराच्या झोपडींत ।। दुसरे दिवशीं हो प्रातःकाळीं । राजदुतानें दिली धडाला सुळी ।। त्याच मार्गे चालली संत मंडळीं । शिराविना धड पाहिलें सुळी ।। श्रीराम गजरीं नाचत आले संत । मध्यरात्रीं कबीराच्या झोपडींत ।। नवल पहाती सारे संतजन । श्रीराम गजरीं धड ते करी भजन ।। कबीराची भक्ति जाणून प्रेमळ । केला जिवंत संताने भक्त कमाल ।। श्रीराम गजरीं नाचत आले संत । मध्यरात्रीं कबीराच्या झोपडींत ।।

भाग १३ वा समाप्त

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

### भाग १४ वा

### गाणें १७२ वें

सोन्याच्या सिंहासनी बैसले गजानन । भेटी आले नाचत हो भक्तजन ॥ मंगलमूर्ती गजरी रंगला भाद्रपद महिना । रंग भरी भक्त सभेला गजवदना ॥ आम्ही आलो देवा शरण लोटांगणी । मन माझें रंगुदे गुण गायनी ॥ सोन्याच्या सिंहासनीं बैसले गजानन । भेटी आले नाचत हो भक्तजन ॥ नाचे भाद्रपदीं गोपाळांचा गोविंदा । तुझ्या चरणांचा दास मी बंदा ॥ म्हणे कृष्णकान्त संभाळ ह्या दासाला । शिवपार्वतीच्या तूं बाळा ॥ सोन्याच्या सिंहासनी बैसले गजानन । भेटी आले नाचत हो भक्तजन ॥

गाणे १७३ वे

## झनक झनक पैंजण वाजती

झनक झनक पैंजण वाजती । भिल्लीण रुपानें नाचे पार्वती ।।
कैलासीचा हो शंकर भोळा । पार्वती संगे खेळण्या बैसला ।।
गिरजा हरली पहिल्या डावाला । महादेवाने तो डाव जिंकला ।।
नव्हते साक्षीदार त्यांच्या संगतीं । भिल्लींण रुपानें नाचे पार्वती ।।
दुसऱ्या डावांत शंकर हरले । होते नव्हते ते सारे डावांत गेले ।।
शेवटी लंगोटीलावली पणाला । पार्वतीनें तो डांव सहज जिंकला ।।
पार्वती संगें हरला लंगोटी । भिल्लीण रुपानें नाचे पार्वती ।।
शंकर पार्वतीचें भांडण जुंपले । हिमालयावर शिव रुसुन गेले ।।
कैलास उदास भासूं लागलें । देवही सारे संचित बसले ।।
शोधीत निघाली अवती भवतीं । भिल्लीण रुपानें नाचे पार्वती ।।
हिमालयावर ते शंकर सांपडले । नृत्य गायनीं शिवास भुलविले ।।
तप सोडून महादेव उठले । भिल्लीण संगे ते नाचूं लागले ।।
हळुंच लागला भिल्लीण पाठी । भिल्लीण रुपाने नाचें पार्वती ।।

गाणे १७४ वे

## रावणाची बडाई

लंकेचा रावण उन्मत्त झाला । सांगे बडाई तो अंगदाला ।।
माझा पराक्रम सांग रामाला । तेहतीस कोटी देव ठेविले

सेवेला ॥ इंद्र फुलांच्या माळा गुंफुन देतो । चंद्र माझ्यावर छत्र धरितो ॥ सूर्य माझ्या घरीं दिप लावितो । वायु माझ्या मंदिरी केर काढतो ॥ लंकेचा रावण उन्मत्त झाला । सांगे बढाई तो अंगदाला ॥ माझा पराक्रम सांग रामाला । तेहतीस कोटी देव ठेविले सेवेला ॥ अग्नी माझी वस्त्रें नित्य धुतो । माझें गुणगान गंधर्व गातो ॥ तेहतीस देव थरकांपती । लंकेची प्रजा करती माझी भक्ती ॥ लंकेचा रावण उन्मत्त झाला । सांगे बढाई तो अंगदाला ॥ माझा पराक्रम सांग रामाला । तेहतीस कोटी देव ठेविले सेवेला ॥ अंगद बोले अरे मुर्ख रावणा । नको करुं तूं फुकाच्या रे वल्गना ॥ येऊनी लंकेत सितापती । क्षणात उतरील तुझीरे मस्ती ॥ लंकेचा रावण उन्मत्त झाला । सांगे बढाई तो अंगदाला ॥ माझा पराक्रम सांग रामाला । तेहतीस कोटी देव ठेविले सेवेला ॥

गाणें १७५ वें

## ताकीद करते तुला श्रीरंगा

ताकीद करते तुला श्रीरंगा । जमवून पोरें करूं नको दंगा ॥ चंडू फळी तूं खेळू नको । गौळणीचे माठ फोडूं नको ॥ बारा गांवचीं पोरें तूं जमवूं नको । कुणाचींहि चोरी करूं नको ॥ ताकीद करते तुला श्रीरंगा । जमवूनी पोरे करूं नको दंगा ॥ गौळणीच्या नादीं तूं लागू नको । राधे घरीं कधीं जाऊं नको ॥ हट्ट भलताच धरू नको । यमुनेच्या पाण्यांत खेळूं नको ॥

ताकीद् करते तुला श्रीरंगा । जमवूनी पोरे करूं नको दंगा ॥
पिता तुझा गोकुळचा पाटील । तूं माझा लाडकारे बाळ ॥
लोक घेती तुजवर आळ । तूं नादी लाविलेस गोकुळ ॥
ताकीद् करते तुला श्रीरंगा । जमवूनी पोरें करूं नको दंगा ॥

गाणे १७६ वे

## राधेची तक्रार

यशोदे तुझ्या कृष्णाला कांहीं तरी सांग । जेव्हां तेव्हां करी ग हा पाठलाग ॥ धृ ॥ रोज माझ्या मागें यमुनेवरी येतो । डोईवरी घडा अचुक फोडीतो ॥ भरथंडीत भिजवी चावट श्रीरंग ॥ १ ॥ जमवूनी गोपाळ रस्त्यांत छळीतो । चुकवूनी डोळा दहीं दूध चोरीतो ॥ किती सांगू मी याचे रंग ढंग ॥२॥ हळुच येऊनी पदराला धरीतो । भलतेच दान मजकडे मागतो ॥ कसें सांगूं यशोदे तुला येईल राग ॥ ३ ॥ सासूला माझ्या खोटेंनाटें सांगुन । भरल्या संसारीं लावी ग भांडण ॥ मजवूनी गोकुळ खदखदा हसतो ग ॥ ४ ॥ मी भोळीभाळी गोकुळीची राधा । याच्या करणीने गोकुळ करी निंदा ॥ आम्ही काय करावें यशोदे तूंच सांग ॥ ५ ॥

गाणे १७७ वे

## महात्मा गांधीजी

जगाचा संत महा शांतीदूत । परमपूज्य गांधीजी जन्मले भारतांत ॥ भारताची गुलामगिरी नष्ट करण्याची । घोर

प्रतिज्ञा होती हो त्यांची ॥ म्हणे नको तलवार नको बंदूक। गर्जू आम्हीं सत्य अहिंसेचे सेवक ॥ या दुबळ्या साधुपुढें इंग्रजाने टेकिले हात। परमपूज्य राष्ट्रपिता जन्मले भारतांत ॥ देशाची गुलामी नष्ट करण्याला। गोरगरीबांस चरखा हो दिला ॥ जातीभेदाचें भूत गाडण्याला। जगापाशी त्यानें हट्ट धरिला ॥ एकीचा झेंडा फडविला गगनांत। परमपूज्य महात्माजी जन्मले भारतांत ॥ भारताच्या मुक्तीसाठीं देह लाविला पणाला। गांधीच्या हांकेला भारत सारा उठला ॥ 'चले जाव' घोषणा भिडली गगनाला। इंग्रजांचा अणूबॉम्ब पोकळ ठरला ॥ सत्य अहिंसा श्रेष्ठ ठरली जगांत। परमपूज्य बापूजी जन्मले भारतांत ॥ देशासाठीं गांधीजी तुरुंगात गेले। पण अहिंसा तत्त्व ते नाहीं सोडिलें ॥ तुरुंगाचे पाषाण जागृत केले। जुल्मशाहीचे सैतानहि हरले ॥ साबरमतीच्या झोपडीत राबे दिनरात। परमपूज्य गांधीजी जन्मले भारतांत। हरिजना-संगे बैसुनी भोजन केलें। भेदभावाचें भुत हो गाडीलें ॥ भारतास स्वातंत्र्य देऊनि ते गेले। तिन्ही लोक किर्तीनें दुमदुमले ॥ देश माझा मी देशाचा म्हणे कृष्णकान्त। परमपूज्य मोहनजी जन्मले भारतांत ॥

गाणें १७८ वें

## आला बागुलबुवा

अग बाई, मोठ्या डोळ्याचा बागुलबुवा आला। उगी उगी बाळा रडु नको तूं घननीळा ॥ १ ॥ सुपा एवढे कान

त्याचे । मुसळा एवढे दांत त्याचे ।। मडक्या एवढे पोट त्याचे। गाडग्या एवढे नाक त्याचे ।। अग बाई, झिपऱ्या केंसाचा बागुलबुवा आला ।। २ ।। खोड्या करूनीं आजवरी। रडविलीस गोकुळ नगरी ।। मग आज तूंच रडतोस का मुरारी। कोणी केलें चेटूक तुझ्यावरी।। अग बाई, उपाय माझा हरला बागुलबुवा आला ।। ३ ।। काय बाई तरी कौतुक हे । शब्द ऐकता राधेचे ।। कोण कुठची ही राधा। रडणें थांबले श्रीहरीचे ।। अग बाई, खुपींत आली स्वारी बागुलबुवा आला ।। ४ ।।

गाणें १७९ वें

## प्रश्न

मुर्ख मित्रांपेक्षां शहाणा शत्रु बरा। ब्र म्हणतां ब्रह्म जाणीं तोची शहाणा खरा ।। आमुचा सवाल ऐका हो निट। आमच्या प्रश्नाची सोडवा ही गांठ ।। रोज पहातो नवल आम्ही आकाशांत । चंद्राचा का ? क्षय होतो सांगा कृष्ण-पक्षांत ।। शोधा उत्तर शास्त्रपुराणांत निट। अन् सांगा तुम्ही हो चार मंडळींत ।। शुक्ल पक्षांत वाढे कशी कला। कुणाचा वर सांगा ह्या गोष्टीला ।। संताचा दास म्हणे कवि कृष्णकांत । मंगलमूर्ती मोरया गजरीं नाचा गर्जत ।।

गाणे १८० वें

## उत्तर

(गाणें १७९ चें उत्तर)

अहो गांठ पडली ठका ठका। तुमच्या प्रश्नाचें उत्तर एका ।। गुरुपत्नी तारेवर चंद्र भाळला । करूं नये तो गुन्हा चंद्राने

केला ।। चंद्रापासूत तारेला पुत्र बुध झाला । हा पुत्र कुणाचा देवांत वाद माजला ।। तारेच्या मुखानें शेवटीं कळलें गुरुला । चंद्रापासून बुध जन्मला ।। तात्काळ गुरूने शाप दिला चंद्राला । क्षयरोग जडेल चंद्राच्या शरीराला ।। गुरुशापानें कृष्णपक्षांत क्षय जडे । शंकराच्या वरानें शुक्लपक्षांत चंद्राची कला वाढे ।। रोज दिसे जगाला नवल आकाशांत । सत्य असत्य शोधून पहा पुरणांत ।। कवि कृष्णकान्तानें करूनी मंथन । पुराणांतून काढिलें उत्तराचें रत्न ।।

गाणे १८१ वे

## संत श्री साईनाथ

कलीयुगांत संतांचा संत । प्रकटले शिरडींत साईनाथ ।।
निंब वृक्षाच्या छायेखालीं । साईनाथ मूर्ती प्रकट झाहली ।।
नकळे कोणा साई कोण । धर्म हिंदु कीं मुसलमान ।। कली-
युगांत संतांचा संत । प्रकटले शिरडींत साईनाथ ।। चिलीम
तंबाखू हाती कटोरा । एवढाच संगतीला संसार सारा ।।
अंगावरी कफणी फडके डोईला । भक्तास दाविली अनंत लीला ।।
कलीयुगांत संतांचा संत । प्रकटले शिरडींत साईनाथ ।।
जळती पापें साईनाथ नामे । पळती दूर दुर्धर विघ्नें ।।
शिरडीची वारी एक वेळ करा । साई चरणीं भाव ठेवा पुरा ।।
म्हणे कृष्णकांत संतांचा संत । प्रकटले शिरडींत साईनाथ ।।

**भाग १४ वा समाप्त**

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## श्री गौरी-गणपतीच्या नाचांचा

# बोधपर चक्री सामना

भाग १५ वा

गाणें १८२ वें

## महाराष्ट्र दर्शन

प्रिय आमुची महाराष्ट्र धरती । प्रिय आम्हां भाषा मराठी ॥ देहू, आळंदी, पैठण, तुळजापूर । पुण्य भूमी संतांचे पंढरपूर ॥ गोदा, कृष्णा अन् चंद्रभागा । भूषविती तीर्थक्षेत्रीं या पवित्र गंगा ॥ सह्याद्री शिखरीं पक्षीं कुजबुजती । प्रिय आमुची महाराष्ट्र धरती ॥ शब्दाचें भांडार तुक्याचें अभंग । ज्ञानेशाची ओवीं अमृताचा कुंभ ॥ नामा, एकनाथ, तुका, ज्ञानेश्वर । त्यांनी थाटला येथें भक्तीचा संसार ॥ या भूमिवर गाजली संताची हो किर्तीं । प्रिय आमुची महाराष्ट्र धरती ॥ रायगड,

शिवनेरी पुण्यवंत किल्ले । त्यासाठीं लढले शिवबाचे शूर मावळे ।। कितींरुपी इतिहास सांगे आज रोकडे । गाई महाराष्ट्र शिवबाचे पोवाडे ।। भवानी तुळजापूरची शोभे सिंहावरती । प्रिय आमुची महाराष्ट्र धरती ।। देशावरी शेतकरी पिकवी गहूं बाजरी । पिकतो भात, नाचणी कोंकणच्या डोंगरी ।। जेजुरी गडाला नऊलाख पायरी । नवसाचें दैवत खंडोबा मल्हारी ।। धरतीच्या पोटी दडलें नवल गुजगोष्टी । प्रिय आमुची महाराष्ट्र धरती ।। उठा मावळे कंबर बांधा । बंधुभावाचा फडकवा झेंडा ।। प्रणाम माझा महाराष्ट्र देशा । सुखशांती नांदूदे दशदिशा । कथा पुराणें गर्जुनी सांगती । प्रिय आमुची महाराष्ट्र धरती ।।

गाणें १८३ वें

## गोपाळांचा डांव

आला खेळाया नंदाचा सांवळा । चेंडू उडवा भिडूं दे गगनाला ।। एक दोन तीन चार । आम्हीं गोकुळींचीं पोरें हुशार ।। पांच सहा सात आठ । गर्विष्ठांची करुं या मऊ पाठ ।। अरे कृष्णा हातीं चेंडू गावला पळा । आला खेळाया नंदाचा सांवळा ।। नऊ दहा अकरा बारा । डावांतून करूं नका पोबारा ।। तेरा चौदा पंधरा सोळा । चेंडू फेकीला कृष्णानें संभाळा ।। पेंद्या हातीं चेंडू गावला पळा । आला खेळाया नंदाचा सांवळा ।। सतरा अठरा एकोणीस वीस । डावांत पोरें आम्ही एकवीस ।। एकवीस बावीस तेवीस चोवीस । चेंडूनें बडवा लबाड पेंद्यास ।। पेंद्यावर डांव आला पळा । आला खेळाया नंदाचा सांवळा ।।

गानें १८४ वें

## प्रश्न

उगा कारे तुम्ही झालांत गोळा । कांहींतरी खेळ येथें खेळा ।। गणराया दारीं नाचें नाच मेळा । ऐक माझ्या प्रश्नाचा भीमटोला ।। कोण्या मुनीने सागर प्राशन केले । ते उदक सागरांत पुन्हां कसें सोडीलें ।। सांगा सभेला काय कारण घडलें । तरच तुम्ही पक्क्या गुरुचें चेले ।। जमलं तर आज सांगा तुम्ही । नाहींतर उद्यां भेटूं नक्की नाचवाले आम्ही ।। म्हणें कृष्णकांत खेळखेळा तुम्ही । विठ्ठलाचरणीं अभिमान ठेविला आम्ही ।।

गाणे १८५ वे

## उत्तर

( गाणें १८४ चें उत्तर )

ऐक कथा अगस्तीची गुरुच्या मुला । नवल सांगतो चित्त दे माझ्या शब्दाला ।। एकदां इंद्रास कळली सागराची करणी । देवांचे शत्रू ठेवी उदरांत लपवूनी ।। अगस्तीच्या कानावर घातली ही इंद्रानें करणी । शत्रु आमुचे सागरानें ठेविले दडवूनीं ।। एका ओंजळीनें सागरास केलें प्राशन । देवांचे शत्रु अगस्तीनें दिले शोधून ।। इंद्रदेवाच्या विनंतीनें अगस्ती मुनीनें । समुद्रांत उदक सोडलें मुत्ररुपानें ।। म्हणून खारट उदक जाहलें समुद्राचे । गाई पुराण चरित्र अगस्ती मुनीचें ।। म्हणे कृष्णकान्त गुरु माझ पांडुरंग । तयाचे कृपने घेतलें मी कविचें सोंग ।।

गाणें १८६ वें

## प्रश्न

संकटकाळी ज्याने रक्षीले आजवरी । तोचि परमेश्वर माझा कैवारी ।। भरल्या सभेंत प्रश्न पुसतो तुला । नका तुम्हीं करूं कानाडोळा ।। मारुति कुणाचा अवतार बोला । हनुमंत नांव कसें पडलें सांग मला ।। ह्या दोन गोष्टी सांग आम्हांला । मग खुशाल नाचा सभेला ।। शारदेचा दास कृष्णकांत । म्हणे शोधा तुम्ही ग्रंथांत ।।

गाणें १८७ वें

## उत्तर

(गाणें १८६ चें उत्तर)

प्रसन्न आम्हां आई पार्वती । सभेंत रंग भरी देव गणपती । अंजनीच्या उदरी अकरावा रुद्र जन्मला । नीट ऐक चतुर गुरूच्या मुला ।। जन्मताच आकाशांत तो उडाला । फळ म्हणूनी सूर्यास खाण्याला ।। राहु आला आडवा त्यास धरण्याला । मारुतीनें इंद्रा देखत त्यास बडविला ।। इंद्र मग खळवळुनी तो ऊठला । मारुती संगे तोही फार झुंजला ।। ऐरावतासह पाडिले इंद्र देवाला । आटपेना मारुती इंद्राच्या सैन्याला ।। शेवटीं मारुतीवर इंद्रानें वज्र सोडीलें । मारुतीच्या हनुवटीला तें लागलें ।। अंजनीचा बाळ मुर्च्छित धरणी पडला। पिता तयाचा वायु तो कोपला ।। तिन्ही लोकांचे प्राण कोंडूनी धरिलें । देव अन् मानव मुर्च्छित केलें ।। देवांनी मिळुनी

उठविलें मारुतीला । शेवटीं इंद्रानें त्यास चिरंजीव केला ॥ वज्रानें केली निशाणी हनुवटीला । म्हणूनी म्हणती हनुमंत तयाला ॥ म्हणे कृष्णकान्त आम्ही फिरलों गुरूच्या शोधांत । घोडं माझं पेंड खाईना भांडवलशाहि युगांत ॥

गाणें १८८ वें

## कर्ण जन्म

कुंती सांगते धर्म राजाला । कर्ण तुझारे बंधु थोरला ॥ कुंवारपणीं मज सूर्य देवाने । दिला जिवंत प्रसाद कर्ण ॥ सूर्यांगत होता बाळ तेजाळ । अंगीं कवच कानीं कुंडल ॥ कुंवारपणीं पोटीं बाळ जन्मला । कर्ण तुझा रे बंधु थोरला ॥ आई मी सख्खी बाळ कर्णाची । वैरीण झाले मी सात जन्माची ॥ नाहीं धरीला हृदयीं मायेनें । सुख मातेचें दिलें गंगेनें ॥ आई गंगेनें संभाळ केला । कर्ण तुझा रे बंधु थोरला ॥ एक वचनी माझा बाळ कर्ण । माझ्यासाठीं तुम्हां दिलें जिवदान ॥ बाळ लढला एकट्या अर्जुना संगे । गेला निजधामा किर्ती ठेवूनी मागे ॥ महाप्रतापी पांडव पहिला । कर्ण तुझा रे बंधु थोरला ॥

गाणे १८९ वे

## नवखी गौळण

ऐन दुपारीं सामसुम वेळीं । कोण ही सुंदरी पाण्या निघाली ॥ चला गोपाळानो आडवा तिची वाट । या गौळणीची ओळख

करून घ्या नीट ॥ तिला पुसारे तूं कोणाची कोण । नवखी दिसतें हि सुंदर गौळण॥ तुला कृष्ण विचारी माझ्या गोकुळी । कोण ही सुंदरी पाण्या निघाली ॥ सांग पेंद्या तिला माझा निरोप । गोविंदा वेडावला पाहुनी तुझें रूप ॥ तुझ्या नादा उडाली माझी झोप । कुंजवनी मला भेट गुपचूप ॥ मोकळ्या पदरीं नटुनी चालली । कोण ही सुंदरी पाण्या निघाली ॥ आजवरी राजरोस रोखुनी वाट । कित्येक गौळणींचे फोडीले मी माट ॥ नव्या नक्षींची नवी घागर । रिकामी पाहुनी घेतली मी माघार ॥ वाजेना बांसरी भुल मला पडली । कोण ही सुंदरी पाण्या निघाली ॥

गाणें १९० वे

## प्रश्न

उतावळा गुरू अन् शिवराळ चेला । याच्या हातीं सत्ता फजितीचा भोपळा ॥ अठराशें सत्त्याण्णव सालाला । जाने-वारीच्या तेवीस तारखेला ॥ भारत मातेचे पांग फेडण्याला । गगनाला गवसणी घालायला ॥ इतिहास या शूरांचा चम-त्कारानें नटला । कोण हा शूर पुत्र सांगा सभेला ॥ गुंगारा देऊनी शत्रुला गडप जहाला । अजुनी याचा ठावठिकाणा नाहीं लागला ॥ म्हणे कृष्णकान्त सांगा इथेंच रोखठोक । ओळखा आमुच्या ग्यानबाची मेख ।

卐

गाणें १९१ वें

# उत्तर

(गाणें १९० चें उत्तर)

दुर्जनांच्या उठाठेवी फार सज्जनांच्या गांवी। ब्रह्मदेवानें नेमले हे खास न्हावी ।। आज रोख उद्या उधार हा नियम जगाचा। म्हणून घ्या उत्तर रोकड तुमच्या प्रश्नाचे ।। ज्याने इंग्रजांना गुंगारा दिला। अन् साऱ्या जगाला धक्का दिला ।। या सुभाषचंद्र बोसची जगी गाजली कितीं। पोरेंटोरे अन् म्हातारे सारे ओळखती ।। म्हणे कृष्णकांत याच्या चरित्राला नाहीं तोड। अजुनी जगाला नाहीं उलगडले गूढ ।।

★

गाणें १९२ वें

# प्रश्न

बुवा बोले मंडळीं हाले। जैसा राजा बोले दल हाले ।। खेळा खुशाल प्रश्नाचा उत्तराचा सामना। नका करूं फुकाच्या वल्गाना ।। ऐका, ईश्वर एक आहे सारे म्हणती। परंतु ईश्वराचे भेद सांगा किती ।। पृथ्वी एकच आहे परंतु सृष्टि किती। विचार करूनी सांगा या नीट गोष्टी ।। म्हणे कृष्णकान्त ज्याला गर्व झाला। त्याचा मानपान आम्ही ठेवूं कशाला ।।

卐

गाणे १९३ वें

## उत्तर

( गाणें १९२ वें उत्तर )

ग्यानबाची मेख आम्हां कळली। तुमच्या प्रश्नाने आमुची झोप उडाली ।। हातच्या कंकणाला आरसा कशाला। तुमचा दिखाऊपणा कळला आम्हांला ।। ऐका ईश्वर एक आहे सांगे पुराण। परंतु भेद याचे आहेत दोन ।। ऐका बुवा नीट लक्ष देऊन। सगुण अन् निर्गुण हे भेद दोन ।। पुढें ऐका सृष्टिहि दोन आहेत। नीट तुम्ही शोधूनी पहा पुराणांत ।। पहिली जीव सृष्टि दुसरी ईश्वर सृष्टि। नास्तीक होऊनी मानु नका या असत्य गोष्टी ।। म्हणे कृष्णकान्त गर्व हा पाण्याचा बुडबुडा। जगा संगे भांडण करूनी होऊ नको वाकडा ।।

卐

गाणे १९४ वें

## रामबाण चक्री फटका

नमन करूनि गणराया चरणीं। रोख ठोक कविचा फटका ऐका ।। बोलूं नका अन् हंसू नका। सभेंत गडबड करूं नका ।। भरल्या सभेंत, हरि किर्तनांत। खुशाल झोपा काढूं नका ।। देवाचे भजन संताचे पवाडे। ऐकण्यास आळस करूं नका ।। संतांची निंदा कुटाळ धंदा। लबाड सौदा करूं नका ।। ढोंगी संतांची करून भक्ती। बुवाबाजी तुम्ही करूं नका ।। ओसाड

गांवांत आम्हीच पंडीत। खोटा अभिमान धरूं नका ।। कविचा फटका खमंग चुटका। लौकर आटपा म्हणूं नका ।। अक्लेच। रूंदक मुर्खांची संगत। भामट्याची दोस्ती करूं नका ।। शिकलेला पाहुणा दिसतो शहाणा। भटाला ओसरी देऊं नका ।। घरांत चंडीका कानांत मुद्रिका। गोसाव्याच्या सोंगाला फसूं नका ।। लोकशाही राज्यांत सतरा पक्ष गावांत। देशद्रोह्याला मत कधीं देऊं नका ।। कष्टाची भाकरी देशाची चाकरी। मर्दाचें भूषण सोडूं नका ।। अडला हरी देईल बाजेवरी। खुषींत गाजरें खाऊं नका ।। ज्योतिषीबुवा बाजुला ठेवा। आळशाच्या गांवा जाऊं नका ।। विघ्नसंतोषी मोकाट म्हशी। गांवांत आळशी ठेऊं नका ।। मुखीं हरी काखेंत सुरी। हंसुन दांत कधीं पाडूं नका ।। मर्दाची लढाई शक्तीची कमाई। दीनदुबळ्यांना दाऊं नका ।। घातकी मित्र चावरं कुत्रं। जोड्याशी उभे करूं नका ।। चटक चांदणी भटक भवानीं। घरांत मेहुणीं ठेऊं नका ।। फुटकी मडकी बायको कुसकी। भरल्या संसारांत आणूं नका ।। निंदक शेजारी गांवांत मदारी। उपाशी संगत करूं नका ।। टेकून खाणार झोपून बोलणार। पुढारी अपूला म्हणू नका ।। दारू पिणें गटारांत लोळणें। यमाला बोलावणें करूं नका ।। वय झालें साठ शेंडीला गांठ। बाईल तरणी करूं नका ।। पळती गाडी वेशेची माडी। म्हातारपणीं कधीं चढू नका ।। घरांत मरतीं उंदीर उपाशी। मिशीला तूप लावून मिरवूं नका ।। पोरगा बेकार खाण्याची मारामार। गरिबाच्या पोरीला बुडवूं नका ।। बायको उनाड सासरा लबाड। सासरी वस्ती करू नका ।।

लफड्याला मामला नवरा उतावळा। गुडघ्याला बाशींग बांधू नका ॥ चाळींत लफडी गाडीत गचडी। बायकांशी झगडी करूं नका ॥ वकीलदादा करील खुर्दा। कोर्टाची पायरी चढूं नका ॥ भाषा मराठी सायब गांवठी। नरड्याला लंगोटी बांधू नका ॥ गल्लींत प्रेमवीर केरसूणीतले हीर। डोळ्याचे तीर साधे समजू नका ॥ चोरटा बोकड पाहुणा खादाड। घरांत रोकड ठेवूं नका ॥ सासू भांडखोर सूनबाई चहाडखोर। जळत्या घरीं कधीं राहूं नका ॥ भाऊबंद सारे पैशाचे भाई रे ॥ कलीयुग आहे हो विसरु नका ॥ म्हणे कृष्णकान्त जोडून हात। लिहिलें लटकें म्हणू नका ॥

★

गाणें १९५ वें

# संत माणकोजी बोधला

बोधल्याच्या किर्तनी निंदक रंगले। हरीचें भजन प्रेतानें केलें ॥ एकादशींच्या दिवशी धामण गांवांत। श्रोते मंडळी रंगली क्रिर्तनांत ॥ चार कुटळ लोकांनीं मिळूनी। प्रेत बसवले बोधल्याच्या किर्तनी ॥ देव पाही निंदकाचें चाळे। हरीचें भजन प्रताने केलें ॥ एक जण म्हणें बोधल्याला। तुमचा चेला हो खुशाल झोंपी गेला ॥ बोधल्याच्या नव्हते ध्यानी मनी। निंदकाची ही कपटकरणीं नवल पहाण्या संतजन आले हरीचे भजन प्रेतानें केलें ॥ माणकोजी बोधला सांगे त्या प्रेतास।

हरी भजनाचा करूं नकोस आ[illegible]
करा । जन्म मरणाचा चुकवा फेरा ।।
उठुनी बसलें । हरीचे भजन प्रेतानें केलें । किती
आले हो धांवून । निंदक थिजले नवल पाहून ।।
धरिलं बोधल्याचें चरण । विठ्ठल गजरी रंगले किती
बोधल्याचें सत्व देवानें रक्षिलें । हरीचें भजन प्रेतानें केलें ।।

गाणे १९६ वे

## संत तुकाराम

तुकोबा गाई अभंग किर्तनी । थयथय नाचे हो इंद्रायणी ।।
दोन तारांचा फुटका तो वीणा । गळां घालुनि नाचे रानां ।।
वेड लाविलें संत जनाना । देवपण आणिलें पाषाणांना ।।
गाई तुका अभंग किर्तनीं । थयथय नाचे हो इंद्रायणी ।।
तुकोबाच्या किर्तनी शिवाजी रंगले । विठ्ठलानें येउनि विघ्न टाळिले ।। देव तुकोबाच्या भक्तीला भुलले । विठ्ठल गणपति पंगतीला जेवले ।। पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । थयथय नाचे हो इंद्रायणी ।। निंदकानें धरीला तुकोबाचा राग । इंद्रायणींत बुडविले त्याचे अभंग ।। इंद्रायणींनें निंदकास नवल दाविलें । तेरा दिवस अभंग कोरडे ठेविले ।। मंबाजी लागले तुकोबाच्या भजनीं । थयथय नाचे हो इंद्रायणी ।। तुकोबाच्या किर्तनीं पक्षीही डोलती । ऐसी त्या तुकोबाची विठ्ठल भक्ती ।। कृष्णकांत सांगे सर्व लोकां । संत लिला झूट म्हणूं नका ।। तुका रंगला विठ्ठल चरणीं । थयथय नाचे हो इंद्रायणी ।।

लफड्याला मामला नवरा ... १९७ वें

## प्रश्न

नका ।। चाळींत ... करूं नका ।...ण । तया यातना असे कठीण ।। येथें गाऊ नका ...कों पुरते रामायण । प्रश्नाचे उत्तर न देता जाऊ ...ना पळुन ।। चौदा रत्नें कशी झाली निर्माण । एवढे भरल्या सभेत द्या सांगून ।। म्हणे कृष्णकांत हे अवघड शास्त्रपुराण । हे आहे शहाण्यांच्या अक्कलेची खूण ।।

गाणें १९८ वें

## उत्तर

(गाणें १९७ चें उत्तर)

अहो टांकीचे घांव सोसल्या विण । नाही येत अंगी देवपण ।। मायेचा अंत शोधता शोधता । गर्वाने फिरला ब्रह्मदेव बारा वाटा ।। तेहतीस कोटी देवांचा तिने केला जमाल गोटा । तिथें तुमची आमुची काय कथा ।। ऐका, शिखी मुनीचा इंद्राने केला अपमान । तेव्हा शिखीमुनींने शेंडीतून केला नंदी निर्माण ।। या नंदीने तेहतीस कोटी देवांची केली दाणादाण । शेवटी विष्णुचे हि केले गर्व हरण ।। स्वर्गात विष्णुची अन् नंदीची लढाई जुंपली । लढता लढता विष्णुची गदा नंदीच्या दांतावर पडली ।। नंदीच्या दांतातून रक्त भळा भळा सांडले । त्या रक्तापासून चौदा रत्ने जन्मली ।। म्हणे कृष्णकांत गुरु शोधता जन्म वाया चालला । अजुनहि नाही मना सारखा गुरू मला सांपडला ।।

गाणे

## प्रार्थना

काकुळती येऊनी विनवितो देवा । गोड माझी सेवा ।। तुझ्या दर्शनाचा धरीला मी हट्ट आम्हां होऊनी प्रगट ।। आहे माझा भरोसा देवा । गोड करूनी घ्यावी अल्प माझी सेवा ।। संकटाविषयी नाहीं माझी तक्रार । दुःखाविषयी तर मुळीच नाहीं कुरकुर ।। फक्त मार्ग तुम्ही मज दाखवा । गोड करूनी घ्यावी अल्प माझी सेवा ।। स्वप्नी दर्शन देऊनी विठ्ठला । आज्ञा केलीत काव्य करण्याची मला ।। म्हणे कृष्णकांत वेडेवाकुडे लिहिले मी देवा । गोड करूनी घ्यावी अल्प माझी सेवा ।।

गाणें २०० वे

## गाउं सुरांत नमन पहिले

(चालः-सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती)


भाद्रपदमासी गणराया आले । बालगोपाल नाचाया जमले ।। गाउं सुरांत नमन पहिलें ।। धृ०।। तुझे गुण गाण्या आलो तुझ्या द्वारी । मनोभावे करीतो आम्ही नित्य तुझी चाकरी ।। तेहतिस कोटी देवांत मान तुझा पहिला । तुझ्या गायनी मन माझें डोले ।। १ ।। तुझे नाम घेता सुख वाटे जिवा । अनंत जन्मींचें दुःख विसरलो देवा ।। सरस्वती चरणीं नमन माझें दुसरें । तुझ्या गायनीं मन माझें डोले ।। २ ।। रुणझुण वाजतीं पायीं माझ्या घुंगरू । दारीं तुझ्या नाचतो अनाथ मी लेकरू ।। कृष्णकांत विनवी यावें जागरणाला । तुझ्या गायनीं मन माझें डोले ।। ३ ।।

## आरती

जय देव श्री मंगलमूर्ती । सोनियाच्या ताटी ओवाळू आरती ॥ भक्त जमुनीं करती सोहळा । नित्य भाद्रपदीच्या चतुर्थीला ॥ जयदेव जयदेव श्री मंगलमुर्ती । सोनियाच्या ताटी ओवाळूं आरती । सुखकर्ता दुखःहर्ता तुच विश्वाचा । पालनवाला तूं आम्हां भक्तांचा ॥ जयदेव जयदेव श्री मंगलमूर्ती । सोनियाच्या ताटीं ओवाळू आरती ॥ तुझ्या दर्शनी झालो मी संतुष्ट । चरणीं लागुनिया बोले कृष्णकांत ॥ जयदेव जयदेव श्री मंगलमूर्ती । सोनियाच्या ताटी ओवाळूं ॥ आरती ॥

॥ श्री सरस्वतीर्पणमस्तु ॥

भाग १ ते १५ संपूर्ण समाप्त



REFBK-0017968